
CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, १४ डिसेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक १८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू धर्म आणि संप्रदाय हे भिन्न आहेत. धर्म आणि मोक्षासाठी इंग्रजीत शब्दच नाही. हिंदुत्व एक जीवन पद्धती आहे. पूजा पद्धती नाही. हिंदू अनेक पंथांना मानतात आणि सर्वांचा आदर करतात. आमच्या विचारानुसार आत्म्याच्या निवासासाठी, धर्माचे काम करण्यासाठी स्वस्थ शरीर आवश्यक आहे - 'शरीर माध्यम् खलु धर्म साधनम् ॥'

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहानांच्या सुरक्षेत वाढ

**नवी दिल्ली** : केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची सुरक्षा वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयची नजर चौहान यांच्यावर असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

# मेस्सीच्या कार्यक्रमात गोंधळ

### संतप्त प्रेक्षकांनी मैदानावर फेकल्या बाटल्या ● मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी मागितली माफी





◆ **कोलकाता, १३ डिसेंबर**

महान फुलबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या बहुचर्चित कोलकाता भेटीला शनिवारी गालबोट लागले. केवळ १० मिनिटांसाठी मेस्सी दिसल्याने चाहत्यांची निराशा झाली. यावेळी त्यांनी घोषणाबाजी करीत प्रचंड गोंधळ घातला. मैदानावर बाटल्याही फेकत खूर्च्यांची तोडफोड केली. अचानक घडलेल्या या प्रकारारामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. ढिसाळ नियोजनामुळे झालेल्या या प्रकाराबद्दलस पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मेस्सीसह फुटबॉल चाहत्यांची माफी मागितली.

मेस्सी सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला, त्यावेळी त्याची झलक पाहण्यासाठी कित्येक तासांपासून प्रतीक्षा करणाऱ्या प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. त्यांनी अभूतपूर्व उत्साहात मेस्सीचे स्वागत केले. त्याने स्टेडियममध्ये प्रवेश करताच प्रेक्षकांनी जल्लोषात स्वागत केले. मात्र, त्याची झलक १० मिनिटांपेक्षा कमी काळ दिसल्याने चाहते संतप्त झाले. त्यांनी फोस्टर्स फाडले, बाटल्या फेकल्या. यामुळे स्टेडियमवर काही काळ तणाव निर्माण झाला. समाज माध्यमांवर स्टेडियमची स्थिती व्हायरल झाली.

सॉल्ट लेक स्टेडियममध्ये आज झालेला गोंधळ आणि गैरव्यवस्थापन हे अत्यंत वेदनादायी आणि निःशब्द करणारे आहे, असे ममता बॅनर्जी यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत स्पष्ट केले आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी जमलेल्या हजारो क्रीडाप्रेमी आणि चाहत्यांसोबत मी स्वतः कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी स्टेडियमकडे जात असताना झालेला प्रकार वेदनादायी होता. या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

**आयोजकाला अटक; चौकशीसाठी समिती**

कार्यक्रमाचा आयोजक सताद्रू दत्ताला अटक करण्यात आली, अशी माहिती प. बंगालचे पोलिस महासंचालक राजीवकुमार यांनी दिली. सॉल्ट लेक स्टेडियममधील परिस्थिती नियंत्रणात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अशिम कुमार रे यांच्या अध्यक्षतेखाली समिती**

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपल्या पोस्टमध्ये सांगितले की, निवृत्त न्या. अशिम कुमार रे यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीत मुख्य सचिव तसेच गृह आणि अतिरिक्त मुख्य सचिव सदस्य असतील. ◂*(वृत्तसंस्था)*

# थिरुवनंतपुरम्‌मध्ये फुलले 'कमळ'

### महापालिकेत डाव्यांची ४५ वर्षांची सत्ता संपुष्टात

◆ **थिरुवनंतपुरम्, १३ डिसेंबर**

भाजपाच्या नेतृत्वातील रालोआने केरळची राजधानी थिरुवनंतपुरम्‌मध्ये मोठा विजय मिळवत डाव्यांना मोठा धक्का दिला. थिरुवनंतपुरम् महानगरपालिकेत रालोआ सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला असून, त्यांनी डाव्या लोकशाही आघाडीची (एलडीएफ) या नागरी संस्थेवरील ४५ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या शानदार निकालांसाठी भाजपा कार्यकर्त्यांचे आभार मानले.

काही महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांवर शशी थरूर यांनी स्तुतिसुमने उधळली होती. यावर काँग्रेसमधील नेत्यांनी थरूर यांना धारेवर धरले होते. मात्र, आता प्रत्यक्ष त्यांच्याच मतदारसंघातील महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने विजय मिळवल्याने हा निकाल राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. १०१ जागांपैकी भाजपाने ५०, एलडीएफने २९ तर युडीएफने १९ जागा जिंकल्या आहेत.

रालोआने थिरुवनंतपुम् महापालिका जिंकली त्याचसोबत केरळमधील सत्ताधारी एलडीएफचा त्रिपुनिथुरा नगरपालिका निवडणुकीत पराभव केला. या दोन्ही शहरांमधील पालिका सत्ता काबीज करण्यासाठी भाजपाने अनेक वर्षांपासून संघर्ष कायम ठेवला होता. केरळच्या लोकशाहीसाठी आश्चर्यजनक निकालांचा दिवस, अशी प्रतिक्रिया शशी थरूर यांनी व्यक्त केली.

**त्रिपूनिथुरामध्ये एनडीएची एलडीएफवर मात**

एर्नाकुलम जिल्ह्यातील त्रिपुनिथुरा नगरपालिकेत रालोआने काठावरचे बहुमत मिळवले आहे. ५३ सदस्यीय परिषदेत त्यांनी २१ जागा जिंकल्या. एलडीएफ २० जागांसह दुसऱ्या स्थानावर तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ १६ जागांसह तिसऱ्या स्थानावर घसरली. ◂*(वृत्तसंस्था)*





२०० टनाच्या क्रेनची महत्त्वाची भूमिका, नऊ रेल्वे गाड्या रद्द



# भय्या चौकातील पूल आज जमिनदोस्त होणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

१०३ वर्षाचा ब्रिटिश कालीन पूल पाडण्याच्या कामाकरिता २०० टनाचे दोन मोठे क्रेन मागविण्यात आले आहेत. रविवार पुलाच्या पाडकाबाब मध्ये हे क्रेन महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. पूल पडकामाची जबाबदारी इंदोरच्या आयसीसी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत दिली आहे. पूल पाडण्यासाठी कोल्हापूरहून दोन सीटर क्षम तेचे तीन क्रेन मागविण्यात आले आहेत. यासाठी ३०० हून अधिक कर्मचारी रविवारी काम करतील. सकाळी आठ ते रात्री दहापर्यंत हे काम चालणार आहे. या कंपनीने आतापर्यंत ५० हून अधिक पुलाचे पाडकाप केले आहे. भय्या चौकातील ब्रिटिशकालीन पूल पाडण्यासाठी दि. १० डिसेंबर पासून कामाला सुरुवात करण्यात आली आहे. १४ डिसेंबर रोजी हा पूल पाडण्यात येणार असून त्याकरिता ७० टक्के काम झाले आहे. तांत्रिक कामे शनिवारी पूर्ण करण्यात आली. रविवारी दुपारी हा पूल पाडला जाणार आहे.

**(उर्वरित वृत्त पान ५ वर)**

# ग्रेट निकोबार बेटावर उभारणार नवे विमानतळ

**नवी दिल्ली** : चीनच्या वाढत्या समुद्री आणि सामरिक प्रभावाला सामोरे जाण्यासाठी भारताने ग्रेट निकोबार बेटावर दुसऱ्या विमानतळाचे बांधकाम सुरू केले आहे. हे बेट भारताचे सर्वात दक्षिणेकडील बेट असून मलाक्का सामुद्रधुनीजवळ आहे. जी चीन आणि सुदूर पूर्वेसाठी महत्त्वपूर्ण सागरी मार्ग मानला जातो. अहवालानुसार, नवीन विमानतळ चिंगआन परिसरातील गॅलाथिया खाडीत बांधले जाईल. ग्रेट निकोबार अंदमान-निकोबार बेटसमूहाचा भाग असून बंगालच्या उपसागरात वसलेले आहे.

## आशिया चषकात आज भारत-पाकिस्तान लढत

**दुबई, १३ डिसेंबर**

आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत रविवारी गट अ च्या दुसऱ्या साम न्यात भारत आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान आमनेसाम ने उभे ठाकणार आहे. क्रिकेटच्या मैदानावर त्यांचा पारंपरिक सामना पुन्हा सुरू होत आहे. दोन्ही संघ आपल्या पहिल्या सामन्यांमध्ये मोठ्या विजयानंतर या सामन्यात उतरत आहेत. भारताने युएईला २३४ धावांनी हरवले, यात वैभव सूर्यवंशीने अवघ्या ९५ चेंडूंमध्ये १७१ धावांची खेळी केली.

दुसरीकडे, फरहान युसफच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानने मलेशियाला केवळ ४८ धावांत गुंडाळून २९७ धावांनी विजय मिळवला. आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ या विजयासह बाद फेरीतील आपले स्थान जवळपास निश्चित करण्याचा प्रयत्न करेल. सामना सकाळी १०.३० वाजतापासून सुरु होणार असून सामन्याचे थेट प्रसारण सोनी स्पोर्ट्स वाहिनीवर केल्या जाणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील उद्याचा सामना जिंकणारा संघ ग्रुप-ए च्या पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानी पोहोचेल. सध्या दोन्ही संघांचे २-२ गुण आहेत, परंतु चांगल्या रन रेटमुळे पाकिस्तान अव्वल स्थानी आहे. ग्रुप-बी मध्ये श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ आहेत. प्रत्येक गटातून २-२ अव्वल संघांना उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. उपांत्य फेरी जिंकणाऱ्या दोन्ही संघांमध्ये २१ डिसेंबर रोजी दुबईमध्येच अंतिम सामना खेळला जाईल.







भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्‌ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्टस् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्टस् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वतःच जबाबदार असते. लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि प्रोटेक्शन प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.

# शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकतेसह समतोल राखण्याचा प्रयत्न

## अजित पवार यांची विधानसभेत माहिती



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर दि. १३ डिसेंबर -**

टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या अधिछात्रवृत्तीधारक शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा महायुती सरकारचा उद्देश आहे. यासाठी योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, योग्य निकषांसह विहित मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात येणार आहेत,अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी विधानसभेत दिली.

दरम्यान, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतील, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बार्टीच्या शिष्यवृत्तीबाबत विधानसभा सदस्य डॉ. नितीन राऊत यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, राज्यसरकारच्यावतीने टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ काही ठिकाणी एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मिळत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने माहिती संकलनाची प्रक्रिया सुरू असून, सध्या या शिष्यवृत्तीसाठी या संस्थांचा निम्म्यापेक्षा अधिक निधी खर्च होत आहे. त्यामुळे इतर गरजू विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांसाठी निधी उपलब्धतेवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत असे सांगितले.

या स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या विषयावर मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाली असून या चर्चेनंतर झालेल्या निर्णयानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत युजीसीमार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करुन अधिछात्रवृत्ती योजनचे निकष उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरीत अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करुन त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना तंत्र शिक्षण विभागाला देण्यात आल्या आहेत. शिष्यवृत्ती देताना प्रत्येक घटकासाठी लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणार आहे. त्याचबरोबर कोणत्या शैक्षणिक टप्प्यावर किती विद्यार्थ्यांना लाभ द्यायचा, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा महायुती सरकारचा मुख्य उद्देश आहे. शिष्यवृत्ती मंजूर करताना संबंधित अभ्यासक्रमांचा राज्य व समाजाच्या विकासासाठी होणारा उपयोग, तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आर्थिक परिस्थितीचा सखोल विचार करण्यात येत असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

# धार्मिक स्थळांचा अपमान, द्वेष पसरवणाऱ्यावर कारवाई करा

## अबू आझमीचे अशासकीय विधेयक



**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर दि. १३ डिसेंबर-**

द्वेषपूर्ण भाषण करणाऱ्या, महान व्यक्तिमत्त्वांचा आणि धार्मिक स्थळांचा अपमान करणाऱ्यांवर कठोर शिक्षेसाठी समाजवादीचे अबू असीम आझमी यांनी हिवाळी अधिवेशनात अशासकीय विधेयक मांडले आहे. या विधेयकात चिथावणी देणाऱ्यांवर युएपीए आणि मकोका अंतर्गत अजामीनपात्र गुन्हे नोंदवण्याचा, १० वर्षांची शिक्षा आणि २ लाख दंड ठोठावण्याची सूचना केली आहे. तालिकाध्यक्ष चैनसुख संचिती यांनी त्यासाठी अनुमती दिली होती. आता त्याबाबत विधानसभा अध्यक्ष निर्णय घेतील.

आझमी यांनी शुक्रवारी रात्री विधेयक मांडताना म्हणाले, महान व्यक्तिमत्त्वांचा आणि धार्मिक स्थळांचा अपमान करणाऱ्यांना त्यांच्या अपवित्र कृत्यांपासून रोखण्यासाठी हे विधेयक मंडले जात आहे. ते केवळ मुस्लिमांसाठीच नाही तर सर्व धर्म आणि सर्व सामाजिक गटांसाठी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार हे विधेयक मंजूर करण्याची शिफारस केली जात आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार दिलेल्या शिक्षेनुसार, महान व्यक्तिमत्त्वांचा आणि प्रार्थनास्थळांचा अपमान करणाऱ्यांना सहजपणे जामीन मिळतो. हे विधेयक ही सोय संपवण्यासाठी आणि द्वेष पसरवणाऱ्यांना थांबवण्यासाठी आहे.असे सांगून ते म्हणाले,' या कायद्यानुसार, जो कोणी कोणत्याही धार्मिक ग्रंथाचा, देवतेचा, देवाचा किंवा प्रेषिताबद्दल अपशब्द काढता येणार नाही. या कठोर कायद्यामुळे द्वेषाला आळा बसेल आणि कायदा आणि सुव्यवस्थेतही मोठी सुधारणा होईल.त्यामुळे अध्यक्षानी तो सभागृहात सादर करण्याला अनुमती द्यावी आणि सदस्यांनी ते एकमताने मंजूर करण्याची विनंती केली.

# प्रबोधन, प्रशिक्षण व संशोधन ही लोकशाही समृद्धीची त्रिसूत्री : केंद्रीय मंत्री गडकरी



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर दि. १३ डिसेंबर -**

राष्ट्रकुल संसदीय अभ्यास मंडळाच्या माध्यमातून राज्यशास्त्राचे विद्यार्थी प्रशिक्षणासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांना कायदे निर्मितीची प्रक्रिया, संसदीय पद्धत अभ्यासण्याची संधी प्राप्त होते. अशा प्रशिक्षण प्रबोधनातूनच लोकशाही समृद्ध होते. त्यामुळे प्रबोधन, प्रशिक्षण व संशोधन हे समृद्ध लोकशाहीची त्रिसुत्री आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. विधान परिषदेने संमत केलेले महत्त्वपूर्ण विधेयके ठराव आणि धोरणे याविषयी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित संदर्भ समृद्ध ग्रंथ मालिकेतील द्वितीय ग्रंथाचे प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

विधानपरिषद सभागृहात झालेल्या कार्यक्रमात विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित होत्या. केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले, ज्या सभागृहाने १८ वर्ष शिकवीत अनुभवसंपन्न केले आणि देशाची सेवा करण्याची संधी दिली, अशा सभागृहात कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा येण्याचे भाग्य मिळाले. त्यामुळे या सभागृहातील आठवणींना उजाळा मिळाला. चर्चेद्वारे समोरच्याकडून राज्याच्या विकासासाठी हवे असलेले काढून घेण्याचे कौशल्य याच सभागृहाने दिले. विधान परिषद सभागृहात कायदा निर्मितीवर झालेल्या चर्चेतून परिणामकारक कायद्यांची निर्मिती झाली आहे. या सभागृहात राज्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा करताना नियमांची लढाई झाली तरी कधी वैयक्तिक संबंधांमध्ये कटूता आली नाही, हीच आपल्या लोकशाहीची समृद्ध परंपरा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,' कायदा निर्मिती प्रक्रियेत सभागृहांमध्ये होत असलेली चर्चा अत्यंत महत्त्वाची असते. अशा चर्चांमधूनच प्रगल्भ कायद्याची निर्मिती होते. चर्चांमधून निर्मित झालेल्या कायद्यांमध्ये जनमनाचे प्रतिबिंब दिसून येते. अशा कायद्यांचा निश्चितच लोककल्याणासाठी उपयोग होत असल्याचे सांगून ते म्हणाले, ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधान परिषद सभागृहाचे सदस्य होते. या सभागृहाने अतिशय हुशार, अनुभवी सदस्य दिले आहेत. त्यांच्या हुशारी, अनुभवाचा लाभ कायदा निर्मिती प्रक्रियेत झाला आहे. या सभागृहाने पारित केलेले कायदे, ध्येयधोरणे यावर आधारित ग्रंथसंपदा निर्माण होत आहे. आपल्या सभागृहातील कामकाजाचे ' रेकॉर्ड ' होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रेकॉर्ड नसल्याने अनेक ऐतिहासिक संदर्भांना आपण मुकलो आहोत.

पश्चिमात्य देशांमध्ये ' रेकॉर्ड' असल्यामुळे त्यांचे संदर्भ आपणास घ्यावे लागतात. आपली लोकशाही पद्धत त्यांच्यापेक्षा दोन हजार वर्षांनी जुनी आहे, मात्र रेकॉर्ड नसल्याने संदर्भ उपलब्ध होत नाहीत. इतिहास हा संकलित करावयाचा असतो. त्यामुळे सभागृहातील भाषणे, निर्मित कायदे यांचे संकलन करून प्रकाशित केलेला ग्रंथ हा नेहमी ऐतिहासिक दस्ताऐवज ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्याच्या मागास भागाचा विकास करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी १९५० नंतर पहिल्यांदा संविधानात उपलब्ध कलमांचा उपयोग केला. त्यामुळे विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न झाले, अशा शब्दात त्यांनी गडकरी यांच्या कार्याचा गौरवही केला.

सभापती प्रा. राम शिंदे,' देशामध्ये द्विसभागृह पद्धत अत्यंत महत्त्वाची आहे. प्रभावी कायदे निर्मिती यामुळे शक्य झाली आहे. राज्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा घडवून आणल्यानंतर निर्मित होणारे कायदे तसेच ध्येयधोरणे राज्याच्या विकासासाठी पोषक ठरतात. 'प्रास्ताविक उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केले. ग्रंथाच्या संपादन कामामध्ये पत्रकार योगेश त्रिवेदी, विलास मुकादम व किशोर आपटे यांनी सहभाग दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# मुले पळविणारी टोळी, तरुणी बेपत्ता होण्याबाबत अधिवेशनात भूमिका मांडा

## राज ठाकरे यांचे मुखमंत्र्यांना साकडे



**मुंबई, दि. १३ डिसेंबर-**

गेल्या काही दिवसांपासून मुंबई, ठाण्यासह राज्यभरातून मुले पळविणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत, तसेच तरुणी बेपत्ता होण्याचे प्रमाण धक्कादायकपणे वाढले आहे, याबाबत पोलिसांकडून योग्य प्रकारे कार्यवाही होत नसल्याने हिवाळी अधिवेशनात चर्चा करून त्याबाबत प्रतिकात्मक उपाययोजना करावी, अशी मागणी मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

त्यांना पत्र लिहून हे साकडे घातले आहे. दोन्ही सभागृहात मनसेचा एकही आमदार नाही, त्यामुळे राज यांनी थेट मुख्यमंत्र्यांना याबाबत गंभीर्याने लक्ष घालण्यासाठी मागणी केली असून त्याबाबतचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल केले आहे. त्यात म्हटले आहे की, मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, नागपूर, जळगाव, औरंगाबाद, अहमदनगर अशा जिल्ह्यांमध्ये लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत आणि या टोळ्या सर्रास लहान मुलं पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही. सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार जरी गेलं तरी हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३० टक्के वाढ झाली आहे. त्याबाबत लहान मुले पळवण्याच्या अमुक केसेस दाखल होतात आणि त्यातली इतकी टक्के मुलं परत शोधली जातात आणि त्यांच्या कुटुंबीयांकडे सुखरूप परत पाठवली जातात,अशा आशयाचे सरकारी उत्तर महाराष्ट्राला नको आहे, असे सांगून राज ठाकरे यांनी मुळात एनसीआरबी जे आकडे सांगत आहे ते आकडे म्हणजे किती पालकांनी पोलिसांकडे तक्रारी नोंदवल्या आहेत त्याचा तपशील सांगितला जातो, पण अशा काही हजार तक्रारी पोलिसांपर्यंत पोहोचत तरी असतील का? आणि समजा मुलं पुन्हा सोडवून आणली तरी त्या काळात लहान मुलांच्या मनावर जो आघात होतो, त्याचं काय? मुळात मुलं पळवून नेणारी टोळी कार्यरतच कशी होते आणि ती इतक्या राजेरोसपणे काम कशी करते? यावर काहीतरी जबरदस्त कृती करावी असं सरकारला वाटत नाही? अशी विचारणा केली आहे. रस्त्यावर, स्टेशनवर, बसस्टँडवर लहान मुलं भीक मागताना बघतो, ती कोण आहेत ? त्यांच्या सोबतचे जी माणसं भीक मागत असतात ते खरंच त्यांचे आई-वडील असतात का ? याचा तपास किंवा वेळ पडल्यास अगदी डीएनए टेस्ट करावी असे आदेश सरकारला द्यावेसे का वाटत नाही ? असा सवाल करीत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री या नात्याने तुम्ही लक्ष घाला- आज या राज्यात लहान मुले, तरुण मुली पळवल्या जात आहेत, महाराष्ट्रातल्या जमिनी पळवल्या जात आहेत, यावर विधिमंडळात चर्चा व्हावी, त्यावर एकमुखाने काही पाऊलं उचलायला प्रशासनाला भाग पाडावे,असे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना वाटत नाही का ? हिवाळी अधिवेशन म्हणजे सरकारच्या चुकलेल्या अंदाजपत्रकाला ठिगळ लावण्यासाठी पुरवणी मागण्या मंजूर करून घेण्याची सोय इतकंच प्रयोजन आहे का? अधिवेशनात अनेकदा उत्तरं द्यायला मंत्री सभागृहात नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे लहान मुलं असोत की गायब होणाऱ्या मुली अशा विषयावर विधिमंडळात चर्चा होईल अशी अपेक्षा करणं पण अवाजवी वाटेल अशी परिस्थिती आहे. अधिवेशनात यावर चर्चा घडवून आणून नव्हे तर ठोस कृती करावी अशी अपेक्षा राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.



नागपूर हिवाळी अधिवेशनात विधानभवन येथे शनिवारी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट झाली.यावेळी आमदार श्वेता महाले आणि रिपब्लिकन पक्षाचे पुरण मेश्राम; महेंद्र मानकर; बाळू घरडे; राजन वाघमारे; आदी मान्यवर उपस्थित होते.

# अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर नागपूर हिवाळी अधिवेशनावर मोर्चा



**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर दि. १३ डिसेंबर-**

आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कृती समितीच्यावतीने दि. १० डिसेंबर रोजी राज्य शासनाविरोधात नागपूर विधानसभा हिवाळी अधिवेशनावर काढण्यात आलेल्या विराट मोर्चात सोलापूर जिल्ह्यातील अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. जिल्हाध्यक्ष कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे व सचिव कॉम्रेड डॉ. प्रवीण मस्तुद यांच्या नेतृत्वाखाली त्या नागपूरला गेल्या होत्या.

नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कडाक्याच्या थंडीमध्ये रात्रभर मुक्कामी राहिल्या. काढण्यात आलेला मोर्चा धरणे आंदोलनात रुपांतरित होऊन २ दिवस मुक्कामी राहिला. दिवसाला शंभर रुपये एवढ्या अवघ्या वेतनावर काम कसे करायचे? असा तीव्र प्रश्न या महिलांनी उपस्थित केला आहे. आरोग्यमंत्री यांची शिष्टमंडळाला भेट झाल्याशिवाय मोर्चा माघारी घेणार नाही अशी भूमिका घेऊन त्यांनी आंदोलन केले. अखेर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी शिष्टमंडळाला भेट दिली व मुंबईमध्ये बैठक लावू व मागण्या सकारात्मक पद्धतीने सोडवू, असे आश्वासन दिल्यानंतर मोर्चा स्थगित करण्यात आला. शिष्टमंडळात राज्याध्यक्ष कॉ. राजू देसले, आयटक राज्य सरचिटणीस कॉ. श्याम काळे, विनोद झोडगे, दिलीप उटाणे, मुगाची बुरुड आदींचा समावेश होता.

अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचय यांना राज्य सरकारचे मासिक २९०० तर केंद्र सरकारकडून शंभर रुपये असे एकत्रित तीन हजार रुपये वेतन आहे. आरोग्य खात्याचे आयुक्त व संचालक यांनी पगारवाढीची शिफारस करुन देखील त्यांची पगार वाढ गेली ५ वर्षे झालेली नाही. इतक्या अल्प वेतनामध्ये त्यांचे जगणे शक्य नसल्याने त्यांचे वेतन २१ हजार रुपये करावे ही मुख्य मागणी घेऊन या मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचरांना जिल्हा परिषदांच्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे वर्ग ३ व ४ च्या पदावर सामावून घ्यावे, त्यांना केवळ स्त्री परिचर असे संबोधून पूर्णवेळ करण्यात यावे. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वार्षिक अर्जित रजा, किरकोळ रजा, वैद्यकीय रजा व राष्ट्रीय सणाच्या सुट्ट्या देण्यात याव्या अशा विविध मागण्या मोर्चामध्ये करण्यात आल्या होत्या.

# मुंबईत ५० एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर राबवणार 'क्लस्टर रिडेव्हलपमेंट'

## ● पहिल्या टप्प्यात १७ प्रकल्प निश्चित ● एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत घोषणा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर दि. १३ डिसेंबर -**

मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी १७ ठिकाणी एसआरए समुह पुनर्विकास प्रकल्प राबविला जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी विधान परिषदेत केली.

' त्याचबरोबर एसआरए अभय योजने'ला डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ, तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी 'एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटींची संख्या वाढविण्याच्या घोषणांचा समावेश आहे. त्याचबरोबर म्हाडाच्या ओसीसाठीच्या अभय योजनेला १ वर्षाची मुदतवाढ आणि मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवरील महापालिका कर्मचाऱ्यांनी बांधलेल्या घरांकरीता नवीन योजना राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात मुंबईतील अँटॉप हिल, कृष्ण नगर आणि केतकीपाडा (बोरिवली), गोपीकृष्ण नगर (दहिसर),ओशिवरा, गोवंडी, चित्ता कॅम्प (ट्रॉम्बे), चेंबूर, टागोर नगर (विक्रोळी), विक्रोळी पार्कसाईट, भांडुप या १७ प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासंदर्भात निवेदन करताना शिंदे म्हणाले, मुंबईतील ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे पुनर्विकास केला जाणार आहे. छोट्या-छोट्या एसआरए प्रकल्पांऐवजी आता संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यासाठी ही योजना राबवली जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेला राज्य मंत्रिमंडळाने ७ ऑक्टोबर मान्यता दिली असून, १३ नोव्हेंबरला याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.



हे प्रकल्प रखडू नयेत आणि जलदगतीने पूर्ण व्हावेत, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी, एमएसआरडीसी, म्हाडा आणि मुंबई महानगरपालिका या शासकीय संस्थांच्या मदतीने 'जॉइंट व्हेंचर' तत्त्वावर हे प्रकल्प उभारले जाणार असल्याचे सांगितले.

**एसआरए अभय योजनेला ३१ डिसेंबर२०२६ पर्यंत मुदतवाढ**

मुंबईतील हजारो झोपडीधारकांसाठी दिलासा देताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी झोपडी खरेदी-विक्रीच्या तांत्रिक अडचणीत अडकलेल्या नागरिकांसाठी 'एसआरए अभय योजने'ची मुदत आता डिसेंबर २०२६ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली. अनेक झोपडीधारकांनी आपल्या झोपड्यांची खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण केले होते.

मात्र, नियमानुसार या नवीन झोपडीधारकांचे नाव 'अंतिम परिशिष्ट-२' मध्ये (पात्र झोपडीधारकांच्या यादीत) समाविष्ट करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. यामुळे हजारो गरीब कुटुंब हक्काच्या घरापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे राज्य शासनाने १ ऑक्टोबर २०२४ रोजी 'अभय योजना' लागू केली होती. सुरुवातीला ही योजना ३ महिन्यांसाठी होती नंतर तिला मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ होती.तसेच झोपडपट्टी पुनर्विकासाशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी असलेल्या 'एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटी'ची संख्या वाढविण्यत येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत २१०३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

# वेध महापालिकेचे पण युती, आघाडीबाबत शंकाच !

## ● शहरात भाजपाची ताकत स्वबळाची; शिवसेना-राष्ट्रवादी फुटल्यामुळे काँग्रेसच मोठा भाऊ; यंदा सर्वत्र बंडखोरीचा धोका मोठा

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

**राज्याप्रमाणेच सोलापूर महापालिका निवडणुकांचेही वेध राजकारण्यांना लागले असले तरी पालिका निवडणुकीमुध्ये शहरात भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादीची महायुती आणि काँग्रेस-उबाठा-शरद राष्ट्रवादी यांची महाविकास आघाडी होण्याबाबत साशंकताच आहे. गतवेळी एकहाती सत्ता पालिकेत होती, त्यामुळे या निवडणुकीतही भाजपाची ताकत स्वबळावर यशस्वीपणे लढण्याइतकीच असल्याने कार्यकर्त्यांमधूनही स्वबळाचा दबाव पक्षावर आहे. तर शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटल्यामुळे या दोन्ही पक्षांची राजकीय ताकत कमी झाल्यामुळे जागा वाटपात काँग्रेसच मोठा भावाचा दावा करण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या निवडणुका या तब्बल तीन वर्षानंतर होत असल्याने यंदा इच्छुकांची संख्या मोठी असल्याने प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते स्वबळावर लढण्याची स्वप्ने पहात आहेत. महापालिकेच्या जागा १०२ असून प्रत्येक पक्षाकडे विद्यमान नगरसेवक दावेदार मजबूत असल्याने पक्षांतर केलेल्यांची गोची होणार तर युती-आघाडी झाल्यास मोठ्या प्रमाणात बंडखोरीला उधाण येणार हे मात्र नक्की होय.**

गतवेळी सोलापूर महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता होती. एकूण १०२ नगरसेवकांपैकी ४९ नगरसेवक भाजपाचे होते. तर एकत्रित शिवसेनेचे २१, काँग्रेसचे १४, एमआयएमचे ९, एकत्रित राष्ट्रवादीचे ४, बसपाचे ४, माकप १ असे पक्षीय बळाबळ होते. भाजपाची स्वबळाची ताकत कायम असल्याने त्यांना महापालिकेत शिवसेना आणि अजित राष्ट्रवादीची गरज भासत नाही. कारण सेना व राष्ट्रवादी फुटल्यामुळे राजकीय ताकत कमी झाली तर पालिकेत राष्ट्रवादी गतवेळी अगदीच नगण्य होती. भाजपामध्ये सध्या इनकमिंग मोठे असल्याने मूळ भाजपावाल्यांची चिंता वाढली आहे. त्यात महायुती झाल्यास जागा आणखीन कमी होण्याचे टेंशन असणार आहे. त्यामुळे किमान सोलापूर महापालिकेत तरी स्वबळावरच लढावे अशी माणसिकता भाजपावाल्यांची जाणवते आहे. शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादी देखील सन्मानाने जागा वाटपाची भाषा करीत असल्याने जागा वाटपावर महायुतीचे घोडे अडण्याची दाट शक्यता आहे.

सन १०१७ पूर्वी वर्षेनुवर्षे महापालिकेत काँग्रेसची एकहाती सत्ता होती. काँग्रेसच्या सत्तेला भाजपाने गतवेळी सुरुंग लावला. तर केंद्र व राज्यात भाजपाची सत्ता आल्यापासून काँग्रेसला मोठी गळती लागलेली आहे. सोलापूर काँग्रेसमधून बाहेर पडणाऱ्यांची संख्या मोठी आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे घनिष्ठ निकटवर्तीय मानले जाणारे कोठे, खरटमल यांच्यासह अनेकांनी काँग्रेसला राम राम ठोकला आहे. काँग्रेसचे मित्रपक्ष असलेले शरद राष्ट्रवादी आणि ठाकरे सेना यांना काँग्रेसकडून जागा वाटपात मान मिळण्याची अपेक्षा असल्याने त्यांनी काँग्रेसपुढे आघाडीचा हात पुढे केला आहे. वास्तविक पाहता महाविकास आघाडीतील मित्रपक्षांना आता खरी आघाडीची गरज आहे. परंतु ऐनवेळी मानापमानात आघाडी होण्याबाबतची साशंकता देखील आहे.

काँग्रेसची सूत्रे खासदार प्रणिती शिंदे यांच्या हाती असल्याने आघाडीसाठी जागा वाटप असो किंवा काँग्रेसमधील तिकिट वाटप असो यात खासदार प्रणिती यांचाच वरचष्मा असणार हे निश्चित आहे. ताईंची कामाची पध्दत देखील आता कार्यकर्तेच काय पण मित्रपक्ष देखील ओळखून आहे. शरद राष्ट्रवादीची धुरा आता खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि नूतन शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्याकडे आहे. मूळचे काँग्रेसवासी नंतर शरद राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष असलेले सुधीर खरटमल यांनी आता अजित राष्ट्रवादीत




प्रवेश केला आहे. महापालिकेत राष्ट्रवादीची मूळातच ताकत कमी आहे. गतवेळी एकत्र राष्ट्रवादीचे केवळ ४ नगरसेवक होते. त्यामुळे त्यांना महायुती असो किंवा महाविकास आघाडी यात जागा वाटपात झुकते माप मिळण्याची शक्यता धुसरच आहे. ठाकरे सेना म्हणजे उबाठाला पक्ष फुटीचा मोठा दणका बसल्यानंतरही उबाठामधील पक्षांतर्गत वाद काही क्षमत नसल्याची शोकांतिका आहे. महापालिका निवडणुकीत असाच वाद राहिल्यास मोठी अडचण होणार आहे. कारण गतवेळी एकत्र शिवसेना असताना महापालिकेत २१ नगरसेवक होते आणि त्याचेही मोठे कारण म्हणजे स्व. महेश कोठे यांच्याकडे शिवसेनेची सूत्रे होती. आता शिवसेना फुटली असून उबाठातील नेतृत्वांमध्ये आपसात वाद आहे. उबाठा आणि शरद राष्ट्रवादीच्या या राजकीय अवस्थेचा लाभ काँग्रेसने घेतल्यास याचा परिणाम जागा वाटपावर दिसून येणार आहे. असे झाल्यास महाविकास आघाडीतही बिघाडीची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच काय तर सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात काही राजकीय मेळ लागेल असे आता तरी दिसत नाही. तर दोन्हीकडच्या नेत्यांनी देखील स्थानिक पातळीवरचे निर्णय स्थानिक नेत्यांवरच सोपविण्याचे सूतोवाच केल्यामुळे या निवडणुकीत कुरघोड्यांचे राजकारण मोठ्या प्रमाणात होणार आहे. भाजपातदेखील पक्षातंर्गत वादाचे राजकारण मोठे असून गतवेळचे पक्षातंर्गत विरोधक आता दोस्त झाल्याने त्यांना पक्षातीलच काही नवीन विरोधकांचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. शहरात भाजपाचे तीन आमदार असून यातील दोन्ही देशमुख हे अनुभवाने मोठे असल्याने तिकिट वाटपात त्यांना डावलता येणार नसल्याचे चित्र आहे. तसे झाल्यास मात्र पक्षाची राजकीय डोकेदुखी वाढण्याची शक्यता दाट आहे.

केंद्र व राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीला महापालिकेच्या निवडणुकीत बंडखोरीचा मोठा धोका संभवतो आहे. कारण तीन वर्षानंतर निवडणुका होत असल्याने प्रत्येकजण निवडणुकीच्या भोवल्यावर बसलेला आहे. विद्यमान आणि पक्षात नव्याने आलेल्यांमध्ये उमेदवारीचे त्रांगडे होणार आहे. तर काही नवीन चेहऱ्यांमुळे विद्यमान नगरसेवकांची गोची होणार आहे. एकूणच काय तर भाजपामध्ये शिस्तीमुळे बंडखोरीचा संभाव्य धोका कमी मानला तरी पाडापाडीचे राजकारण मात्र मोठ्या प्रमाणावर रंगणार आहे. कारण नाराजांकडून गनिमी काव्याने राजकारण होण्याची शक्यता दाट आहे.

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे शिलेदार मंत्री सोलापूरचे दौरे सातत्याने करत असून येथील कार्यकर्त्यांना राजकीय ताकत आणि प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करीत आहेत. तर भाजपाचे वरिष्ठ स्थानिक पातळीवरील नाराजी आणि मतभेद मिटविण्याकडे लक्ष देत आहेत. महापालिकेच्या निवडणुका कशा होणार? युती-आघाडी होणार की स्वबळावर होणार? कोणत्या पक्षाची रणणिती कशी असणार? यावरच सर्वकाही अवलंबून असणार आहे.






### राष्ट्रवादीकडून आण्णा बनसोडे, भरणे तर शिवसेनेकडून प्रताप सरनाईक, गोगावले मैदानात...

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित राष्ट्रवादीकडून विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे आणि सोलापूरचे माजी पाकमंत्री तथा कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांना सोलापूरच्या मैदानात उतरवले आहे. तर शिंदे शिवसेनेकडून मंत्री प्रताप सरनाईक आणि भरतशेठ गोगावले यांना तैनात केले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सर्वांचे सोलापूर दौरे वाढलेले आहेत. विशेषता राष्ट्रवादीने बनसोडे यांच्या माध्यमातून सोलापूरच्या पाणी प्रश्नासह विविध समस्यांवर लक्ष केंद्रीत केलेले दिसत आहे. तर शिंदे सेनेचे मंत्री सरनाईक सोलापुरात येवून एसटी स्थानकासह सोलापूरकरांच्या इतर समस्या सोडविण्यास प्राधान्य देत असल्याचे दर्शवत आहेत. भाजपाने विमानसेवा, दुहेरी जलवाहिनी पूर्ण केल्यानंतर आता अंतर्गत पाणीपुरवठा वितरण यंत्रणेचा ९०० कोटींचा प्रस्ताव मंजूर करण्याची तयारी सुरु केली आहे. अजित राष्ट्रवादीने तर स्वबळाची तयारीच सुरु केल्याचा कार्यकर्त्यांचा सूर आहे.


# भारतावरील ५० टक्के शुल्क रद्द करा

## तीन प्रभावशाली खासदारांचा ठराव ● डोनाल्ड ट्रम्प यांना घरचा अहेर

◆ **वॉशिंग्टन, १३ डिसेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेले ५० टक्के शुल्क रद्द करण्यासाठी अमेरिकेतील तीन प्रभावशाली खासदारांनी काँग्रेसमध्ये ठराव सादर केला. भारताविरोधातील ही अत्यंत बेजबाबदार शुल्क रणनीती आहे. यामुळे दोन्ही देशांतील भागीदारी कमकुवत होत आहे, असे त्यांनी या ठरावात म्हटले आहे.

हा ठराव नॉर्थ कॅरोलिनाच्या प्रतिनिधी डेबोरा रॉस, टेक्सासचे मार्क वेसी आणि इलिनॉयचे राजा कृष्णमूर्ती यांनी शुक्रवारी प्रतिनिधीगृहात सादर केला. या माध्यमातून भारतातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा अधिकार देणारी ट्रम्प यांची राष्ट्रीय आणिबाणी संपुष्टात आणली जाईल



तसेच व्यापारावरील काँग्रेसचा घटनात्मक अधिकार पुनर्स्थापित करण्यात मदत होईल, असे या ठरावात म्हटले आहे.

ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के शुल्क लादले असून, हे जगात सर्वात जास्त आहे. रशियाकडून तेल खरेदीसाठी भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादण्यात आले आहे. या ठरावामुळे आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याच्या अंतर्गत भारतीय वस्तूंवर व्यापक शुल्क लादण्यासाठी ट्रम्प यांनी लागू केलेली राष्ट्रीय आणिबाणी संपुष्टात येईल आणि पूर्वीच्या परस्पर शुल्कांव्यतिरिक्त १७ ऑगस्ट रोजी लागू झालेली अतिरिक्त २५ टक्के दुय्यम शुल्क रद्द केले जाईल.

या उपायांमुळे अनेक भारतीय उत्पादनांवरील शुल्क ५० टक्क्यांपर्यंत वाढले, असे रॉस यांनी निवेदनात म्हटले आहे. ट्रम्प यांची भारताप्रतीची बेजबाबदार शुल्क नीती हा एक प्रतिउत्पादक दृष्टिकोन आहे. यामुळे महत्त्वपूर्ण भागीदारी कमकुवत करतो, असे कृष्णमूर्ती यांनी सांगितले. अमेरिकेचे हित किंवा सुरक्षा साधण्यासाठी हे शुल्क पुरवठा साखळीत व्यत्यय आणतात तसेच अमेरिकी कामगारांना नुकसान पोहोचवतात आणि ग्राहकांचा खर्च वाढवतात, असे त्यांनी स्पष्ट केले. हे हानिकारक शुल्क संपुष्टात आणल्यास अमेरिका भारतासोबत आपल्या सामायिक आर्थिक आणि सुरक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी संवाद साधू शकेल, असे कृष्णमूर्ती यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### नॉर्थ कॅरोलिनात भारतीयांची अब्जावधीची गुंतवणूक

व्यापार, गुंतवणूक आणि भारतीय-अमेरिकी समुदायाच्या माध्यमातून नॉर्थ कॅरोलिनाची अर्थव्यवस्था भारताशी खोलवर जुळलेली आहे. भारतीय कंपन्यांनी आमच्या राज्यात एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. या माध्यमातून जीवन वित्रान आणि तंत्रज्ञान तसेच इतर क्षेत्रांमध्ये चांगल्या पगाराच्या हजारो नोकऱ्या निर्माण केल्या जात आहेत, असे डेबोरा रॉस यांनी सांगितले.

# 'सात बहिणी' बांगलादेशच्या नकाशात दाखविणाऱ्या हादीवर झाडल्या गोळ्या

◆ **ढाका, १३ डिसेंबर**

ईशान्य भारतातील सात राज्ये बांगलादेशच्या नकाशात दाखविणारा आणि २०२४ मधील शेख हसीना सरकारविरोधातील मुख्य विद्यार्थी चेहरा शरीफ उस्मान हादी याच्यावर शुक्रवारी ढाक्यात अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. डोक्यात गोळ्या लागल्याने हादीची प्रकृती गंभीर आहे. हादी 'इन्कलाब मंच'चा प्रवक्ता असून तो अपक्ष म्हणून निवडणुकीत उभा आहे. शुक्रवारी बिजॉयनगर भागात प्रचार करीत असताना दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी जवळून गोळ्या झाडल्या आणि पळून गेले. हादीला तत्काळ ढाका मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. डोक्यात गोळी अडकल्याने त्याची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी



सांगितले आहे. हादी हा राजकीय कार्यकर्ता, लेखक आणि उजव्या विचारसरणीला मानणारा आहे.

राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रावर त्याने अनेक पुस्तके लिहिली आहेत. इस्लामिक गुन्हे लवादाने शेख हसीना वाजेद यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर त्याने शिक्षा हा एक धडा असल्याचे वक्तव्य केले होते. हसीना यांचे सरकार उलथून लावण्यात 'इन्कलाब मंच'चा मोठा सहभाग आहे. हसीना यांचा राजकीय पक्ष अवामी लीगला दहशतवादी संघटना जाहीर करून कायमचे संपविण्याची मागणी हादीची आहे.

२०२४ मधील हसीना सरकारविरोधातील उठावात हादीने कार्यकर्त्यांची फळी उभारून मोठे आंदोलन उभे केले. लेखक असल्याने राष्ट्रीय एकता आणि संस्कृती रक्षणाच्या मुद्यावर त्याने युवकांची माथी भडकावत त्यांना हिंसाचार करण्यास प्रवृत्त केले. त्याच्यावर कुणी हल्ला केला हे मात्र कळू शकले नाही. (वृत्तसंस्था)

### नकाशा पोस्ट केल्यानंतर एका तासाने झाला हल्ला

भारताचा कट्टर विरोधक असलेल्या शरीफ हादीने जम्मू-काश्मीरचा पाकिस्तानच्या नकाशात तर भारताची ईशान्येकडील सात राज्ये बांगलादेशात नकाशात दाखविली. हा नकाशा शुक्रवारी दुपारी सोशल मिडियावर पोस्ट केला. त्यानंतर एका तासाने हादीवर गोळ्या झाडण्यात आल्या.



हिमाचल प्रदेशातील शिमला येथे भारतीय जनता पार्टीच्या नव्या प्रदेश कार्यालयाच्या उभारणीची पायाभरणी शनिवारी राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा याच्या हस्ते करण्यात आली. यानंतर झालेल्या 'रोड शो'ला मोठ्याप्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते

# एच-१बी व्हिसा नियमांविरोधात १९ राज्यांची न्यायालयात धाव

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या अडचणीत वाढ, अर्थव्यवस्था कमकुवत

**वॉशिंग्टन, १३ डिसेंबर**

अमेरिकेमध्ये एच-१ बी व्हिसासंदर्भात लागू करण्यात आलेल्या नव्या नियमांना १९ राज्यांनी वॉशिंग्टन येथील एका न्यायालयात आव्हान दिले आहे. यात वॉशिंग्टन, कॅलिफोर्निया राज्यांच्या ॲटर्नी जनरलचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच१- बी व्हिसांसाठी लागू केलेले नियम अमेरिकेचे आर्थिक नुकसान करणारे असून हा निर्णय राज्यांसाठी धोकादायक असल्याचे न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अर्जात म्हटले आहे.

ट्रम्प यांच्या नव्या एच१-बी व्हिसा अर्जांचे शुल्क थेट १ लाख डॉलर (सुरे ८० लाख रुपये) पर्यंत वाढवण्याच्या निर्णयाला अमेरिकेतील राज्यांचा विरोध आहे. या निर्णयाविरोधात कॅलिफोर्नियाच्या नेतृत्वाखाली अमेरिकेतील १९ राज्यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे, ज्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या अडचणी वाढल्या. कॅलिफोर्नियाचे ॲटर्नी जनरल रॉब बॉन्टा यांच्या नेतृत्वाखाली दाखल केलेल्या याचिकेत म्हटले की, ट्रम्प सरकारचा हा निर्णय केवळ बेकायदेशीर नसून, तो फेडरल कायद्याचे उल्लंघन करणारा आहे. नियम लागू करताना ट्रम्प प्रशासनाने ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्रोसिजर ॲक्टकडे दुर्लक्ष करून काँग्रेसच्या मंजुरीशिवाय हे पाऊल उचलले आहे, जे त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेरचे आहे. एच-१बी व्हिसा कार्यक्रम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या टेक्नॉलॉजी, हेल्थकेअर आणि एज्युकेशन यांसारख्या क्षेत्रांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

# शहर प्रारूप विकास आराखड्यात ३ फेरबदलाचे राजपत्र प्रसिद्ध

**सक्षम मंजुरी असलेले नाले, वसुंधरा कला महाविद्यालयाच्या उत्तर सीमेने रस्ता प्रस्तावित**

**रेल्वे लाईन सरकारी पड जागेवरील गार्डन वापर रद्द करून तो राहिवास विभागात समाविष्ट**

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १३ डिसेंबर -**

सोलापूर शहराच्या प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने केलेले ३ फेरबदल प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर दर्शवून नागरिकांच्या माहितीसाठी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले आहे. हे फेरबदल बदल निळया रंगाने उक्त प्रारूप विकास योजनेत दर्शविण्यात आले असून हा नकाशा महानगरपालिका आयुक्त यांच्या कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे तसे प्रसिद्धीकरण केले आहे.

सोलापूर शहराच्या प्रारूप विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलग २८ (४) अन्वये केलेल्या बदलांचे व नकाशाचे. आज राजपत्र प्रसिद्धीकरण करण्यात आले आहे सोलापूर महानगरपालिकेने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २६ (१) नुसार सोलापूर महानगरपालिका संपूर्ण क्षेत्राची प्रारूप विकास योजना सुधारित करून ती दिनांक २७ डिसेंबर २०२४ चे सुचनेद्वारे नागरिकांच्या सूचना हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. ही सूचना दि.२८ जानेवारी २०२५ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र, पुणे विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये आणि स्थानिक वृत्तपत्रामध्ये जनतेकडून हरकती सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला होता.

प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून अधिनियमाच्या कलम २८ (२) मुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल नियोजन प्राधिकरणाकडे दि. १६ जुलै २०२५ रोजी सादर केला आहे. नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती नियोजन प्राधिकरणाने, तो मान्य करून, प्रारूप विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अंतर्गत फेरबदल बदल करण्यासाठी व हे फेर बदलांसह अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्रमांक २३४, दि. १५ सप्टेंबर २०२५ नै पारित केला आहे.

प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार खालीलप्रमाणे केलेला फेरबदल प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर दर्शवून नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी म्हटले आहे.

### प्रारूप विकास आराखड्यात हे आहेत अंतर्गत फेरबदल

प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर पर्जन्यजल / पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाने सादर केलेल्या सोलापूर शहराच्या शहर आपत्ती व्यवस्थापन आराखडा व तांत्रिक सर्वेक्षण अहवालानुसार, शहर आपत्ती व्यवस्थापन समितीने सक्षम मंजुरी प्रदान केलेले नाले दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच, मौजे मजरेवाडी सर्वे क्रमांक १२९ व १३० मधील वसुंधरा कला महाविद्यालयाच्या उत्तरेस असलेला पूर्व-पश्चिम दिशेचा १२ मीटर रुंदीचा रस्ता दर्शविणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक एमएसआरएलएम, सोलापूर यांच्या मागणी अन्वये व जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार सोलापूर शहरातील रेल्वे लाईन सि.स.नं. ८४०७, क्षेत्र १४०० बी. मी. सरकारी पड जागेवरील गार्डन वापर बदलून रहिवास वापर दर्शविणे आवश्यक असल्याने, प्रशासकीय ठराव क्रमांक २४७, दिनांक २४ सप्टेंबर २०२५ मध्ये आवश्यक सुधारणा करून त्यास मान्यता देण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# शासन, प्रशासन आणि दु:शासन

शासन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, शासनास अपेक्षित दिशा देता येते, पण सुशासन प्रस्थापित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. त्या प्रयत्नांत थोडासा ढिसाळपणा झाला की सुशासनाच्या स्वप्नांची कशी विल्हेवाट लागते, याचे एक ताजे उदाहरण सध्या देशातील जनतेच्या सुशासनाच्या अपेक्षाभंगासाठी पुरेसे ठरू पाहात आहे. भेसळयुक्त, बनावट औषधांची प्रकरणे उघडकीस आल्याने आरोग्य व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हे उमटू लागलेली असतानाच वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या कारभाराला शिस्त लावणाऱ्या यंत्रणाच या क्षेत्रातील गैरकारभाराची लक्तरे लपविण्यासाठी भ्रष्ट मार्गाने कार्यरत होत असल्याचे ढळढळीत प्रकरण सक्तवसुली संचालनालयाने सीबीआयच्या तपासानंतर उघडकीस आणले आहे. प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी, शिक्षण संस्थाचालक आणि ज्यांनी आपल्या गुणवत्ता व कामगिरीमुळे समाजाच्या आदराचे स्थान संपादन केले आहे, अशा मुखवट्यांखालचे भ्रष्ट चेहरे या कारवाईतून उघड होऊ लागल्याने, सुशासनाचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्य जनतेस दु:शासनाची रूपे दिसू लागली आहेत. ही कारवाई उघडकीस आली, त्याला आता जवळपास सहा महिने उलटले आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांच्या तपासणीसाठी दाखल होणाऱ्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या पथकाची पूर्वसूचना देऊन कारभारातील त्रुटी लपविण्याची संधी देण्याच्या मोबदल्यात भ्रष्ट मार्गाने कमाई करणाऱ्या उच्चपदस्थांमुळे सुशासनाच्या स्वप्नांचे पंखच कापले गेले आहेत. गेल्या ऑगस्टमध्ये सीबीआयने या टोळीतील कारस्थाने उद्‌ध्वस्त करून रायपूर न्यायालयात त्यांच्या विरोधात आरोपपत्रही दाखल केले. वैद्यकीय महाविद्यालयांतील व्यवस्थापनाच्या त्रुटी, आर्थिक गैरव्यवहार आणि प्रवेश आदींमधील भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये यासाठी तपासणी पथकाच्या दौऱ्याआधीच या महाविद्यालयांना सावध करणे आणि त्याच्या मोबदल्यात भक्कम लाच उकळणे हा या टोळीचा कारभार यानंतर उजेडात आला. ही पथके कोणत्या आपल्या तपासणीदरम्यान कोणत्या बाबींवर विशेष भर देणार आहेत, याची माहितीही अगोदरच या संस्थांना विश्वसनीय मध्यस्थांमार्फत दिली जात असल्याचाही आरोप आहे. रायपूरमधील वैद्यकविज्ञान आणि संशोधन केंद्र हे या प्रकरणाच्या केंद्रस्थानी होते. तेथील काही प्रकार उजेडात आल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने धाडींचा धडाका लावला आणि एक प्रशासन व्यवस्थेतील दु:शासनांचे मुखवटे उजेडात येऊ लागले. या प्रकरणात सीबीआयने ज्या १२ जणांवर गैरव्यवहारांचा वा लाचखोरीचा ठपका ठेवला आहे, त्यामध्ये रायपूरच्या त्या संस्थेचा अध्यक्ष व संचालकाचा मोठा सहभाग असल्याचा आरोप आहे. या भ्रष्ट कारभाराची कल्पना त्यांच्या मेंदूत जन्माला आली आणि त्यांनी या कटाची आखणी केली, असाही सीबीआयचा संशय आहे. उदयपूरमधील एका विद्यापीठाचा कुलसचिव हा या कटातील आरोपी क्रमांक एक आहे. तपासणीदरम्यान कोणत्या बाबींवर भर दिला जाईल याची गुप्त माहिती संबंधित संस्थांना देण्याची यंत्रणा त्याने उभी केली, असे सांगण्यात येते, तर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या प्रकल्प प्रमुख म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्याचाही आरोपींच्या यादीत समावेश आहे. ३० जून रोजी रायपूरच्या या संस्थेच्या तपासणीनंतर संस्थेच्या कारभारातील त्रुटी लपविणारा अहवाल सादर करण्यासाठी या दोघांनी अन्य चौघांच्या साथीने मोठी लाचखोरी केल्याचा सीबीआयचा आरोप आहे. रायपूर तपासणी प्रकरणात ३० लाख ते ५० लाखांच्या लाचेचा सौदा झाल्याचा व त्या मोबदल्यात, तपासणी पथकातील अधिकाऱ्यांची नावे, त्यांच्याकडून तपासणी केली जाणाऱ्या संभाव्य व्यवहारांचा व नोदींचा तपशील, आदींची माहिती आगावू पुरविण्यात आली, एवढेच नव्हे, तर या तपासणीतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी नकली शिक्षक आणि बनावट रुग्णांची व्यवस्था करण्याकरिताही यांनी पुढाकार घेतला होता. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे काही अधिकारी आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अधिकारी यांच्यातील या साटेलोट्यातून सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती सीबीआयच्या निदर्शनास आल्यानंतर आणि या भ्रष्टाचारातील मध्यस्थासंबंधीची माहिती मिळाल्यानंतर सीबीआयने ही कारवाई सुरू केली आणि समोर येणाऱ्या एकाएकी व्यवहाराचे दुवे जोडून एक मोठी साखळी उजेडात आणली. सरकारी अधिकारी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे व्यवस्थापन यांच्यातील हे साटेलोटे वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेच्या दर्जाचा बोजवारा लावणारे ठरणार असल्याने त्याची गंभीर दखल घ्यावयास हवी. कारण, या प्रकरणात हात असल्याचा आरोप असलेल्या उच्चपदस्थांचा सहभाग पाहता, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नाजूक बाबींचे अनेक अदृश्य कंगोरे उलगडण्याची व या क्षेत्राची गुणवत्ता टिकविण्यासाठी आवश्यक ती पावले तातडीने उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

गेल्या महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात, २८ नोव्हेंबरला सक्तवसुली संचालनालयाने आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीतील १५ ठिकाणी धाडी घातल्या आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या तपासणी प्रक्रियेतील भ्रष्टाचाराचा मुखवटा फाडला. लाचखोरी, गुन्हेगारी स्वरूपाची कटकारस्थाने आणि बनावटगिरी अशा गुन्हेगारीचे सारे प्रकार या एकाच प्रकरणात एकमेकांत गुंतलेले स्पष्ट होऊ लागले असून समाजातील काही उच्चभ्रूंनी आणि सरकारी यंत्रणेतील काही उच्चपदस्थांनी या भ्रष्टाचारात हात धुऊन घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकारी, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अधिकारी, दलाल आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रतिनिधी यांच्या टोळीने भ्रष्टाचाराची ही मजबूत साखळी तयार केली असून, वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी लपविण्यासाठी तपासणीआधीच पथकाच्या हालचालींची खबर देण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाचखोरी केल्याचे हे प्रकरण देशाच्या सुशासनाच्या वाटचालीस धक्का देणारे ठरणार आहे. एकीकडे सुशासनाची स्वप्ने पाहणारी सामान्य जनता, दुसरीकडे त्यासाठी ध्येयभावाने प्रयत्न करणारे सरकार आणि त्याला सुरुंग लावून व्यवस्थेला



आव्हान देणाऱ्या दु:शासनाच्या या अवतारांमुळे यंत्रणांच्या विश्वासार्हतेलाच कोंडीत पकडले आहे.

लोकशाही राज्यकारभारात कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देणारी व्यवस्था म्हणजे सुशासन, असे ढोबळमानाने मानले जाते. भ्रष्टाचारावर संस्थात्मक बंधने आणणारी प्रभावी व्यवस्था अशीही सुशासनाची संकल्पना आहे. किमान सुरक्षित आणि समाधानी जगण्याचा मूलभूत हक्क जपला जावा अशी सामान्य नागरिकांची अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण व्हावी यासाठी नागरिकांनी सुशासनासाठी आग्रही असले पाहिजे हे खरेच, पण जे शासन नागरिकांच्या या मागणीस योग्य प्रतिसाद देते, तेथे सुशासनव्यवस्था मूळ धरू लागते. त्यामुळे, सुशासनाची संकल्पना अगोदर नागरिकांमध्ये म्हणजे समाजात खोलवर रुजणे आवश्यक आहे, असे जागतिक बँकेने १९९२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'शासन प्रक्रिया व विकास' या अहवालात आधुनिक सुशासनाची मांडणी करताना स्पष्ट केले आहे. भारतामध्ये माहितीचा अधिकार, नागरिकांची सनद, ई-शासन, आधार, मनरेगा या योजना आणि धोरणांच्या माध्यमातून सुशासानाच्या दिशेने महत्त्वाची पावले टाकलेली आहेत. लोकशाहीची बांधिलकी, कार्यक्षम आणि खुले प्रशासन, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील स्पर्धा तसेच बाजारपेठांचा नैतिक व्यवहार सांभाळणारी कोणतीही राज्यव्यवस्था ही सुशासनाची वैध राज्यव्यवस्था मानली जाते. या व्यवस्थेत नि:पक्ष आणि स्वतंत्र न्यायपालिका, समानतेवर आधरित कायदे आणि कायद्याचे राज्य हीच प्रमुख वैशिष्ट्ये असावीत, असा संकेत आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात, प्लेटोच्या रिपब्लिक व ॲरिस्टॉटलच्या पॉलिटी या अभिजात ग्रंथसंपदेतही सुशासन या संकल्पनेची अशीच तात्त्विक मांडणी केलेली आढळते.

देशाच्या विकासासाठी आर्थिक आणि सामाजिक स्रोतांचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी सत्तेचा योग्य वापर करणे, भ्रष्टाचार कमी करणे, अल्पसंख्यकांचे मत लक्षात घेणे, वंचित व दुर्बल घटकांना निर्णय निर्धारण प्रक्रियेत योग्य स्थान देणे, तसेच समाजाच्या वर्तमान आणि भविष्यकालीन गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करणे या जबाबदाऱ्यांचे सुशासन व्यवस्थेस पुरते भान असते. दारिद्र्य निर्मूलन आणि विकास कार्य संवर्धनातही सुशासन हाच सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. या व्यवस्थेमध्ये शासन, प्रशासन व सामान्य जनतेचाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग अपेक्षित असतो. त्यामुळे गेल्या काही वर्षांत आपल्या देशात सुशासनाची जी काही चर्चा सुरू आहे, त्यामध्ये समाजाचा आणि व्यवस्थेचा सहभाग प्रामाणिक आहे का, हे पाहणे गरजेचे ठरते. भ्रष्टाचार हा सुशासन व्यवस्थेसमोरील मोठा कोलदांडा आहे, हे सार्वत्रिक सत्य आहे. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार असतात. आर्थिक भ्रष्टाचाराबरोबरच नैतिक भ्रष्टाचारात आकंठ बुडालेल्या व्यवस्था सुशासनाच्या अपेक्षापूर्तीमध्ये पुरेसा सहभाग नोंदविण्यास असमर्थ ठरतात, हे वारंवार दिसू लागल्याने, सुशासन ही केवळ संकल्पनाच राहणार की ती अपेक्षा पूर्ण होण्याचे जनतेचे स्वप्न साकार होणार यावर गांभीर्याने विचार व्हावयास हवा. रामराज्य, सुशासन या सुखी समाजव्यवस्थेच्या सुंदर संकल्पना आहेत यात शंका नाही. अनेक शतकांपासून या संकल्पनांची स्वप्ने समाजाने आपल्या मनात जपलेली आहेत. प्रत्यक्ष रामराज्याच्या काळातही रावणासारख्या प्रवृत्ती आणि दानवांच्या राज्यात सुशासनाची वानवा असल्याने, त्या काळातील समाजानेही सुशासनाच्या अपेक्षेने रामाच्या राज्याकडे पाहिले होते आणि तेथे समाजास अपेक्षापूर्तीची चिन्हे दिसू लागल्याने रामराज्य आणि सुशासनव्यवस्थेची पायाभरणी झाली.

अकरा वर्षांपूर्वी, २०१४ मध्ये देशात सत्तांतर झाल्यानंतर जनतेला उद्देशून केलेल्या आपल्या पहिल्या जाहीर भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला अशाच सुशासनाची हमी दिली होती. आपला देश सुशासनाच्या दिशेने वाटचाल करत असल्याची अनेक चिन्हे शासन आणि प्रशासनाच्या लोकाभिमुख कारभारात उमटलेली दिसतात. पण ही वाटचाल अजूनही निर्वेध झालेली नाही. भ्रष्टाचारमुक्त भारत हे मोदी सरकारचे स्वप्न होते. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' ही मोदी यांनी पंतप्रधानपदी आरूढ होताच देशाला दिलेली ग्वाही जनतेच्या कायमच स्मरणात आहे. यामुळेच सुशासन व्यवस्थेच्या जुन्या अपेक्षांना नव्या आश्वस्तभावाचे बळ मिळाले असले तरी प्रत्यक्षात मात्र, सुशासनाच्या वाटेवरील सर्वाधिक काटेरी अडथळा असलेल्या भ्रष्टाचाराचे नवनवे नमुने समोर येतात तेव्हा पुन्हा स्वप्नपूर्तीच्या अपेक्षांना निराशावादाच्या भावनेचा विळखा पडतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी, त्याला आळा घालण्यासाठी देशातील सक्षम यंत्रणा सातत्याने ज्या काही कारवाया करत असतात, ते पाहता हा अडथळा दूर करणे तितकेसे सोपे नाही याची खात्रीदेखील पटते. देशाला सुशासन देण्याच्या मोदी सरकारच्या संकल्पात सहकार्य करण्याची समाजाची मानसिकता आहे, या कामात आपल्या जबाबदारीचा वाटा उचलण्याची समाजाची तयारीदेखील आहे. कारण सर्वसामान्य जनतेस भ्रष्टाचाराची चीडच आहे. भ्रष्टाचार नष्ट झाला तर जगणे खऱ्या अर्थाने सुसह्य होईल याची सर्वसामान्य जनतेस जाणीवही आहे. पण हा अडथळा दूर करून सुशासनाची उभारणी करण्याची जबाबदारी असलेल्या प्रशासन यंत्रणांमध्येच भ्रष्टाचार बोकाळल्याचे दिसते, तेव्हा पंतप्रधानांनी अकरा वर्षांपूर्वी दिलेल्या ग्वाहीला प्रशासनातील जबाबदारींकडूनच पाने पुसली जात असल्याची जनतेची भावना लपून राहात नाही. भ्रष्टाचाराविरोधात कंबर कसलेल्या सक्तवसुली संचालनालयासारख्या यंत्रणांच्या कारवाईचा दररोजचा धडाका पाहता, भ्रष्टाचाराचा विळख्यात घट्ट आवळल्या गेलेल्या व्यवस्थांचे खरे रूप उघड होते आणि शेकडो वर्षांपासूनच्या रामराज्य आणि सुशासनाच्या अपेक्षा प्रत्यक्षात येण्याच्या उमेदीला ग्रहण लागते.

आणखी दहा दिवसांनी, २५ डिसेंबर रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त देशात सुशासन दिवस साजरा केला जाईल. प्रत्येक वर्षी या दिवशी देशात सुशासन दिवस साजरा केला जातो. केवळ प्रशासनाबाबतच नव्हे, तर देशातील प्रत्येक सामान्य नागरिकांच्या हितास सरकारचे प्राधान्य आहे, याची जाणीव जागी राहावी याकरिता हा दिवस साजरा करण्याचा सरकारचा उद्देश आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या शासनकळात सुशासनाचा सिद्धांत कार्यशैलीचा केंद्रबिंदू राहावा याकरिता विशेष लक्ष दिले होते. जबाबदारीची जाणीव, उत्तरदायित्वाची भावना, पारदर्शक कारभार आणि सर्वसमावेशक विकास ही सुशासन व्यवस्थेची चतु:सूत्री मानली जाते. तीच भावना घेऊन केंद्र सरकार दरवर्षी १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर या काळात सुशासन सप्ताह साजरा करते. सुशासनाची ही संकल्पना देशाच्या प्रशासन व्यवस्थेच्या अखेरच्या स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे आणि सरकार पारदर्शक, प्रभावी व उत्तरदायित्वाच्या जाणिवा जपणारे आहे याची जनतेसाठी खात्री पटली पाहिजे, ही यामागची सरकारची, म्हणजे शासनाची भावना आहे. अर्थात, शासन स्तरावर या जाणिवांचा सतत पुनरुच्चारही होत असतो आणि त्याचे प्रतिबिंबही शासनव्यवस्थेत दिसावे याकरिता आग्रहदेखील धरला जात असतो. सुशासनाच्या संकल्पनेस भारतीय राज्यव्यवस्थेच्या परंपरेला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. याला राजधर्म असेही म्हटले जाते. न्याय, निष्पक्षता आणि जनतेचे कल्याण हा राजधर्माचा पाया मानला जातो. अशा उदात्त विचारसरणीचा शासन स्तरावर सातत्याने पुनरुच्चार केला जातो, त्याचे अनुकरण करण्याचा आग्रह धरला जातो, त्याला प्रशासनाच्या स्तरावर मात्र असा छेद दिला जातो, हे या भ्रष्ट साखळीच्या गैरकारभारातून उघड झाले आहे. म्हणूनच, देशाच्या आरोग्य यंत्रणेला लागलेली अशाच भ्रष्टाचाराची कीड सक्तवसुली संचालनालयास सापडल्याने पुन्हा एकदा अपेक्षापूर्तीच्या स्वप्नाची कसोटी सुरू झाली आहे. जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज कोविड महामारीच्या संकटात अधिक ठळकपणे अधोरेखित झाली होती. या व्यवस्थेलाच भ्रष्टाचाराने ग्रासल्याने, आरोग्य व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर आणि एकूणच सुशासनातील सहभागाच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्हे उभी राहिली आहेत. भ्रष्टाचार हाच सुशासनाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे, हे उघड असल्याने, केवळ स्वप्ने पाहणे पुरेसे नाही. आता सुशासनाच्या स्थापनेसाठी समाजानेही सक्रिय व्हायला हवे. दु:शासनाचे अवतार घेतलेल्या या भ्रष्ट यंत्रणांनी हे आव्हान समाजासमोर उभे केले आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### अनोखा आकाशनिंब

शनिवार, ६ डिसेंबरच्या तरुण भारतच्या आकांक्षा पुरवणीत 'गुलदस्ता' अंतर्गत निशिकान्त मायी यांचा आकाशनिंब या फुलाविषयीचा लेख वाचनीय तसेच माहितीपूर्ण आहे. एका दुर्लक्षित वनस्पतीला प्रकाशात आणल्याबद्दल आभार. कारण वैशाख महिन्यात सर्वत्र शुष्क वातावरण असताना हा वृक्ष मात्र बहरतो. याचा बुच असेही म्हणतात. याचा सुगंध आसमंतात दरवळतो. सर्वांत जास्त सुगंधी फुले असतात.



या फुलांनी मन मोहून जाते. गावशिवारात गाई-जनावरे चारणारे गुराखी या झाडाला चांगले ओळखतात. रात्रीच्या सुमारास या फुलांचा वास दूरवरपर्यंत पसरतो. नवचैतन्य आणणारे, निराशा घालवणारे फूल म्हणून या आकाशनिंबाची ओळख आहे. मुक्कामी असलेल्या ग्राहकांना वातावरण सुगंधी मिळावे म्हणून हॉटेल आणि रिसॉर्टमध्ये या वृक्षाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या झाडाच्या खोडाचा उपयोग औषधी-अत्तर व्यवसायात केला जातो. निशिकान्त मायी यांनी प्रकाशात आणलेल्या आकाशनिंबाच्या माहितीने त्यांचे आणि तरुण भारतचे आभार.

**अशोक ढाकूलकर**/७६६६१६०९८६

### कुटुंब व्यवस्थेला लागलेली कीड

बरेली येथील कुटुंब न्यायालयाने अलिकडेच दिलेल्या एका निर्णयाने समाज माध्यमांवर चर्चा रंगली आहे. एका शिक्षिकेने पतीच्या संयुक्त कुटुंबात राहण्यास नकार दिल्याने तिच्या विवाहात गंभीर दुरावा निर्माण झाला. पतीने दाखल केलेली घटस्फोटाची याचिका न्यायालयाने मंजूर करताना, ''ज्या महिलांना लग्नानंतर केवळ पतीसोबतच राहायचे आहे त्यांनी आपल्या बायोडेटातच नमूद करावे की त्यांना आई-वडील किंवा नातेवाईक नसलेला जोडीदार हवा आहे,'' अशी कठोर टिप्पणी न्यायाधीशांनी केली. संयुक्त कुटुंबव्यवस्थेला ओझे मानण्याची ही प्रवृत्ती समाजातील मूल्यांवर गंज चढवणारी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. शिक्षिका असूनही वधूने कुटुंबातील मूल्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचेही न्यायालयाने नमूद केले. ही घटना केवळ दोन व्यक्तींमधील मतभेद नसून समाजाच्या बदलत्या मानसिकतेचा दाहक नमुना असल्याचे या प्रकरणातून जाणवते. बरेली न्यायालयाच्या निर्णयातून समोर आलेली ही घटना मन अस्वस्थ करणारी आहे. एका शिक्षिकेसारख्या संस्कार देणाऱ्या व्यक्तीकडून संयुक्त कुटुंबाविषयी इतका तीव्र तिरस्कार प्रकट होणे आणि त्या तिरस्काराचा परिणाम वैवाहिक नातेसंबंधावर होणे, हा केवळ एका घराचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या मूल्यरचनेवर प्रकाश टाकणारा प्रसंग आहे. हिंदू समाजाची शेकडो वर्षांची कुटुंबव्यवस्था ही एकमेकांना स्वीकारून, जबाबदाऱ्या वाटून आणि नातेसंबंध जपत उभी राहिली आहे. त्या व्यवस्थेला आज काही जण ओझे, बंधन किंवा अडथळा मानू लागले आहेत; हे परिवर्तन निरागस नाही, तर समाजाच्या संतुलनाला धक्का पोहोचवणारे आहे.

न्यायालयाने केलेली टिप्पणी साधी नाही; ती एक आरसा आहे. ''पतीसोबतच राहायचे असेल तर बायोडेटात लिहा की त्याचे आई-वडील नसावेत,'' या वाक्यात एका विकृत सामाजिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे. विवाह म्हणजे दोन व्यक्तींचे एकत्र येणेच नव्हे, तर दोन कुटुंबांची सांगडही आहे हा मूलभूत सत्यार्थ विसरला जाऊ लागल्याची वेदनादायी जाणीव या प्रकरणात होते. संयुक्त कुटुंब व्यवस्थेला ओझे समजण्याची वृत्ती जेव्हा शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीकडून दिसते, तेव्हा ती स्थिती आणखी गांभीर्याने समोर येते. ज्यांना विद्यार्थ्यांना संस्कार देण्याची जबाबदारी आहे, त्यांच्याच मनात आपल्या मुळांबद्दल इतकी दुरावलेली भावना असणे हे प्रश्नचिन्ह उभे करते. हे सत्य आहे की, आजचा काळ वेगवान आहे, करीअर, वैयक्तिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वावलंबन या गोष्टींनी व्यक्ती स्वतंत्र आणि आत्मनिर्भर बनली आहे. मात्र स्वावलंबन म्हणजे नात्यांचा विसर नव्हे. वृद्ध आई-वडील ओझे नाहीत; पालकांना दुर्लक्षित करून तयार होणारे विवाह म्हणजे फक्त दोन व्यक्तींचे करारनाते नसून, मूल्यांच्या क्षयाची सुरुवात आहे. महाभारताचा दाखला देत न्यायालयाने सांगितलेली जीवनाची क्षणभंगुरता ही केवळ धर्मग्रंथातील सांगड नाही, तर आजच्या एकलकोंड्या जीवनपद्धतीवर केलेली कठोर टिप्पणी आहे. वृद्धाश्रमात दिवस ढकलणारी माणसे आणि चार भिंतींत एकाकी पडलेली तरुण जोडपी, ही स्थिती समाजाच्या पुढील पिढ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. ही घटना एका जोडप्याची वैयक्तिक समस्या नसून समाजातील शांतपणे वाढणाऱ्या मानसिकतेचे निदर्शक उदाहरण आहे. प्रेम, कर्तव्य, जबाबदारी, आदर या मूल्यांची माती सरकू नये यासाठी प्रत्येक घराला, प्रत्येक पालकाला आणि प्रत्येक तरुणाला अंतर्मुख होण्याची हीच वेळ आहे.

**गणेश जोशी**/मोर्शी

### संस्कृतीची वाटचाल...

सूर्याचा उजाळा, दिवसाची हळुवार सुरुवात, चिऊचिऊ करणारी चिमणी पाखरे, आईने दारी टाकलेला शेणपाण्याचा सडा आणि दरवाजापुढे असलेली रांगोळी, रस्त्यावरच्या प्रत्येक व्यक्तीस आकर्षित करीत होती. आईने पेटवलेली चूल, तव्यावरची भाकरी जणू मला बघून खुदुखुदु हसत होती. मनाच्या गाभाऱ्यात गुपित असलेली बालपणाची आठवण, एक आनंदमय जीवन आणि या पृष्ठभूमीवर मी तरुण झालो. पण बालपण मला हवंहवंस वाटते. कारण लहानपणातील जगणं, मित्रांचा एकोपा, एकमेकाप्रति असलेला जिव्हाळा, गावच्या खुल्या मैदानावर बेधुंद खेळता खेळता दिवसाचे भानही राहत नसे. बराच काळ लोटून गेला. कळता नकळता दिवस बदलत गेले. आज तंत्रज्ञान विकसित झाले. २० वर्षांआधी घरात टेलिफोन असणे प्रतिष्ठेचे समजले जायचे. गावागावात मोबाईल टॉवर पसरले, घराघरात एक नवाच गुरू शिरला. तंत्रज्ञानाला आपण आपलेसे केले. मोबाईलने आपल्याला एकमेकांशी जोडले. विचार केला तर तोडलेही. कारण आजच्या युवामध्ये तो प्रेमाचा परिमळ दिसत नाही. आता येणारी माहेरची माणसेही दिसत नाही. ती हुरहूर, ती व्याकुळता आज कुणालाही अनुभवायला येत नाही. हौशीने घेतलेला स्मार्ट फोन, मनात एकाच वेळी होत असलेले प्रश्न, घड्याळाच्या काट्याप्रमाणे पाठवलेले एसएमएस, व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब, या वेगवान जाळ्यात अडकलेले आपण. आजचा काळ मित्रांनो थोडा वेगळाच आहे. कारण आईला मम्मी, बाबाला पप्पा म्हणणारी आजची नवी पिढी. १० ते २० वयोगटातील बालकांचे तरुण-तरुणीचं खेळण्याच्या वयात बघायला टी. व्ही., हातामध्ये फोन आणि त्यांचं हरविलेले बालपण यावर थोडं लिहावेसं वाटते-

मैदान खेळण्याचे सुनेच आहे
पुस्तके नवी, गुरुजी तेच आहे
बदलली इथली माणसे
आकाश, धरती जुनीच आहे

भूतकाळाचे जर आपण अनुकरण केले, तर त्या काळात मुलं-मुली कुठल्याही गोष्टीचा विचार न करता खूप सारे खेळ खेळायचे. तेव्हाच्या तरुणी मेकअप करायच्या नाहीत. पंजाबी ड्रेसचा पेहरावा, राहणीमान साधे, माणुसकीचं एक जगणं, यावर क्षणभर तरी मी मग्न होतो. पण, जन्म आल्या जगात एकाच गोष्टीची मनाला खंत राहील. कारण आजच्या तरुणीच फुल मेकअप. पेरावा - जीन्स पॅन्ट टी-शर्ट, रस्त्याने चालताना कानाला लावलेला स्मार्टफोन, मग पुरुषांचा बघण्याचा दृष्टिकोन, डोक्यात विचित्र होत असलेले प्रश्न खूपच आगळेवेगळे आहेत. सांगायचे म्हटले की, काळजाच्या तळागाळात पोचणारी माणसं आयुष्यात थोडे कमीच भेटतात. आज स्पर्धेचे युग आहे, हे मी मान्य करतो. आजचे तरुण-तरुणी खूप जिद्दी आहेत. अशी जिद्द कुण्या कामाची की मुले- मुली आपल्या आई-वडिलांचे सुद्धा ऐकत नाहीत? सांगायचे तात्पर्य एवढेच की कुणाची आई शिक्षिका असेल, कुणाची आई चार घरची भांडी धूत असेल, काबाडकष्ट करून मुला-मुलींची हौस मौज पूर्ण करीत असेल, मला तर त्यांचे नवलच वाटते. मुलीला घेऊन दिलेला महागडा फोन, रोजच्या न्यूज पेपरला येणारी बातमी - अमक्या गावाला मुलीचा विनयभंग, बलात्कार, मुलीचे शारीरिक शोषण... याला कारणीभूत फोनच आहे , हे तुम्हाला आज सांगायची गरज नाही! मुलाला घेऊन दिलेली गाडी एवढ्या वेगाने चालवितो. बाबा त्याला समजावून सांगण्याऐवजी त्याचे कौतुक करतात. मला सांगा, आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे आणि तो अपघातात कायम अपंग झाला, दुर्दैवाने मृत पावला तर आई-वडिलांनी आयुष्यभर रडायचं का? आपल्या मुला-मुलींना जपा. सुंदर संस्काराचा वर्षाव करा. तेव्हाच आपला देश, देशातील प्रत्येक तरुण-तरुणी सकारात्मक विचार करेल, काळ कितीही बदलला, लोक कितीही बदलले तरी आपण आपल्या संस्कृतीला हरू द्यायचं नाही.

**प्रशांत दामले**/८६०५५२१३६९

### भारताचे गौरवगीत वंदे मातरम्‌ची सार्धशती

आपली सनातन हिंदू संस्कृती या भारतवर्षाला केवळ राष्ट्र नव्हे, तर पुण्यभूमी मानते. हे राष्ट्र आमची मातृभूमी आहे, हे देवतांचे निवासस्थान आहे! या भरतभूमीवर जन्म मिळणे हे भाग्याचे लक्षण मानले जाते, कारण इथेच साधनेने मोक्ष प्राप्त होतो. म्हणूनच या भारतमातेच्या पोटी जन्म घेणे म्हणजे जन्माचे सार्थक होय. त्या पुण्यभू मातेचे वारंवार, दिवसरात्र, क्षणोक्षणी वंदन व्हावे आणि तिच्या सेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी अनेक थोर पुरुषांनी, संत-महंतांनी आपले अमृततुल्य जीवन समर्पित केले. याच मातृभूमीच्या वंदनासाठी प्रकट झालेले तेजस्वी गीत म्हणजे वंदे मातरम्. यावर्षी या अमर गीताची सार्धशती (१५० वर्षे) साजरी होत आहे! कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आजपासून दीडशे वर्षांपूर्वी आनंदमठ या त्यांच्या महान ग्रंथात रचलेले हे स्फूर्तिदायक गीत देशवासीयांना राष्ट्रप्रेमाच्या जाज्वल्य भावनेने झपाटून टाकते. मातृभूमीला आपले सर्वस्व आणि अंतिम समर्पण करण्याची प्रेरणा ते देते.वंदे मातरम् या गीताने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास सुवर्ण अक्षरांनी अंकित केला आहे. कित्येक राष्ट्रभक्तांनी हे गीत मुखात धारण करून परकीय सत्तेच्या बंदुकीच्या गोळ्या आपल्या शिरावर घेऊन हुतात्मा झाले आणि स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आपल्या प्राणांची आहुती दिली.



आज या वंदे मातरम् गीताची सार्धशती साजरी करताना आम्हाला विलक्षण आनंद आणि अभिमान वाटत आहे. प्राचीन आणि चिरंतन मातृभूमीचे भव्य आणि दिव्य वर्णन या गीतातून उत्कटतेने प्रकट झाले आहे. दीडशे वर्षे लोटूनही, आजही जेव्हा संपूर्ण वंदे मातरम् गीत गायले जाते, तेव्हा रोमारोमात राष्ट्र-स्फूर्ती आणि असीम ऊर्जा संचारते! वंदे मातरम् हे गीत केवळ शब्दांचे एक सुंदर संकलन नाही, तर ते भारताच्या आत्म्याचा हुंकार आहे. राष्ट्रभक्तीची रणगर्जना आहे. १८९६ मध्ये कोलकात्यातील काँग्रेस अधिवेशनात रवींद्रनाथ टागोरांनी हे गीत गायिले आणि त्यानंतर १९०५ च्या बंगाल फाळणी विरोधी स्वदेशी आंदोलनात हे गीत जनसामान्यांची रणगर्जना बनले. हे केवळ गीत नव्हते, तर ते ब्रिटिश सत्तेविरुद्धचा राष्ट्रीय विद्रोह होता. आजही आपल्या पुण्यभूमीत राहून, याच मातीचे अन्न खाऊन आणि याच पाण्याची कृतज्ञता पत्करून काही शक्तींना मातृभूमीचे वंदन करण्यास, वंदे मातरम् म्हणण्यास किंवा राष्ट्रीय अस्मिता स्वीकारण्यास लाज वाटते किंवा ते विरोध करतात. ज्या भूमीने त्यांना आश्रय दिला, अन्न दिले आणि सुरक्षितता दिली, त्याच भूमीच्या गौरवाचा स्वीकार न करणे, ही देशविघातक वृत्ती देशात फोफावते आहे. तर राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोठा धोका आहे. आपल्या पूर्वजांनी ज्या बलिदानातून ही भूमी स्वतंत्र ठेवली, त्या बलिदानाचे स्मरण करून, पुण्यभूमीच्या रक्षणासाठी आपण सदैव तत्पर राहायला हवे.

**अमोल तपासे**/नागपूर

### केअर टेकर जिहाद

आपल्याकडे पैसा आहे पण वृद्ध लोकांसाठी वेळ नाही. अशा वेळी आपल्या घरी श्रीमंत असलेली मुले, मुली केअर टेकर ठेवतात. कधी कधी असेही होते की आई-वडिलांच्या सेवेसाठी केअर टेकर ठेवला तर पॅड बदलविणे किंवा आपल्याला आपल्या वृद्धांची उचल खाचल जमत नाही तेव्हा केअर टेकर अंग पुसून देणे, चादर बदलवून देणे, पॅड बदलविणे अशी कामे सहज करतात. त्यांनी तसे ट्रेनिंग घेतले असते.

आई घरी एकटी आहे, ती स्वतःचे स्वतः सर्व करू शकते असे छोट्या शहरात चालते व शेजारी सुद्धा लक्ष ठेवतात. पण मोठ्या शहरात वृद्धांसाठी शेजारच्या लोकांना कुठे वेळ आहे. तेव्हा एक केअर टेकर अशी ठेवली जाते की ती सर्व घरची कामे व स्वयंपाक वगैरे सर्व करून देईल व तिथेच राहील. फक्त पैसे तसे मोजावे लागेल तर तेवढे बाहेर देशात किंवा बाहेरगावी असलेली मुले-मुली करतात. आईची किंवा वडिलांची काळजी आपण घेऊ शकत नाही तर पैसा तर लावू शकतो. आजकाल तर एक मुलगी असलेले पालक सुद्धा आपल्या मुलीला विदेशात शिक्षण घेण्यासाठी पाठवितात. मग वडील गेल्यावर आईसाठी अशी केअर टेकर बघतात की आईला एकटेपणा जाणवणार नाही .

अमरावती एका मित्राकडे बसलो असताना अशाच जिहादवर गप्पा चालल्या होत्या. एवढ्यात त्या वहिनींना केअर टेकर जिहाद विषय आठवला. मुंबईची घटना आहे. मोठे घर... घरात सर्व सुखसुविधा पैसा, दागिने भरपूर असा थाट त्या घरातील होता. पण वय वाढत जाते तस तसे मुलगी विदेशात शिक्षणासाठी गेली व तिथेच लग्न झाले. इकडे वडील स्वर्गवासी झाले. मग राहिली फक्त आई... ती राजबिंडे व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री एकटीच दिवस काढत होती. मग मुलगी आली. तिने आपल्या सोबत चलण्याचा आग्रह धरला पण आई काही ऐकत नव्हती. शेवटी मुलीने केअर टेकर लेडीज शोधली. ती केअर टेकर खरोखरच चांगली निघाली. जवळपास आठ महिने ती त्यांचं सर्व करत होती. मध्येच अचानक तिच्या आईची तब्येत खराब झाली म्हणून तिने तीन महिने येता येणार नाही असे त्या वृद्धेला सांगितले. सोबत तिने एक दुसऱ्या स्त्रीला घरात आणले व सांगितले की, आजपासून ही तुमची काळजी घेईल. तिने वृद्धेची सोय लावून दिली. ती गेली ती कायमचीच. ही नवीन बाई तिच्याचसारखी सेवा करायला लागली. सर्व काही आलबेल सुरू होते दोन तीन महिने तोवर तिने वृद्धेचा अभ्यास केला. हळूहळू वृद्धेला झोपेचे औषध जास्त प्रमाणात देऊन जास्तीत जास्त काळ झोपवून ठेवायला लागली. मग असे असे औषध वृद्धेला दिले की ती थोडी थोडी भ्रमिष्ट व्हायला लागली. केअर टेकर विशिष्ट समाजाची होती. आता तिचा नवरा, मुले सुद्धा घरात येऊन जाऊन होते. त्या सर्वांनी मिळून तिचे दागिने वगैरे लांबविले. एवढ्यावरच विषय संपला नाही तर त्यांनी त्या वृद्धेचे घर आपल्या नावावर करून घेतले. काही दिवसांनी त्यांनी ती पागल झाली म्हणून तिला घराबाहेर काढले. ती वृद्धा रस्त्यावर आली. ती सुद्धा भ्रमिष्ट झाली होती. मुंबईच्या रस्त्यावर फिरत होती.

मुलीला कळले तर ती केअर टेकर म्हणाली, तुम्हारी माँ पागल हो गयी है. तिने मुंबई गाठली तर चित्र फारच विदारक होते. त्या घरात त्या विशिष्ट समाजाच्या केअर टेकरची मुले व नवरा राहायला आले होते व त्यांनी मुलीला सांगितले की... तुमच्या आईने हे घर आमच्या नावाने केले आहे. हे ऐकून तिच्या पायाखालची जमीन सरकली. तिने काही राजकीय संबंध व काही हिंदुत्ववादी संघटनांचे नेते यांचे दरवाजे ठोठावले... पुढे काय झाले हे कळले नाही. या घटनेतून काय धडा घ्यायचा तो प्रत्येकाने घ्यावा. हा सुद्धा केअर टेकर जिहाद आहे. ही घटना सत्य आहे... तेव्हा सजग व्हा... जातिपाती विसरा... एकामेकांच्या व्यथा जाणून घ्या... अन्यथा हिंदूला सावज म्हणून टिपण्यासाठी हिंस्त्र पशू टपलेलेच आहेत.

**संजय अलकरी**/९४२०१८८२७५

### सांस्कृतिक दहशतवादाचे संकट

नैतिक मूल्ये आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्तीच्या आयुष्यासोबत समाजाच्या जडणघडणीत यांची महत्त्वाची भूमिका आहे. नैतिक मूल्ये समाजात शिस्त, जबाबदारी आणि परस्पर आदर निर्माण करतात. मात्र, जेव्हा समाजात नैतिक मूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात होते तेव्हा संस्कृती देखील ढासळू लागते. आजच्या आधुनिक युगात सामाजिक माध्यमांचा अतिरेक आणि त्यावरील अनियंत्रित सामग्रीमुळे सामाजिक मूल्यांचे अध:पतन होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आज लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण स्मार्टफोन वापरतात. ओटीटी, नेटफ्लिक्स या प्लॅटफॉर्मवर बहुतांश वेळा अश्लील व्हिडीओ दाखवले जातात. असे व्हिडीओ बघितल्यानंतर समाजात गुन्हेगारीचे प्रमाण, बलात्काराच्या घटना सातत्याने वाढत आहेत. गेल्या सहा महिन्यांतील काही भीषण घटना हेच दाखवतात. रक्ताच्या नात्याच्या लोकांनी केलेल्या बलात्काराच्या घटना अत्यंत घृणास्पद आहेत. आज घराघरात हा 'पॉर्नोग्राफी'रूपी राक्षस पोहोचला आहे. या राक्षसाच्या विळख्यातून बाहेर पडणे हे आज आपल्या देशापुढील मोठे आव्हान आहे. या राक्षसी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर कायदे, सामग्री नियंत्रणाचे कडक निकष आणि अशा व्हिडीओ निर्मिती व प्रसारणात सहभागी असणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

हा सांस्कृतिक दहशतवाद समाजासाठी अधिक धोकादायक आहे. म्हणूनच या सांस्कृतिक दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी नैतिक मूल्यांची कास धरणे हीच आजच्या भारताची खरी गरज आहे.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-७२

रविवार, १४ डिसेंबर २०२५

### गुरु वंद्य महान् भगवा एकचि जीवन प्राण

गुरु वंद्य महान् भगवा एकचि जीवन प्राण
अर्पण कोटि कोटि प्रणाम ॥धृ.॥

शोणित वर्णामधुनी शिकलो सारे उज्ज्वल त्याग
व्यापित आलो दिव्य दृष्टिने अखंड भारतभाग
बघुनी फडफड देशभक्तिची भडके अंतरि आग
कटिबद्ध उभे तव छत्राखाली भारतभूसंतान ॥१॥

शौर्याने तव जगी गाजला स्फूर्तिप्रद इतिहास
पाहिलेस निज नेत्रांनी किति भीषण रणसंग्राम?
देहदंड कुणि हाल भोगिले केले निज बलिदान?
बलिदान नव्हे ते पूजन केवळ राखाया सन्मान ॥२॥

ऋषी तपस्वी महामुनींचा संतांचा अभिमान
अनादिकालापासुनीच तुज अग्रपुजेचा मान
बघशिल भावी भाग्यपूर्ण अन् उज्ज्वल वैभवकाल
होउ यशस्वी असे सुमंगल देई शुभ वरदान ॥३॥

शुद्धशीलता पावित्र्याची चारित्र्याची खाण
अभय वीरता शौर्य धीरता संयम शांतिनिधान
सद्‌भावे तुज आम्हि मानिले पूज्य गुरू भगवान्
परमपावना तव पदि वाही देशास्तव हे प्राण ॥४॥

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




## संभाजी आरमार विद्यार्थी संघटनेचा मेळावा; विद्यार्थी शहरप्रमुखपदी गणेश नागणे

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

संभाजी आरमारच्या वतीने डॉ. निर्मलकुमार फडकुले पटांगण येथे विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आले होते. सोलापूर शहरातील जवळ-जवळ सर्वच महाविद्यालय आणि शाखांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी संघटना निवडी जाहीर करण्यात आल्या. विद्यार्थी संघटना शहरप्रमुखपदी गणेश नागणे याची निवड करण्यात आली. उपशहरप्रमुख रोहित वाघमारे, शुभम दासरी, आयर्न घुले, प्रदीप आडम, संपर्काप्रमुख निलेश मोटे, सचिव शुभम खंडागळे, सहसचिव रोहन घुले, संघटक आदित्य आडम, समर्थ डोंगरे, सुदर्शन शिवसिंगवाले, विवेक हलसगी, प्रसिद्धी प्रमुख यश कांबळे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी बोलताना विद्यार्थी मित्रांना छत्रपती शिवरायांच्या विचारांचा वारसा चालविण्याची आपली सगळ्यांची जबाबदारी असल्याचे सांगितले. निर्भयपणे विधायक कार्य करून संभाजी आरमारचा लौकिक वाढविण्यासाठी कार्यरत राहण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले. यावेळी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे,यांनी प्रास्ताविक केले. अजिंक्य पाटील नुतन पदाधिकार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन मनिष काळे यांनी केले तर आभार गिरीश देवकाते यांनी मानले. यावेळी संभाजी आरमारचे उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहर प्रमुख सागर ढगे, दक्षिण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, सोमनाथ मस्के, अर्जुन शिवसिंगवाले, राज जगताप, व्दारकेश बबलादीकर, राजू रच्चा, प्रदिप मोरे, उपस्थित होते.





## मसाप उत्तर सोलापूर शाखा संस्थापक अध्यक्षपदी सचिन ठोकळ यांची निवड

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद उत्तर सोलापूर शाखेच्या संस्थापक अध्यक्ष आणि माजी आमदार स्व.निर्मलाताई ठोकळ यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा उत्तर सोलापूर शाखेची नुकतीच पुनर्रचना करण्यात आली. त्यात सचिन ठोकळ यांची शाखेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सोलापूर जिल्हा प्रमुख पद्माकर कुलकर्णी यांच्या उपस्थितीत उत्तर सोलापूर शाखेच्या बाळे येथील कार्यालयात सदरची बैठक पार पडली. बैठकीत शाखेच्या अध्यक्षपदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीत शाखेचे इतर पदाधिकारी निवडण्यात आले. उपाध्यक्ष शिल्पा ठोकळ, कार्याध्यक्ष उज्वला साळुंखे, प्रमुख कार्यवाह संतोष काळुंके, कार्यवाह डॉ.नितीन आवताडे, सहकार्यवाह पूनम पाटील, कोषाध्यक्ष शिवाजी आतकरे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून सारंग पाटील, आशा भोसले, आशा ठोकळ, अब्दुलकादर मुजावर, विद्या पुजारी, निवृत्ती दळवी, हभप.ज्योती चांगभले, स्वाती गाजरे आदींची निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून पद्माकर कुलकर्णी, हभप सुधाकर इंगळे महाराज यांचीही यावेळी निवड करण्यात आली.

## पान १ वरुन




### भय्या चौकातील पूल आज पाडणार...

शनिवारी सुरुवातीला पुलावरील कॉंक्रीट काढले, त्यानंतर खालच्या बाजूचे सपोर्ट देऊन वरच्या बाजूने गॅस कटरने गरडर कट करण्यात आले. गॅसने कटिंग झाल्यानंतर क्रेनच्या साह्याने ते उचलून काढण्यात आले. पूल पाडकाम करताना रेल्वे रूळ बाधित होणार नाही याची काळजी रेल्वे कडून घेतली जाणार आहे. रविवारी सकाळी मेगा ब्लॉक घेतल्यानंतरच पुलाखालील बाजूस रुळावर पत्रे व प्लॉट टाकण्यात येणार आहे. यामुळे रुळास कोणतीही बाधा होणार नाही. पूलाचे पाडकाम झाल्यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या पद्धतीने सर्व साहित्य रुळावरून हटविण्यात येणार आहे.

**या गाड्या करण्यात आल्या रद्द**

होस्पेट - सोलापूर एक्सप्रेस, सोलापूर - होस्पेट एक्सप्रेस, सोलापूर - पुणे एक्सप्रेस, वाडी - सोलापूर डेमू, सोलापूर - दौंड डेमू स्पेशल, हडस्पर - सोलापूर डेमू, दौड - कलबुर्गी डेमू स्पेशल, सोलापूर - कलबुर्गी डेमू, कलबुर्गी - दौंड विशेष

**या गाड्या वळविण्यात येणार**

= पंढरपूर - मैसूर गोलगुंबज एक्सप्रेस ही पंढरपूर-मिरज-लोंढा-हुबळीमार्गे वळविण्यात येणार. =विजयपूर - रायचूर पॅसेंजर विजयपूर-होटगी-वाडीमार्गे वळविण्यात येणार =रायचूर - विजयपूर पॅसेंजर ही वाडी - होटगी - विजयपूरमार्गे वळविण्यात येणार=सीएसएमटी मुंबई - बेंगळूरु उद्यान एक्सप्रेस ही पुणे-मिरज-लोंढा-हुबळी-गदग-होस्पेट-बल्लारी-गुंटकलमार्गे वळण्यात येणार=एलटीडी मुंबई - विशाखापट्टणम एक्सप्रेस ही कुर्डूवाडी-लातूर-लातूर रोड-खानापूर-विकराबादमार्गे वळविण्यात येणार=पुणे - हैदराबाद शताब्दी एक्सप्रेस ही कुर्डूवाडी-लातूर-लातूर रोड-बिदर-विकाराब

# पालिकेत भगवा फडकवण्याची हीच योग्य वेळ

## माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे; शिवसेना शिंदे गटात प्रभाग १२ मधील कार्यकर्त्यांचा प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

खऱ्या अर्थाने सोलापूरचा विकास करायचा असेल तर शिवसेनाच सक्षम आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीमुळे सामान्य कार्यकर्त्याला बळ मिळत असून सोलापूर महानगरपालिकेत भगवा फडकवण्याची हीच योग्य वेळ असल्याचे मत माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी मांडले.

एमआयडीसी परिसरातील आशा नगर येथील प्रभाग १२ मध्ये शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या संघटनशक्तीत मोठी भर पडली असून श्रीनिवास संगा आणि शहरप्रमुख सचिन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, तसेच दामिनी जवळकर यांच्या पुढाकारातून सामाजिक कार्यकर्ते निलेश अळगुंडगी व मित्रपरिवाराचा शिवसेनेत प्रवेश करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, कामगार सेनेचे सायबण्णा तेगेळ्ळी यांसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.




**यांचा झाला शिवसेनेत प्रवेश**

काशिनाथ बोनगरगे, विनायक कांबळे, संदीप सुनगर, गणेश क्षीरसागर, अनिल अडकी, अनिल माळी, विशाल गोब्बुरे, गुरु म्हेत्रे, सदानंद बंदलगी, आकाश कोणजी या सामाजिक कार्यकर्त्यांनीही शिवसेना एकनाथ शिंदे गटात जाहीर पक्षप्रवेश केला.

स्थानिक उमेदवारालाच प्राधान्य द्या महापालिका निवडणुकीत प्रभाग १२ मधील स्थानिक उमेदवारालाच प्राधान्य द्या, स्थानिक समस्यांची खरी जाण स्थानिक नेतृत्वालाच असते. प्रभाग १२ भगवामय करू, महापालिका निवडणुकीत शिवसेनाला नवे राजकीय समीकरण मिळाले असून संघटनबळात मोठा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

**-श्रीनिवास संगा,** युवा नेते



## महापालिकेच्या कॅम्प शाळेला कवायत संच भेट

**सोलापूर, दि.१३ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका मुलांची व मुलींची मराठी कॅम्प शाळा येथील विद्यार्थी वर्गाला कवायत संच भेट देण्यात आले. कै. लक्ष्मण विठ्ठल पाटील यांच्या स्मरणार्थ महानगरपालिकांच्या विविध शाळामध्ये या उपक्रमसाठी त्याच्या पंचकन्या मनीषा, उषा, शिल्पा, स्वाती व आरती पाटील यांच्या माध्यमातून गेली दोन वर्षे विद्यार्थी उपयुक्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. महानगरपालिका शाळामध्ये गरजू विद्यार्थी वर्गासाठी अश्या विविध उपक्रमासाठी नेहमी प्रयत्नशील असल्याचे उपक्रमाचे समन्वयक प्रा. विक्रमसिंह बायस यांनी आपल्या मनोगतात सांगितले. १५ हजारांचे दोन ढोल, दोन ड्रम, दोन खंजिरी, दोन त्रिकोण, दोन झांज तसेच २० लेझीम असे कवायत साहित्य शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. प्रास्ताविक मुख्यध्यापिका रेहाना नदाफ यांनी केले. सूत्रसंचालन अप्पासाहेब ककमारे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुरेश सरगम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवेंद्र दंतकाळे, राहुल नवले, धोंडू केंगळे, गंगा कांबळे, गजाला शेख, रंजना गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## कोठारी हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**



श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव अजितनाथ उपाध्ये, उद्धघाटक म्हणून उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपशिक्षणाधिकारी प्रकाश नागोरे साहेब, संस्थेचे विश्वस्त सुशीला उपाध्ये, देवेंद्र शटगार, भरत उपाध्ये, मुख्याध्यापिकाअनिता हाडोळे, प्रतिभा शिरसाड उपस्थित होत्या.

सुशीला उपाध्ये यांच्या हस्ते नटराज मूर्तीचे पूजन प्रकाश नागोरे साहेब यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे साहेब यांच्या हस्ते रंगमंचाचे पूजन करून फित कापून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी केले. ५ वी ते ७ वी या गटातून देशभक्तीपर गीत तर ८ वी ते १० वी गटातून धनगर गीत गीताना उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते ट्रॉपी व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या सादरीकरणाचे परीक्षक म्हणून दर्शना उपाध्ये आणि रेवती डहाळे काम पहिले. इयत्ता ५ वी अ वर्गाला यावर्षीचा जनरल चॅम्पियनशिप पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालाचे मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बगले एस.एम, कस्तुरे, शिंदे एस. एस. तर आभार माने ए. एस. यांनी मानले.


### जाहीर नोटीस

आमचे अशिल चव्हाण ॲटो व्हीलस प्रा. लि, मुख्य शाखा-११४७, मु.पो. कुंभारी, तालुका-दक्षिण सोलापूर, अक्कलकोट रोड, जिल्हा-सोलापूर या कंपनीचे प्रतिनिधी श्री. श्रीकांत एस. अवताडे यांजतर्फे ॲडव्होकेट विनोदकुमार जी. जमादार रा. सोलापूर यांजकडून आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरून तमाम लोकांना विशेषतः याखाली नमूद वाहन मालकांना कळविण्यात येते ते की,

१) आमच्या अशिलांचा ढढ या कंपनीचे कमरसियल वाहन खरेदी विक्रीचा तसेच सदर वाहनांचे सव्हिस देणेचा व्यवसाय असून आमचे अशिल हे ढढ या कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. याखाली नमूद केलेल्या लोकांनी त्यांचे वाहन दुरूस्तीसाठी आमच्या अशिल कंपनीचे सव्हिस सेंटरला दिलेली आहे व त्याचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे-

| Sr | OWNER NME | Model | Registration No. | Chassis No | Engine No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANNAPPABASAGONDA AIANALKAR | Super Ace | Un Registered | MAT483139D YE16287 | 475 IDT 18EWYSA3096 |
| 2 | MAHESH NANA KOLASE | Ace Decor | MH13AX8532 | MAT445404F ZH32083 | 0.8LTDICRAILOS HUYS68542 |
| 3 | HISAMUDDIN BABUDDIN MANTHALE | Super Ace | MH13AN9707 | MAT483146E YD05037 | 475 IDT 18BVYS14851 |
| 4 | CHANDRADHAR SHRIDHAR MALI | SFC909 | MH04EY9168 | MAT454101B 8C10070 | 497TC96CYY812 994 |
| 5 | RAUT JAYWANT | Ace Magic HT | MH13AC3205 | 445121MSZR 84293 | 275ID105MS258 2083 |
| 6 | VENKATESH PAGADYAKUL | TATA ACE ZIP | MH13AN4193 | MAT491005B JJ04378 | A1J0541583 |
| 7 | RAMCHANDRA VIJAY KOKATE | Ace HT | MH13AN1635 | MAT4450519 VN50466 | 2751D105LQZSC 7767 |
| 8 | RAMESH GURAPPA BIRAJDAR | Ace Zip | MH13AN6347 | MAT491005C 6N04378 | G 600 W IIIS2K8057911 |
| 9 | MALHARL DATTATRAY Ace Gold RAUT | Ace Gold Diesel Plus | MH13DQ2821 | MATS59029N YC14158 | 700CCD102CXXS 41843 |
| 10 | BHANUDAS KALE | Super Ace Mint | MH21X6275 | MAT483154E YP16415 | 1.4CRAIL10MVY SD2693 |
| 11 | VISHNUMURTI GOVIND BHAT | MAGIC IRIS | MH13AZ7315 | MAT491106C JK42497 | GREVES 600 WS2K8055641 |
| 12 | RAFIK KASHIM SHAIKH | Ace | MH13AN7757 | MAT491005D 6G23736 | G 600 W IIIS3F8144427 |
| 13 | SAMBHAJI DIGAMBAR KOLI | Ace Magic HT | MH45AF2055 | MAT445502J VB08725 | 2751D107.BRYS1 9429 |
| 14 | DAYAWANT HARI MALI | TATA ACE | Un Registered | 275 IDI 06.FWYSC914 0 | MAT445117DVF 45872 |
| 15 | FIRE BURNT VEHICLE | TATA ACE | Due to Burn Number not traceable | Due to Burn Number not traceable | Due to Burn Number not traceable |

२) वर नमूद लोकांनी वर नमूद वाहन दुरूस्तीसाठी आमचे अशिलांकडे दिलेली आहे. तदनंतर आमचे अशिलांनी वर नमूद लोकांना त्यांचे वाहन दुरूस्तीचे प्रस्तावित दुरूस्तीचा खर्च सांगितलेला आहे. तथापि वर नमूद लोकांना आमचे अशिल बँकेतर्फे सदर प्रस्तावित दुरूस्तीचे खर्च सांगितल्यानंतर वर नमूद वाहन मालकांनी उद्या सांगतो, गाडी आपणाकडे राहू दया असे म्हणून निघून गलेले व आजतागायत परत आमच्या अशिल कंपनीकडे आलेले नाही. यावरून वर नमूद वाहन मालकांना सदर वाहन दुरूस्ती करून व त्याचा खर्च अदा करून वाहन परत घेवून जाणचा त्यांचा मनसुबा दिसून येत नसल्याचे, आमचे अशिलांना स्पष्ट दिसून येत आहे. त्याकामी आमचे अशिल बँकेने ॲड विनोदकुमार जमादार यांचेकरवी दि. २९/१२/२०२० रोजी नोटीस पाठवून वाहन घेवून जाण्यास कळविले. सदरची नोटीस मिळूनही अदयापपावेतो सदर वाहनाची दुरूस्ती करून, त्यांची रक्कम अदा करून वाहन घेवून जाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

३) वर नमूद लोकांना शेवटची संधी म्हणून या नोटीसीने कळविण्यात येते की, जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून मिळाल्यापासून ०७ दिवसांत सदर वाहन आमच्या अशिलांच्या ताब्यातून घेवून जावे तसेच सदर वाहनाचे पार्किंग चार्जेस रूपये ३००/- प्रति दिन प्रमाणे होणारी एकूण रक्कम आमचे अशिल कंपनीला अदा करून त्याची रितसर पावती घेवून जावे. सदर वाहन आमचे अशिल कंपनीत धुळखात पडून राहिले असल्यामुळे सदर वाहनाचे कोणतेही व कसल्याही प्रकारचे नुकसान झालेली असल्यास अथवा वाहन चोरी झाल्यास तुम्ही स्वतः जबाबदार राहणार आहात, याचीही तुम्ही प्रखरतेने नोंद घ्यावी. याशिवाय तुम्ही सदरची नोटीस मिळाल्यानंतरही सदर वाहन घेवून न गेल्यास, आमचे अशिल हे सदरचे वाहन Scrap करून वाहनाची विल्हेवाट लावतील. मग त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता.१३/१२/२०२५.

सही/-
**ॲड विनोदकुमार जमादार**
बी.ए.एल.एल.बी.,जी.डी.सी. ए
ॲडव्होकेट
ऑफिस - ८ पहिला मजला, स्केअर वन अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, जिल्हा दिवाणी न्यायालय समोर, सोलापूर -४१३ ००३
चव्हाण ॲटो व्हीलस प्रा. लि. यांचेतर्फे ॲडव्हाकेट


# सोलापुरात जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलन

## १७ व १८ डिसेंबर रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयातर्फे दि. १७ व १८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. विजयकुमार उबाळे यांनी पत्रकार परिषद दिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून सोलापुरातील द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय येथे हे संमेलन होणार आहे. या संमेलनस्थळाला डॉ. द. रा. बेंद्रे साहित्यनगरी असे नाव देण्यात आले आहे. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रणधीर शिंदे, प्रमुख कार्याध्यक्ष डॉ. महेश चोप्रा असून उद्घाटक श्रीकांत मोरे हे राहणार आहेत. बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता शिक्षणाधिकारी डॉ. सचिन जगताप यांच्या हस्ते ग्रंथदिडीची सुरुवात होणार आहे. त्यानंतर संमेलनाचे उद्घाटन श्रीकांत मोरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश महानवर उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या पहिल्या सत्रात डॉ. कृष्णा इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य परंपरा आणि योगदान या विषयावर परिसंवाद होणार आहे. दुसऱ्या सत्रात आवाज कौशल्य हा कार्यक्रम राहुल कदम सादर करणार असून संतोष पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. तिसऱ्या सत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातील साहित्य निर्मिती या विषयावर परिसंवाद डॉ. आनंद काटीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. चौथ्या सत्रात माधव पवार यांच्या अध्यक्षतेखाली काव्य मैफिल होणार आहे. गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी कथाकथन हा कार्यक्रम योगीराज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. त्यानंतर लेखक संवाद हा कार्यक्रम डॉ. महेंद्र कदम यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

**मराठी बोलीभाषा**

सौंदर्य आणि अभिजातता या विषयावर डॉ. श्रुतीश्री वडगेबाळकरांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे.

**चौथ्या सत्रात प्रसार माध्यमे**

भाषा संवर्धन आणि साहित्य निर्मिती या विषयावर रजनीश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. यावेळी प्राचार्य डॉ. बी.एच. दामजी, डॉ. राजशेखर शिंदे, प्राचार्य डॉ. एस. जे. गायकवाड उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटोसीने कळविण्यात येते की,

डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पेकी शहर वाशी येचोल म्यू. पल. हद्दीतील सोटी सर्वे नं. ७२४/५ याचे क्षेत्र ३९३.००. चो. मी. त्यावर वार्धण्यात आलेलो इमारत यासी चतुःसिमा पुर्वस रोड, दक्षिणेस सोपान यादव, पश्चिमेस श्रीकांत यादव व उत्तरेस ५ फुटाचा रोड व किसन काळे येणे प्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह मालको वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्रो गोरख ज्ञानदेव यादव याचे मालकीची आहे. श्री गोरख ज्ञानदेव यादव आमचे अशिल सागंली अर्बन को ऑप. बँक लि. सागंलो, शाखा बाशा या बँकेकडे व्यवसायाच्या खेळत्या भांडवलासाठी कर्जाची मागणी केली. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विदयमान मालक श्री गोरख ज्ञानदेव यादव यांनी दिलेला आहे. सदर कर्जास सदर मिळकत हो कर्जदार म्हणुन गहाणखत करुन देण्याची तयारी श्री गोरख ज्ञानदेव यादव यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबव वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन दयावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेद निजांखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही कोणचीही फसगत होवूनये म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे ता. १३/१२/२०२५

सही/-
**श्री. प्रसाद जा. कुलकर्णी**
बी. एस. एल. एल एल. बी
**पॅनल ॲडव्होकट**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी**



### मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**

डीआरएम (एस ॲंड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत:- त्याच्या परिसरातील कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जिओग्रिड आणि जिओ-टेक्स्टाइल पद्धती (TFTR) आणि (TBR) सह बीसीएम कामाशी संबंधित सिग्नलिंग काम. निविदा क्रमांक: SUR-N-T-2025-26-31 कामाची अंदाजे किंमत: रु.82,68,713.84 निविदा फॉर्मची किंमत: शून्य जमा करावयाची बयाणा रक्कम: रु.1,65,400 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 05.01.2026 15.30 वाजल्यानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (EMD) चे पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम एस ॲंड टी शाखा,**
**सी.आर. सोलापूर**

Apex-088

**Download UTS App for Tickets**



Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal's
**SANGOLA MAHAVIDYALAYA, SANGOLA**
Kadlas Road, Tal Sangola, Dist. Solapur, Pin-413307
**AIDED**
(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)
Applications are invited for the following **CLOCK HOUR BASIS (CHB)** Posts for the **Academic Year: 2025-26 (Second Term)**

| Sr. No. | Course | Subject | Designation | Total No. of CHB Posts |
|---|---|---|---|---|
| **Humanities Faculty** | | | | |
| 01 | B.A. | English | Assistant Professor | 02 CHB |
| **Science Faculty** | | | | |
| 01 | B.Sc. | Botany | Assistant Professor | 02 CHB |

1) The above Posts are open to all however candidates from any category can apply for the post.
2) All the above posts are purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2025-26 & subject to workload approval of Jt. Director of Education, H.E. Solapur Region, Solapur for Senior College section.
3) Educational qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Govt. of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18 UNI-1 dt. 8th March, 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th pay/2019/2285/dtd. 25th March, 2019.
4) Remuneration of the above posts will be as per the Govt. Resolution No. संकिर्ण २०१८ / (१८५/१८) / मशि-३,, dated 14th November, 2018, University Circular No. सोविसो/शि.मा./परिपत्रक /२०१८-१९/१०९४९/ dated 24th December, 2018 and Govt. Resulation No. संकिर्ण- २०२१/प्र.क. १८१/२१/ विशि-१ dated 17th October 2022.
5) Applications with full details should reach to the Principal, Sangola Mahavidyalaya, Sangola within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
6) This is University approved advertisement.
7) T.A./D.A. will be not paid for attending the interview.
Date: 14/12/2025

**(Dr.S.R.Bhosale)**
**I/c.Principal**
Sangola Mahavidyalaya, Sangola
Tal. Sangola Dist. Solapur.

**(Mr.U.S.Ghongade)**
**Secretary**

**(Mr.B.R.Gaikwad)**
**Chairman**
Sangola Taluka Uchcha Shikshan Mandal, Sangola

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – ३४

# अतिताण धावपटूंसाठी महत्त्वाचा धडा

धावण्याच्या प्रशिक्षणात एक सामान्य समज आहे ''जास्त ताण दिल्यास जास्त प्रगती होते.'' हे काही प्रमाणात खरं असलं, तरी अती ताण (ओव्हरस्ट्रेस) शरीरासाठी घातक ठरू शकतो. शरीराच्या किंवा स्नायूंच्या एखाद्या भागावर अपेक्षेपेक्षा अधिक ताण दिल्यास ते मजबूत न होता उलट कमकुवत होतात. दुखापतीची शक्यता वाढते. कारण शरीर मजबूत होतं ते ताण घेताना नव्हे, तर त्यानंतर मिळणाऱ्या विश्रांतीत. त्यामुळे रिकव्हरी हा प्रशिक्षणाचा तितकाच महत्त्वाचा भाग आहे.

धावपटूंना अनेकदा दोन सत्रांपैकी निवड करायची वेळ येते. अशावेळी कमी ताणाचं सत्र निवडणं अधिक फायदेशीर ठरतं, कारण ते शरीरावर अनावश्यक भार पडू देत नाही. हवामान खराब असेल, वारा असेल किंवा शरीर थकलं असेल, तर इंटरव्हल्ससारखा कठीण वर्कआउट करण्याऐवजी हलका फार्टलेक सत्र अधिक उपयुक्त ठरू शकतो.

उदाहरणार्थ, एका टीममध्ये कोच धावपटूंना राम (उदाहरण नाव) सारखे ४०० मीटर रिपीट्स ७५ सेकंदात करण्यास सांगतो. राम हे सहज करू शकतो; पण इतर धावपटू ७८८० सेकंदांवर पडू लागतात. त्यामुळे ते लवकर थकतात, रिकव्हरी कमी मिळते आणि तंत्र (टेकनिक) बिघडते. अशा सत्राचा फायदा फक्त रामला होतो. बाकी धावपटूंना निराशा आणि नकारात्मक फीडबॅक मिळतो.

याचा अर्थ असा नाही की स्पर्धेत फक्त रामच चांगला टाइम देईल इतर धावपटूही त्यांच्या क्षमतेनुसार, योग्य सराव आणि पुरेशी रिकव्हरी घेतल्यास उत्कृष्ट कामगिरी करू शकतात.

खरं यश तेव्हा मिळतं जेव्हा कोच आणि धावपटू परिस्थितीनुसार योजना बदलायला शिकतात. टीममधील सर्वांसाठी समान ताण योग्य नसतो; प्रत्येकाची क्षमता वेगळी असते. ओव्हरस्ट्रेसमुळे अनेक धावपटू दुखापतग्रस्त होतात आणि त्यांची प्रगती थांबते. अनेकदा लिगामेंट इजा, प्लांटर फॅसियायटिस, मसल टिअर यांसारख्या समस्या होतात आणि त्या बऱ्या होण्यासाठी महिनेवर्षेही लागू शकतात.

मोठ्या स्पर्धांच्या आधी शारीरिक आणि मानसिक ताण कमी ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. अमेरिकन धावपटू टॉम वोन रुडेन यांनी मानसिक ताण कमी करून उत्तम कामगिरी साधली होती. योग्य नियोजन, गरजेपुरताच सराव, आणि आठवड्यांची वैज्ञानिक मांडणी पाया बांधणी, भक्कम सराव, आणि शेवटी रिकव्हरी या तीन टप्प्यांमुळे खऱ्या अर्थाने सुधारणा होते. योग्य वेळी ताण कमी करणे आणि रिकव्हरीला प्राधान्य देणे हेच उत्कृष्ट धावपटू बनण्याचे खरे रहस्य आहे.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन,
सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# गिलला फॉर्म पुन्हा मिळवण्यासाठी संधी

◆ **धर्मशाला, १३ डिसेंबर**



हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या धर्मशाला येथील निसर्गरम्य क्रिकेट स्टेडियमवर रविवारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे.

भारतीय संघ बर्फाच्छादित पर्वतरांगेच्या कुशीत १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमानात तिसरा टी-२० सामना खळण्यासाठी सज्ज होत आहे, मात्र भारतीय ड्रेसिंग रूममध्ये वातावरण अचानक तापले आहे, कर्णधार सूर्यकुमार यादव, शुभमन गिलच्या वाईट फॉर्मची चर्चा सुरू झाली आहे.



सूर्यकुमार यादव



एडन मार्कराम

अडचणीत सापडलेल्या शुभमन गिलसाठी अंतिम एकादशमधील आपले स्थान वाचवण्यासाठी उलटगणती सुरू झाली आहे. उपकर्णधार शुभमन गिलला स्थिर कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसनच्या जागी संघात स्थान देण्यात आले, पण तो फारसा आत्मविश्वास निर्माण करत नाही.

टी-२० विश्वचषकाला सुमारे सहा आठवडे शिल्लक आहे. विश्वचषक सुरू होण्यापूर्वी भारतीय संघ व्यवस्थापन प्लॅन बी कडे वळण्यापूर्वी गिलला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपली योग्यता सिद्ध करण्यासाठी तीन सामने मिळण्याची शक्यता आहे.

तिसऱ्या टी-२० सामन्यापासून सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषक विजेतेपदाच्या बचावासाठी फक्त आठ सामने शिल्लक असताना, भारताचे टीकेचे लक्ष्य असलेले मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर सुरुवातीच्या संघात दोन वाईट फॉर्ममधील फलंदाजांना स्थान देण्याचा धोका पत्करू शकत नाहीत.

संघाचा कर्णधार असल्यामुळे गत एका वर्षापासून पूर्णपणे फॉर्ममध्ये नसतानाही सूर्यकुमार यादवला टी-२० विश्वचषकात निश्चितपणे सूट मिळेल, परंतु गिलबद्दल असे म्हणता येणार नाही, जो सलामीवीर म्हणून मूळ निवड नव्हता.

गिलचा टी-२० संघात प्रवेश केल्यापासून आतापर्यंत त्याने चांगल्या गोष्टी केलेल्या दिसत नाहीत. या पृष्ठभूमीवर, इंग्लंडविरुद्धच्या एका वाईट मालिकेसाठी सॅमसनला संघाबाहेर ठेवण्याचा अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील समितीचा निर्णय चुकीचा नव्हता हे सिद्ध करण्यासाठी गिलला असामान्य फलंदाजी करावी लागेल. भारतीय कसोटी व वनडे कर्णधाराला आपला टी-२० फॉर्म शोधावा लागेल आणि जर त्याला सॅमसनला त्याचे हक्काचे स्थान परत मिळू द्यायचे नसेल किंवा १६५ च्या शानदार टी-२० आंतरराष्ट्रीय स्ट्राइक रेटसह यशस्वी जयस्वालला न्यूझीलंड मालिकेदरम्यान संघात स्थान मिळवू द्यायचे नसेल, तर त्याला तीनपैकी किमान दोन सामन्यांमध्ये धावा कराव्या लागतील.

**दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज फॉर्मात**

ॲनरिक नॉर्टजे, मार्को जॅन्सेन, लुंगी नगिदी, ओटनील बार्टमन आणि लुथो सिपामला यांचा समावेश असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजी आक्रमणाने भारतीय खेळपट्ट्यांवर गोलंदाजी कशी करावी हे दाखवून दिले आहे. हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमची खेळपट्टी चेंडूला अतिरिक्त उसळी देते, ती निश्चितपणे त्यांना आकर्षित करेल.

सर्व टी-२० संघांमध्ये, खेळाडूंच्या बाबतीत, दक्षिण आफ्रिकेकडे यावेळी भारतीय उपखंडात ट्रॉफी जिंकण्यासाठी आवश्यक संतुलन असल्याचे दिसते. क्विंटन डी कॉकचे पुनरागमन, तसेच एडन मार्कराम, डिवाल्ड ब्रेविस, डोनोव्हान फरेरा, डेव्हिड मिलर आणि अष्टपैलू जॅन्सेनसारख्या खेळाडूंमुळे त्यांची फलंदाजी अधिकच प्रभावी दिसते.

**गत चुका सुधारणे आवश्यक**

अक्षरला बढती देऊन जी चूक करण्यात आली, त्याचप्रमाणे, शिवम दुबेला आठव्या क्रमांकावर पाठवणे हा आणखी एक वाईट निर्णय होता, यात पुढील सामन्यात सुधारणा करण्याची आवश्यकता असेल.

**कुलदीपकडे दुर्लक्ष**

कुलदीप यादव हा एक असा गोलंदाज आहे ज्याने दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना सातत्याने अडचणीत आणले आहे, परंतु भारतीय संघात जिथे आठव्या क्रमांकापर्यंत फलंदाजी करणे अनिवार्य आहे, त्यामुळे कुलदीपकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. धर्मशाळेतही त्याला बाहेर बसावे लागू शकते. अर्शदीपची आतापर्यंतची मालिका चांगली गेली नसली तरी, हार्दिक पांड्या जसप्रीत बुमराहसोबत नवीन चेंडूने गोलंदाजी करत असताना, संघ व्यवस्थापन कुलदीपसाठी अंतिम अकरामध्ये जागा शोधू शकते की नाही हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. (वृत्तसंस्था)

**भारत-दक्षिण आफ्रिका तिसरा टी-२० सामना आज**

**स्थळ** : हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाला
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मेस्सीच्या ७० फुट उंच पुतळ्याचे अनावरण

◆ **कोलकाता, १३ डिसेंबर**



अर्जेंटिनाचा सुपरस्टार लियोनेल मेस्सीने शनिवारी कोलकाता येथील लेक टाऊनमधील श्री भूमी स्पोर्टिंग क्लबमध्ये आपल्या ७० फूट उंच पुतळ्याचे अनावरण केले.

फिफा विश्वचषक उंचावत दाखविताना मेस्सीला दर्शवणारी ही लोखंडी मूर्ती पाहण्यासाठी चाहत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. केवळ ४० दिवसांत बांधलेला हा जगातील मेस्सीचा सर्वात मोठा पुतळा आहे. आठ वेळा बॅलन डीओर पुरस्कार जिंकणाऱ्या मेस्सीच्या गौरवार्थ हा पुतळा उभारण्यात आला आहे.

मेस्सी व त्याच्या संघाने या पुतळ्याला संमती दिली आहे आणि ते त्याबद्दल आनंदी आहेत, असे पश्चिम बंगालचे मंत्री आणि श्री भूमी स्पोर्टिंग क्लबचे अध्यक्ष सुजित बोस यांनी सांगितले. आम्ही त्याच्या व्यवस्थापकाशी बोललो आहोत व आज आम्ही मेस्सीशी बोलणार आहोत. त्याने पुतळ्यासाठी संमती दिली आहे आणि ते देखील आनंदी आहेत, असे त्यांनी सांगितले.

**केवळ ४० दिवसांत पुतळ्याचे बांधकाम पूर्ण**

आम्ही हा पुतळा केवळ ४० दिवसांत उभारला. हा खूप मोठा पुतळा आहे, त्याची उंची ७० फूट आहे. जगात मेस्सीचा इतका मोठा दुसरा कोणताही पुतळा नाही. (वृत्तसंस्था)



# राजीव देसाई यांचा सोलापूर जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
सोलापूर, दि. १३ डिसेंबर-

राज्य लॉन टेनिस व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या कार्यकारी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्हा सॉफ्ट टेनिस संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सॉफ्ट टेनिस संघटनेचे सचिव प्रा. संतोष गवळी व सॉप्ट टेनिसच्या राष्ट्रीय खेळाडूंच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना संघटनेच्या वतीने प्रा. गवळी यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा सॉफ्ट टेनिस संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्रा. संतोष गवळी, सहसचिव शिवाजी वसपटे, सुधीर सालगुडे, महेश झांबरे, मारूती घोडके, प्रशांत वर्धमाने, व्यंकप्पा शेंडगे व अक्षय गवळी आदी उपस्थित होते.

# बार्शीचा योगेश गवारे छत्रपती शिवशंभू श्रीचा मानकरी

**तीन जिल्ह्यातील शरीरसौष्ठव स्पर्धा**
**बेस्ट पोजर सोलापूरचा शाबाद नदाफ**
**मोस्ट इंप्रुव्हड बार्शीचा रोहित बुरांगे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

बार्शीचा योगेश गवारे हा सोलापूर, धाराशिव व लातूर या तीन जिल्ह्यातील शरीरसौष्ठव स्पर्धेतील छत्रपती शिवशंभू श्री चा मानकरी ठरला. बेस्ट पोजरचा मान सोलापूरचा शाबाद नदाफ व मोस्ट इंप्रुव्हडचा मान बार्शीच्या रोहित बुरांगे याने मिळविला.

कुसळंब (ता. बार्शी )येथे छत्रपति फिटनेस क्लब ॲन्ड जिम, छत्रपति प्रतिष्ठान कुसळंब व मित्र परिवार यांच्यावतीने, सोलापूर जिल्हा शरीरसौष्ठव संघटना यांच्या सहकार्याने कृष्णा काशीद यांच्या पुढाकाराने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ८५ खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धा ६ वजनी गटात घेण्यात आल्या होत्या. प्रत्येक गटात ४ बक्षीसे, रोख रक्कम, सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देऊन सर्व विजयी खेळाडूंना गौरविण्यात आले. प्रत्येक गटातील प्रथम विजेत्यामध्ये पुन्हा स्पर्धा झाली. त्यात योगेश हा या स्पर्धेचा मानकरी ठरला. त्याला रोख ११ हजार व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.



या स्पर्धेचे उद्घाटन बार्शी ग्रामीणचे एपीआय दिलीप ढेरे यांच्या हस्ते झाले. यावेळी नाना वाणी, विशाल गरड, सौरभ जगदाळे व धनंजय तऊर आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, शकील बडेघर, शरणकुमार कुंभार, रतिकांत पाटील यांनी काम पाहिले. सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

**अंतिम निकाल याप्रमाणे (प्रथम चार ):** ५५ किलो : प्रदीप पवार (धाराशिव), विकी राठोड( सोरेगाव), लकी मोरे( करमाळा), काशिनाथ देवकते( सोलापूर).

**६० किलो:** निखिल सोनकांबळे (अहमदपूर), आकाश वाघमारे, रितेश फटफटवाले ( दोघे सोलापूर), लक्ष्मण कंदारे(लातूर).

**६५ किलो :** योगेश गवारे( बार्शी), व्यंकटेश काळे( सोलापूर), निखिल कबाडे,ओंकार आयतलवाड( दोघे लातूर).

**७० किलो :** शाबाद नदाफ, हजरतअली शेख( दोघे सोलापूर), नितेश चव्हाण( वेळापूर), संकेत विभूते(सोलापूर).

**७५ किलो :** तेजस सुळे( लातूर), महमद मणियार( सोलापूर), आफ्रिद शेख, ऋषिकेश आदमाने( दोघे लातूर).

**७५ किलोवरील :** रोहित बुरांगे( बार्शी), साहिल शेख, सुमित जाधव ( दोघे सोलापूर), अजय माहिते (टेंभुर्णी).

# तालुका लंगडी स्पर्धेत लोहारवस्ती शाळा विजयी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट यांच्या वतीने आयोजित जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांच्या अक्कलकोट तालुका क्रीडा स्पर्धेत लहान गट मुलांच्या लंगडी स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा लोहारवस्ती करजगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन विजेतेपद पटकाविले. येथील फत्तेसिंह मैदानावर झालेल्या या स्पर्धेत या शाळेने ही कामगिरी केली.

यशस्वी खेळाडूंचे अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, मैंदर्गी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी यांनी छोट्या, कमी पटसंख्या असलेल्या वस्ती शाळेच्या लहानग्या खेळाडूंनी संपूर्ण तालुक्यातून विजयी होणे हे आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे असा गौरवोद्गार काढत खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे बसवराज परतबादी, इसाक नागणसुरे यांचे अभिनंदन केले.

यशस्वी खेळाडूंना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यांना जिल्हा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी संघाचे करजगी केंद्राचे केंद्रप्रमुख मल्लिकार्जुन पाटील यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अक्कलकोट तालुक्यातील सर्व सन्माननीय केंद्रप्रमुख साहेब, गट साधन केंद्रातील विषयतज्ञ गणेश अंबुरे, शरद कुंभार, गोविंद राठोड, विशाल शेटे, संतोष बारगुले, तुकाराम जाधव, सिध्दू विटकर यांचे सहकार्य लाभले

**विजेता संघ असा**

वसीम मुबारक कोरबू (कर्णधार), सुशांत सिद्धाराम पुजारी (उपकर्णधार), आहिल दस्तगीर शेरीकर, प्रवीण नरसप्पा नायकोडी, सरवर्ष श्रीशैल नायकोडी, रहिमान सादिक शेरीकर, साजीद इब्राहिम मदरी, चरण चंद्रशेखर नायकोडी, वेद पिरोजी माळी, विलास शरणप्पा नायकोडी, ऋषिकेश परशुराम संकद, प्रितम परशुराम नायकोडी, प्रमोद नरसप्पा नायकोडी, विनायक नागप्पा नायकोडी.

# जि.प.अंत्रोळी शाळेत खो-खो दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार यांचा वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र खोखो असोसिएशन खो-खो दिन म्हणून साजरा करते. जि.प. शाळा अंत्रोळी येथे मुख्याध्यापक युवराज राठोड यांनी खो-खोच्या मैदानाचे पूजन करून हा दिन साजरा केला.



याप्रसंगी सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे, शिक्षक नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, पुष्पा बनसोडे, मीनाक्षी राठोड व विद्यार्थी उपस्थित होते



# खो-खो दिनानिमित्त खेळाडूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार यांचा वाढदिवस महाराष्ट्र खोखो असोसिएशन खो-खो दिन म्हणून साजरा करतो.

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्यावतीने अध्यक्ष महेश गादेकर यांच्या हस्ते १२ डिसेंबर हा खो-खो दिन केक कापून व राष्ट्रीय खो-खो खेळाडूंचा सन्मान करून साजरा करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# शहर तालीम संघाची निवड चाचणी उद्या सोलापुरात

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

छत्रपती संभाजीनगर येथे १८ डिसेंबर २०२५ ला होणाऱ्या १७ वर्षांखालील (२००८ ते २०१० या वर्षात जन्मलेले मल्ल) राज्यस्तरीय फ्रीस्टाईल व ग्रीकोरोमन कुस्ती स्पर्धेसाठी शहर तालीम संघाची निवड चाचणी सोमवार १५ डिसेंबर रोजी शिवविजय मंगल कार्यालय, साठेवस्ती डोणगाव रोड येथे होणार आहे. वजने सकाळी ९ ते ११ या वेळेत होतील. नोंदणीसाठी ग्रिको रोमन महाराष्ट्र केसरी अर्जुन साठे (९१४६८९४८२५) अथवा महाराष्ट्र चॅम्पियन रोहित इगवे (७०२०८२८७१६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर तालीम संघाचे अध्यक्ष आ.विजयकुमार देशमुख यांनी केले.

# टीम स्पोर्टिफायची १५२ किलोमीटरची रिले केवळ १५ तास २८ मिनिटात पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १३ डिसेंबर-**

विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी काम करणाऱ्या एनजीओ चेतना फाउंडेशनला पाठिंबा देण्यासाठी टीम स्पोर्टिफायने धानोरी पुणे ते नागाव बीचपर्यंतची अत्यंत आव्हानात्मक १५२ किमीची डीएन रिले रेस १५ तास २८ मिनिटांत यशस्वीरित्या पूर्ण केली.

पुणे ते अलिबाग ५ आणि ६ डिसेंबर या दिवशी पुण्यातील आघाडीचा रनिंग क्लब असलेल्या टीम स्पोर्टिफायने पुण्यातील धानोरी ते नागाव बीच, अलिबाग येथील १५२ किमीचा आव्हानात्मक मार्ग १५ तास २८ मिनिटांत पार करून आयकॉनिक डीएन (धानोरी ते नागाव) रिले रेस पूर्ण केली. चेतना फाउंडेशनला पाठिंबा देण्यासाठी विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी आधार देणे हा या रॅली मागचा उद्देश होता. १३ धावपटूंच्या समर्पित पथकाने विविध भूप्रदेश आणि हवामान परिस्थितीतून मार्गक्रमण केले, लोणावळा, पेण आणि अलिबागमधून जात नागाव बीचवर पोहोचले.

**रॅलीची प्रमुख वैशिष्ट्ये**

एकूण अंतर: १५२ किमी
एकूण धावपटू: १३
एकूण वेळ: १५ तास २८ मिनिटे (प्रति किमी ०६:०२ मिनिटांचा वेग)
मार्ग: धानोरी (पुणे) लोणावळा पेण अलिबाग नागाव बीच

**सहभागी धावपटू**

अरुण अकेला, आशिष पठाडे, चिन्मय हुद्दर, किरण शिंदे, कुणाल उपाध्ये, मंगेश थोरात, मनीष धामांगे, राहुल बाथम, राहुल तुपे,रोहित परदेशी, शैलेश कोल्हे, श्रीकांत नुला, विजय बनसोड.



# सोरेगावच्या प्राचीन महादेव मंदिराचा कळसारोहण उत्साहात

### काशीपीठाचे जगदगुरु डॉ. महास्वामीजी यांची उपस्थिती

### मंत्रोच्चार, शंखनाद आणि ढोल-ताशांचा गजर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१३ डिसेंबर-**

सोरेगावातील प्राचीन महादेव मंदिराचा कळसारोहण सोहळा शुक्रवारी भक्तिमय वातावरणात करण्यात आला. या कार्यक्रमास काशीपीठाचे जगदगुरु श्री श्री श्री १००८ जगदगुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. मंत्रोच्चार, शंखनाद आणि ढोल-ताशांचा गजर यांमुळे भाविकांत उत्साह संचारला होता.

प्राचीनकालीन महादेव मंदिराचा सामाजिक कार्यकर्ते अक्षय वाकसे यांनी जीर्णोद्धार केला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन निशाणदार व वाकसे परिवार, तसेच सोरेगाव ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.



प्रारंभी काशीपीठाचे जगदगुरु श्री श्री श्री १००८ जगदगुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या व श्रो. ब्र. श्री. डॉ. पंचाक्षरी शिवाचार्य स्वामीजी नागणसुर, श्रो. ब्र. श्री. डॉ. पंचाक्षरी शिवाचार्य स्वामीजी माळकवठा, श्री वेदमूर्ती कल्याण शास्त्री गणेचारी, वेदमूर्ती विरभद्रय्या स्वामी सोरेगाव यांच्या हस्ते कळसारोहण, महाशांती आणि अभिषेक विधी संपन्न झाले. जगदगुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाराध्य शिवाचार्य यांनी आशीर्वचन दिले. नवनिर्मित शिखरावर सुवर्ण कलशाची स्थापना होताच भाविकांनी 'नमः पार्वती पतये हर हर महादेव' चा उत्स्फूर्त गजर केला. यावेळी भाविकांची मोठी गर्दी होती. महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी अक्षय वाकसे, माजी आमदार दिलीप माने, डॉ. शिवरत्न शेटे, नम्रताताई कोठे, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, गुरुशांत धुत्तरगावकर, सुयश खानापुरे, संतोष वाकसे, श्रीकांत निशानदार, राजशेखर पाटील, संजय वाकसे, शिवानंद कोरे, सिद्धराम भीमदे, विजू स्वामी, अनिल खडखडे, संदीप म्हेत्रे, चंदू खडखडे, वामन कांबळे, नागनाथ भरले, धनू कांबळे, बबलू कांबळे, राहुल कुटेकर, अमर डूरके आदी वर्ग उपस्थित होते.

# मंगळवेढ्यात उसाच्या ट्रॅक्टरचे चाक पडले निखळून

### पहाटे घटना घडल्यामुळे मोठा अनर्थ टळला

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १३ डिसेंबर-**

मंगळवेढा शहरातून ऊसाने भरलेला ट्रॅक्टर दामाजी चौकातून जात असताना अचानक ट्रॉलीचे चाक निखळून पडले. दरम्यान रात्री ही घटना घडल्यामुळे येथे शालेय मुले व प्रवासी कोणीही नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची दिवसभर मंगळवेढा शहरात चर्चा सुरु होती.



मंगळवेढा शहरातून अवजड वाहने सातत्याने ये जा करत असतात. या वाहनांना अटकाव करण्यासाठी मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी दोन वेळा आंदोलन ही छेडले मात्र या आंदोलनाचा पोलीसांनी मनावर न घेतल्यामुळे वारंवार शहरामधून वाहने ही येतच असतात. अनेक वेळा प्रसार माध्यमातून याबाबत वृत्त छापून येवूनही पोलीस प्रशासन त्याकडे गांभीर्यपुर्वक पाहत नसल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. शुक्रवारी पहाटे युटोपियन कारखान्याकडे ऊसाने भरलेला ट्रॅक्टर शहरामधून जात असताना एस.टी. बसस्थानकाच्या समोर आल्यानंतर अचानक ऊसाच्या ट्रॉलीची चाके निखळून पडली. ही घटना समजताच मनसेचे नारायण गोवे यांनी घटनास्थळी येवून त्याचा व्हिडीओ तयार करुन व्हायरल केल्यानंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले व त्यांनी चालकावर शहरात वाहन आणल्याबद्दल आर्थिक दंड केला असल्याचे सांगीतले. या चौकातच न्यू इंग्लिश स्कूल प्रशाला व बसस्थानक असल्याने येथे नेहमीच विद्यार्थी व प्रवाशांची भाऊगर्दी असते. परिणामी पहाटेच्यावेळी ही घटना घडल्यामुळे दुर्घटना टळल्याची चर्चा दिवसभर सुरु होती. गेल्या गाळप हंगामात इंग्लिश स्कूलच्या गेट समोरच दोन ऊसाचे ट्रॅक्टर पलटी झाले होते. सदरच्या दिवशी शाळेला सुट्टी असल्यामुळे दुर्घटना टळली. एवढ्या गंभीर घटना होवूनही पोलीस प्रशासन मात्र गांधारीच्या भूमिकेत असल्याचा आरोप जेष्ठ व सुज्ञ नागरिकामधून होत आहे. गुरुवारी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी मंगळवेढा पोलीस स्टेशनला वार्षिक तपासणीच्या पार्श्वभूमीवर भेट दिली यावेळी शहरातून अवजड वाहतूक होत असल्याने ती थांबवून शहराच्या बाह्य वळणाने वळवावीत अशी मागणी केली होती. काही तासातच हा अपघात घडल्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. मंगळवेढा वाहतूक शाखेच्या पोलीसांनी तालुक्यातील सर्व साखर कारखान्यांना गळीत हंगाम सुरु झाल्यानंतर वाहतूकीच्या नियमांचे व सुचनांचे पालन करीत नसल्याने मोठे अपघात होवून जीवीत व वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यासाठी पोलीस प्रशासनाने वाहतूक नियमांचे लेखी कारखान्याला पत्र देवून त्याची अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या होत्या मात्र साखर कारखाना प्रशासनाकडून या पत्राची कोणतीही दखल घेतली नसल्यामुळे वाहन चालक मोठ्या आवाजा स्पिकर लावून रस्त्याने वाहन चालवितात. त्यामुळे पाठीमागून आलेल्या वाहनांचा अंदाजही येत नाही, तसेच ट्रॉली मध्ये प्रमाणापेक्षा जास्त ऊस भरुन जात असल्यामुळे वाहने पलटी होण्याची शक्यता असते,याकडेही साखर कारखाना प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. साखर कारखाना प्रशासनाने सर्व ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकांची बैठक घेवून त्यांना सक्त सुचना द्याव्यात म्हणजे होणार अपघात टळतील अशा प्रतिक्रीया नागरिकामधून व्यक्त होत आहेत. दरम्यान यापुढे मंगळवेढा शहरातून येणार्या वाहनावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे वाहतूक शाखेच्या पोलीसांनी इशारा दिला आहे.

> शहरातून अवजड वाहने बंद व्हावीत यासाठी मी यापुर्वी दोन वेळा आंदोलन केले. तसेच प्रांत कार्यालयात लोकप्रतिनिधी यांच्या समवेतही वाहतूकीबाबत बैठक झाली. पोलीस प्रशासन मात्र याकडे गांभीर्यपुर्वक पाहत नसल्यामुळे अशा दुर्घटना होत आहेत. या पुढे वाहतूक न थांबल्यास पोलीस प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> **- नारायण गोवे, मनसे जिल्हा समन्वयक, मंगळवेढा**

## महत्वाचे...

### मुंडेंचे विचार भाजपाने पूर्ण महाराष्ट्रात पोहचवले : केकान

**जेऊर दि.१३ डिसेंबर**

माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीचा कार्यक्रम शेलगाव वा (ता.करमाळा) येथे साजरा करण्यात आला. यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्रातल्या गावागावात पोहोचवण्याचे काम केल्याचे सांगून समाजातल्या प्रत्येक घटकासाठी पूर्ण आयुष्यभर मुंडे यांनी काम केल्याचे मत भाजपा जिल्हा सचिव तसेच शासन नियुक्त पिक विमा तक्रार निवारण समिती सदस्य लक्ष्मण केकान यांनी व्यक्त केले. यावेळी सरपंच अमर ठोंबरे, उपसरपंच भारत पोटे, प्रगतशील शेतकरी तसेच उद्योजक महादू पवार, काकासाहेब पाटील, अनिल केकान उपस्थित होते. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष वसंत केकान, पोलीस पाटील नवनाथ केकान, माजी सरपंच नवनाथ केकान यांनी मनोगत व्यक्त केले. अजित केकान व महेंद्र लोंढे यांनी सूत्रसंचालन केले.



### गुरूवारी नगरसेवक वामन करणार धरणे आंदोलन

**माळशिरस, दि.१३ डिसेंबर-**

येथील नगर पंचायतीकडून विकासकामांच्या निधीबाबत होत असलेल्या अन्यायाविरोधात गुरुवार दि. १८ डिसेंबरला नगरपंचायत कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करणार असल्याचे माहिती नगरसेवक कैलास वामन यांनी दिली. याबाबतचे लेखी निवेदन श्री.वामन यांनी मुख्याधिकार्‍यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग एकमधील मुलभुत सुख-सुविधा, रस्ते, पाणी, गटार, स्वच्छता इत्यादीबाबत अनेक वेळा निधी मागूनही अनेक कामांना निधी उपलब्ध झालेला नाही.कामांची ई-निविदा देखील काढली नाही. राजकीय व्देषापोटी व राखीव प्रभाग असल्या कारणाने माझा निधी शुध्दीपत्रके काढुन माझे व नागरीकांचे संमतीशिवाय निधी अन्यत्र प्रभागांमध्ये वळविण्यात आला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सत्ताधारी व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी हे प्रभाग क्र. १ बाबत कायम उदासिन असल्याचे स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल आवास योजना अंमलात आणण्यासाठी देखील प्रशासकीय यंत्रणेमध्ये उदासिनता दिसुन येत आहे.



### 'सोलिस'कडून शक्तिशाली ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलिस या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड (आयटीएल)च्या प्रमुख ब्रँडने महाराष्ट्रातील पुणे येथे किसान अ‍ॅग्री शो २०२५ मध्ये सर्वात शक्तिशाली मल्टीस्पीड ट्रॅक्टर्सच्या नाविन्यपूर्ण व व्यापक श्रेणीला दाखवले आहे.यामध्ये नुकतेच लाँच करण्यात आलेल्या सोलिस जेपी ९७५ ट्रॅक्टरचा समावेश आहे,तसेच सॉलिस २७१६ एसएन आणि यानमार वायएम २३५ अशा नेक्स्ट-जनेरशन मॉडेल्सचा समावेश आहे. नवीन मॉडेल्सना पूरक म्हणून कंपनीच्या श्रेणीमध्ये सोलिस ५७२४ ४ डब्ल्यूडी आणि वायएम ३४८ आर देखील आहेत.याप्रसंगी मुदित गुप्ता म्हणाले,आम्हाला महाराष्ट्रातील शेतक-यांच्या प्रगतीसाठी आमच्या ट्रॅक्टर्सची शक्तिशाली श्रेणी सादर करण्याचा अत्यंत अभिमान वाटतो,ज्यामध्ये सोलिस जेपी ९७५ २ डब्ल्यूडी/४डब्ल्यूडी,सोलिस २७१६ एसएन आणि वायएम २३५ यासारख्या नवीन मॉडेल्सचा देखील समावेश आहे.

## निधन वृत्त...

### सुभद्रा शिंदे

**सांगोला,दि.१३ डिसेंबर -**

शिंदे वस्ती, वाकी घेरडी ता.सांगोला येथील सुभद्रा श्रीरंग शिंदे (वय-९५) यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्राचार्य बाळासाहेब शिंदे यांच्या त्या मातोश्री होत्या.





# मोडनिंब एमआयडीसाठी जमीन अधिग्रहण प्रक्रियेचा मार्ग मोकळा : रणजित शिंदे

### महसूल मंत्री बावनकुळे, पालकमंत्री गोरे, अधिकार्‍यांसमवेत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब,दि.१३ डिसेंबर-**

माढा तालुक्यातील मोडनिंब एमआयडीसाठी जमीन अधिग्रहण प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजित शिंदे यांनी दिली. महसूल मंत्र्याकडून मंजुरी मिळाली आहे. याबाबत मोडनिंब (ता. माढा) येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहत प्रकल्पाच्या इको-सेंसिटिव्ह झोनशी संबंधित अडचणी दूर करण्यासाठी विधान भवन नागपूर येथे महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. महसूल मंत्री बावनकुळे यांच्या दालनात झालेल्या या बैठकीस पालकमंत्री जयकुमार गोरे, महसूलचेअप्पर सचिव मोहसिन शेख, उपसचिव अजित देशमुख, वनविभागाचे डीएफओ, एमआयडीसी विभागाचे आर.ओ, महसूल मंत्री विशेष कार्यकारी अधिकारी राहुल गांगुर्डे, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले.रणजीत शिंदे यांनी मुद्देसूद मांडणी करत मोडनिंब एमआयडीसीची आवश्यकता व स्थानिकांची तयारी याबाबत विश्लेषण केले.यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अग्रही भूमिका मांडली. सर्व मुद्द्यांचे परीक्षण करून महसूल मंत्री बावनकुळे यांनी मोडनिंब एमआयडीसी प्रकल्पास मंजुरी दिल्याचे घोषित केले.

# एनसीसी हे देशसेवा व करियर घडवण्याचे माध्यम: घुमरे

### आर्मी, वायुसेना व पोलीसमध्ये भरती झालेल्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१३ डिसेंबर-**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मध्ये एनसीसी विभागातर्फे आर्मी, वायुसेना, पोलीस भरती इत्यादी क्षेत्रांमध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड उपस्थित होते. प्रा. डॉ. अभिमन्यू माने अध्यक्षपदी होते. यावेळी एन.सी.सी. विभागातील एकूण दहा विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यापैकी नऊ विद्यार्थी हे अग्नीवीरमध्ये भरती झाले तर एक रावसाहेब गव्हाणे वायुसेनेत भरती झाला. अग्निवीरमध्ये सुमित घाडगे, शुभम शिंदे, संघर्ष उबाळे, राजेश गोरे, प्रतीक साळवे, प्रदीप फाटके प्रदीप फाटके, ज्ञानेश्वर गुंड,अमर देवरे हे भरती झाले आहेत. महाविद्यालयातील बी.ए. भाग तीन मधील शेवटच्या वर्षामध्ये शिकत असणार्‍या इरफान पठाण याची मुंबई पोलीसमध्ये निवड झाली. यावेळी नुकतेच आर्मी अग्निवीरचे ट्रेनिंग घेऊन आलेले विद्यार्थी उपस्थित होते. सचिव घुमरे यांनी एनसीसी हे देशसेवा व करियरचे माध्यम असल्याचे सांगितले. प्राचार्य फंड यांनीही मार्गदर्शन केले. डॉ. माने यांचे अध्यक्षिय भाषण झाले. भरती झालेल्या सुमित घाडगे व रावसाहेब गव्हाणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षण घेऊन आलेला अग्नीवीर समर्थ वीर यांनी अनुभव सांगितले. एनसीसी विभागाचे प्रा. राम काळे यांनी प्रास्ताविक केले. अभिषेक करकुटे यांनी सूत्रसंचालन केले. संस्कृती कांबळे हिने आभार मानले. एनसीसी विभागाच्या प्रमुख कॅप्टन विजया गायकवाड, निलेश भुसारे व एनसीसी कॅडेट यांची उपस्थिती होती.



# सैन्यदलातील निवडीबद्दल खेडगी कॉलेजमध्ये १२ जणांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर**

येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेतील सुमारे १२ विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल पोलीस निरीक्षक दीपक भिताडे व संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी एनसीसीचे प्रशिक्षण अधिकारी नायब सुभेदार, महेश बरगंडे, हवालदार मच्छिंद्र गिरी, प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले, उपप्राचार्य प्रा. व्ही. एन. वैद्य, पर्यवेक्षक प्रा. एन. एस. भरमशेट्टी, पालक प्रतिनिधी सत्यपा गायकवाड उपस्थित होते. महाविद्यालयात आयोजीत पालक-शिक्षक मेळाव्यात हा सत्कार करण्यात आला. पालक शिक्षक संघटनेचे समन्वयक डॉ. किशोर थोरे यांनी प्रास्ताविक केले. सैन्यदलात निवड झालेल्या समर्थ म्हेत्रे, मारुती गायकवाड, गौसपाक बिराजदार, खंडप्पा बिराजदार, केदार पुजारी, महांतेश पाटील, राहुल काळे, आर्यन पटेल, दर्शन गायकवाड, सिद्धाराम कोळी, माळाप्पा जंबगी व नागेश बाळीकाई या १२ विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. श्री. खेडगी यांनी विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी यश संपादन करून महाविद्यालयाचे व तालुक्याचे नाव देशात उज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. मारुती गायकवाड आणि दर्शन गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. एनसीसीचे प्रमुख कॅप्टन डॉ. बी. एन.कोणदे यांनी एन.सी.सी. विभागाची माहिती दिली. एन. सी. सी. चे प्रमुख कॅप्टन डॉ. कोणदे व पालक-शिक्षक समितीचे समन्वयक डॉ. किशोर थोरे, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन डॉ. लता हिंडोळे यांनी तर आभार डॉ. सी.डी. अणेकर यांनी मानले.



> देशसेवेसाठी तरुणांनी लष्करात भरती व्हावं. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समोर आपला आयुष्यातील अनेक आठवणी व प्रसंगाच्या आधाराने आपणही यश मिळवू शकता.आपल्या आयुष्यात जोश आणि जिद्द असेल तर कोणत्याही अडचणींचा सामना आपण करू शकतो. जे विद्यार्थी सैन्यात दाखल झाले आहेत, त्यात आई वडिलांचं तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांच योगदान महत्त्वाच असते. त्यामुळे आपल्याला यशाचे शिखर गाठायला मदत मिळते.
>
> **- दीपक भिताडे पोलीस निरीक्षक, उत्तर पोलिस स्टेशन अक्कलकोट**

# डॉ. शरद जाधव यांना संगणक शास्त्राची पीएच.डी.

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१३ डिसेंबर-**

संगणकशास्त्र विषयात संशोधन करणारे भालेवाडी (ता. करमाळा) येथील प्रा.शरद जाधव यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारे पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.



हायब्रीड मशीन लर्निंग टेकनिक फॉर पर्सन आयडेंटिफिकेशन युजिंग मल्टी मॉडेल पामप्रिंट इयर अँड फेस बायोमेट्रिक फीचर्स या विषयावर त्यांनी आपले संशोधन पूर्ण केले असून मार्गदर्शक म्हणून कॉम्प्युटर सायन्स संकुलाचे संचालक प्रा. डॉ. निलेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले. सध्या ते महात्मा गांधी ज्यु. कॉलेज, करमाळा येथे संगणकशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. डॉ. जाधव यांच्या संशोधनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग व डीप लर्निंग आधारित मल्टिमोडल बायोमेट्रिक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ते अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगणक विज्ञान संघटनांचे सदस्य असून स्प्रिंजर, वर्ल्ड सायंटिफिक आदी उच्च दर्जाच्या नियतकालिकांमध्ये त्यांचे संशोधन प्रकाशित झाले आहे. आजवर ११ संशोधन लेख यशस्वीरीत्या प्रकाशित झाले आहेत. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांत शोधपत्र सादरीकरण केले आहे. माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त वैभव जगताप, शंभूराजे जगताप तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# राहुल चव्हाण प्रकरणात कठोर कारवाईची मागणी

### टेंभुर्णीत क्रांतिकारी संघर्ष सेनेचा निषेध मोर्चा

**टेंभुर्णी,दि.१३ डिसेंबर-**

कंदर (ता. करमाळा) येथील युवक राहुल चव्हाण यांच्यावर वाळू वाहतुकीसंबंधी माहिती (टीपा) पोलिसांना देत असल्याच्या संशयावरून ४ डिसेंबर रोजी टेंभुर्णी-करमाळा रोडवरील टोलनाक्याजवळ हल्ला झाल्याच्या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी करत क्रांतिकारी संघर्ष सेनेने गुरुवारी टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर निषेध मोर्चा काढला. या घटनेत चव्हाण यांनी अकोले-खुर्द परिसरातील काही व्यक्तींविरोधात तक्रार दिली असून तपास दोन्ही बाजूंच्या तक्रारींवर सुरू आहे.




मोर्चाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शांततेत करण्यात आली. हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या असंतोषामुळे मोठ्या संख्येने बहुजन समाज, युवक व महिला मोर्चात सहभागी झाल्या. चव्हाण यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील परिस्थिती, वाळू वाहतुकीशी संबंधित मतभेद आणि संशयाच्या कारणावरून निर्माण झालेल्या वादाच्या तपासात गती देण्यात यावी, तसेच या घटनेशी जोडल्या गेलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीच्या संपूर्ण साखळीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मोर्चात करण्यात आली.

मोर्चाचे नेतृत्व करताना क्रांतिकारी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश भोसले यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले की, हल्ला ही केवळ व्यक्तीगत भांडणाची बाब नसून त्यामागे चालणार्‍या अवैध वाळू व्यवसायातील व्यवहार, वाहनांचा वापर आणि आर्थिक देवाणघेवाणीची तपासणी अत्यंत आवश्यक आहे. संबंधित पुरावे तपास यंत्रणेला सुपूर्द करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अत्याचाराच्या कोणत्याही प्रकरणात न्याय्य, निष्पक्ष आणि तातडीचा तपास होणे आवश्यक आहे. आरोपी कोणत्याही गटाचे असले तरी कायद्यात सर्व समान आहेत, असे भोसले म्हणाले.

मोर्चादरम्यान कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही. हा निषेध कोणत्याही व्यक्तिविरुद्ध नसून अन्याय करणार्‍या प्रवृत्तीविरोधात असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. मोर्चात आलेल्या शेकडो नागरिकांसमोर टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवार यांनी स्वतः उपस्थित राहून निवेदन स्वीकारले आणि तपासातील सर्व बाबींची काटेकोर चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. मोर्चात पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष दीपक साठे, राज्य उपाध्यक्ष विजयकुमार कदम, निलेश खरात, आकाश खंडाळे, चंद्रकांत खंडागळे, अक्षय गायकवाड, दीपक लावंड, किरण तूपसुंदर, रमेश कुचेकर, राहुल भोसले, आनंद दळवी, पोपट दळवी, अंकुश चव्हाण, गणेश आव्हाड, लहू चव्हाण, गणेश खंडाळे, शंभू कुचेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेणे महत्त्वाचे

## सहाय्यक कुलसचिव शिवाजी शिंदे यांचे प्रतिपादन

### तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या निबंध स्पर्धेचे बक्षिस वितरण





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

मला हवयं आदर्श सोलापूर या निबंध स्पर्धेचे आयोजन सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या माध्यमातून करण्यात आले होते. हे खरंच कौतुकास्पद आहे. मोबाईलच्या जमान्यामध्ये निबंध स्पर्धा ठेवणे ही बाब विद्यार्थ्यांना वाव देणारे आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये बक्षीस मिळवण्यापेक्षा स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे, असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवाजी शिंदे यांनी पारितोषिक वितरण समारंभ वेळी मांडले.

कै. निर्मला यशवंत पेठे यांच्या स्मरणार्थ सन्मानपत्र, सन्मानचिन्ह रोख रक्कम मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. पेठे फूड्सच्या संचालिका सुवर्णा पेठे, स्पर्धेचे परीक्षक जगदीश पाटील, पर्यावरण तज्ञ राजकिरण चव्हाण, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंडी यांचा उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली.

**पर्यावरणपूरक बाबींकडे लक्ष देणे गरजेचे**

या निबंध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी खूप छान पद्धतीने आपले विषय मांडलेले आहेत. येणाऱ्या काळात सोलापूरला पर्यावरण पूरक बाबींकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे चव्हाण यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी तडवळकर यांनी केले.

**पुढील स्पर्धेमध्ये यश मिळवावे**

पेठे फुड्सच्या उद्योजिका सुवर्णा पेठे बोलताना म्हणाल्या की, जे विद्यार्थी या स्पर्धेत विजयी झाले आहेत त्यांचे विशेष कौतुक तर आहेच परंतु जे विजयी झाले नाहीत त्यांनी कुठेही खचून न जाता पुढील स्पर्धेमध्ये यश मिळवावे.

**लहान गटात येळमळी, मोठ्या गटात पुजारी प्रथम; अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजणार्थ) :**

**छोटा गट :** अक्षता सुनील येळमळी (इयत्ता सहावी ब, वीर तपस्वी प्रशाला), शिवतेज जगताप (इयत्ता सातवी, भारती विद्यापीठ)श्रुती विजय गायकवाड (इयत्ता सातवी, ढेपे विद्यालय बाळे), श्रवण लक्ष्मण सुतार (इयत्ता सातवी, दयानंद असावा प्रशाला), आराध्या मल्हारी कांबळे (इयत्ता सातवी, सेवासदन प्रशाला), मृण्मयी शितल पाटील (इयत्ता सातवी, ज्ञान प्रबोधनी प्रशाला), श्रावणी श्रीकांत चौगुले (इयत्ता सातवी, शरदचंद्र पवार प्रशाला).

**मोठा गट :** मेधा अवधूत पुजारी (इयत्ता आठवी, आय एम एस स्कूल), भाग्यलक्ष्मी इरय्या हिरेमठ (इयत्ता नववी, भू म पुल्ली कन्या प्रशाला), निशात हारूण तांबोळी (इयत्ता आठवी, विवेकानंद पब्लिक पोलीस स्कूल). अर्पिता भारत शेटे (इयत्ता आठवी ब, युनिक इंग्लिश मीडियम स्कूल), स्नेहल सोमनाथ तोडकरी (इयत्ता आठवी ब, श्राविका शाळा), आनंदी सचिन शिंदे (इयत्ता नववी ब, सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल), तेजस्विनी राजू कोळेकर (इयत्ता नववी ड, जैन गुरुकुल प्रशाला).



### आत्मनिर्भर भारताच्या ध्येयाला ॲमेझॉनचे भक्कम समर्थन

**सोलापूर :** ॲमेझॉन संभव शिखर परिषदेच्या सहाव्या आवृत्तीत कीस्टोन स्ट्रॅटेजीने प्रसिद्ध केलेल्या इकॉनॉमिक इम्पॅक्ट अहवालानुसार, २०१० पासून भारतात अमेझॉनने केलेल्या ४० अब्जच्या एकत्रित गुंतवणुकीचे, यात कर्मचाऱ्यांना दिली गेलेली भरपाई आणि पायाभूत सुविधांचा विकास यांचाही समावेश आहे, भारताच्या आत्मनिर्भर दृष्टिकोनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. कीस्टोनच्या मते, या गुंतवणुकीमुळे ॲमेझॉन भारतातील सर्वात मोठा परदेशी गुंतवणूकदार, सर्वाधिक ई-कॉमर्स निर्यात सक्षम करणारी कंपनी आणि देशातील सर्वोच्च रोजगार निर्माता ठरला आहे.२०३० पर्यंत देशातील सर्व व्यवसायांमध्ये ३५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची योजना जाहीर केली.एमझॉनचे वरिष्ठ उपाध्यक्ष,इमर्जिंग मर्केट्स,अमित अगरवाल म्हणाले, ॲमेझॉनचा भारतातील विस्तार हा आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे.



**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी अर्ज मागण्यासाठी इच्छुकांनी तुफान गर्दी केली होती. १५ ड व २५ या प्रभागात उमेदवार हे बैलगाडीतून उमेदवारी अर्ज घेण्यासाठी आले होते.
(छायाचित्र : केवल तिवारी)

## जिल्ह्यातील ११ हजार विद्यार्थ्यांनी दिली नवोदयची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शनिवारी जिल्ह्यातील ३३ परीक्षा केंद्रामधून १० हजार ८१७ विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालयची परीक्षा दिली. यावेळी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेकडून विविध केद्राना भेटी देऊन पाहणी करण्यात आली.

जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालयासाठी एकूण ११ हजार ६१३ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. यामध्ये ५ हजार ८८९ मुले व ५ हजार ७२४ मुलींचा सहभाग आहे. शनिवारी झालेल्या परीक्षेसाठी जिल्ह्यातून १० हजार ८१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये ५ हजार ४९२ मुले तर ५ हजार ३२५ मुलींचा समावेश आहे. जिल्ह्यातील ३३ परीक्षा केंद्रामधून ९३. १४ टक्के मुलांनी नवोदयची परीक्षा दिल्याचे सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले.



## गटशिक्षणाधिकारी विरोधातील मानसिक तक्रारींची फाईल सीईओंकडून गहाळ

### कारवाई न झाल्यास १५ डिसेंबरला आत्मदहन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाच्या तक्रारी दाखल असतानाही जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाले नसल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे. शिक्षक प्रतिनियुक्ती प्रकरणी सप्टेंबर २०२४ मध्ये दाखल करण्यात आलेल्या तक्रारीची संपूर्ण फाईलच गहाळ झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, यामुळे शिक्षण विभागातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सदर तक्रार फाईल शिक्षणाधिकारी कार्यालयातून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सहीसाठी पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे चौकशी केली असता, माझ्याकडे अशी कोणतीही फाईल आले नाही, असे स्पष्ट उत्तर देण्यात आले. विशेष म्हणजे, ऑनलाईन प्रणालीत तपासणी केली असता सदर फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेच प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ही फाईल नेमकी कुठे आहे? ती जाणूनबुजून दडपण्यात आली आहे का? की दोषींना वाचवण्यासाठी फाईल गायब करण्यात आली आहे? असे गंभीर सवाल उपस्थित होत आहेत. तक्रारदार महांतेश्वर कट्टीमनी यांनी विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदन दिली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील अनेक महिला शिक्षिकांनी प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्याविरोधात मानसिक त्रास दिल्याच्या तक्रारी दाखल केल्या असून, त्या देखील अद्याप प्रलंबित आहेत. संबंधित अधिकारी तक्रारदारांना अरेरावी करीत आहेत. यामुळे शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने आणि दोषींवर कारवाई होत नसल्याने आत्मदहनाच्या निर्णयावर ठाम असल्याचे तक्रारदाराने स्पष्ट केले आहे. प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत, तर सोमवार १५ डिसेंबर रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनासमोर आत्मदहन करण्यात येईल, असा गंभीर इशाराही कटिमनी यांनी दिला आहे.

## अन्नभेसळ प्रकरणात बिग बझार व त्यांच्या अधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

येथील बिग बझार या नामांकित सुपर मार्केटविरोधात दाखल करण्यात आलेल्या अन्नभेसळ प्रकरणात न्यायालयाने बिग बझार व त्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांना दोषमुक्त केले आहे.

अन्नभेसळाचा आरोप न्यायालयात सिद्ध न झाल्याने हा महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला. दिनांक २३ मार्च २०१५ रोजी सोलापूर येथील अन्न सुरक्षा अधिकारी विठ्ठल लोंढे यांनी बिग बझार स्टोअरमधील तांदूळ, मुगदाळ तसेच मँगो ग्लोरी आंबा फ्लेवर शुगर कन्फेक्शनरी या अन्नपदार्थांचे नमुने घेतले होते. तपासणी दरम्यान या नमुन्यांमध्ये अनियमितता व भेसळ आढळल्याचा दावा करत अन्न सुरक्षा व मानके कायदा २०११ अंतर्गत बिग बझार व त्यांची पालक कंपनी फ्युचर ग्रुप तसेच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात तीन स्वतंत्र प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या तिन्ही प्रकरणांची सुनावणी सोलापूर येथील मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात झाली. बिग बझारतर्फे ॲड. पंकज कुलकर्णी यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपींची बाजू मांडली. न्यायालयात सादर झालेल्या पुराव्यांच्या आधारे अन्नभेसळाचा गुन्हा सिद्ध करण्यात सरकारी पक्षाला अपयश आल्याचे निरीक्षण नोंदवत, दिनांक ०८ डिसेंबर २०२५ रोजी मुख्य न्याय दंडाधिकारी सुनील गावडे यांनी बिग बझार व त्यांच्या अधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात बिग बझारतर्फे ॲड. पंकज कुलकर्णी, ॲड. जान्हवी कुलकर्णी आणि ॲड. स्वाती बताले यांनी काम पाहिले, तर अन्न सुरक्षा विभागातर्फे सरकारी वकिलांनी बाजू मांडली. न्यायालयाच्या या निकालामुळे बिग बझार व त्यांच्या व्यवस्थापनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## प्रताप क्रीडा मंडळाच्या समुहनृत्य स्पर्धेत कलाकारांचे दमदार सादरीकरण



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ डिसेंबर-**

प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने स्मृती भवन शंकरनगर येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धेत बालकलाकारांनी दमदार सादरीकरण करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या स्पर्धेस मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, चि. सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी स्पर्धेला भेट देऊन कलाकारांचे कौतुक केले.

यावेळी मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपारांणी मोहिते पाटील, प्रदीपराव खराडे, दीपकराव खराडे, उपाध्यक्ष पोपटराव भोसले, सचिव बिभिषन जाधव यांचे सह मंडळाचे संचालक, सदस्य,रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परीक्षक योगेश देशमुख म्हणाले, प्रताप क्रीडा मंडळाने संस्थापक जयसिंह मोहिते पाटील व अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ४८ वर्ष अत्यंत शिस्तबद्ध या स्पर्धेचे आयोजन केले आहे. महाराष्ट्रामध्ये अशा स्पर्धा कुठेही पाहायला मिळत नाहीत. यातून अनेक कलाकार घडलेले आहेत.तर आर्लेकर यांनी या कलेतून भविष्यामध्ये कलाकारांना करिअरच्या विविध संधी निर्माण होत असल्याचे सांगितले. गट क्रमांक २ (५ वी ते ७ वी -पारंपरिक गीते, ग्रामीण गट- ब ) प्रथम क्रमांक श्री विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालय, कोळेगांव द्वितीय लिटल एंजेल्स इंग्लिश मेडियम स्कूल, गारवाडपाटी तृतीय श्री संत तुकाराम विद्यालय बोंडले. उत्तेजनार्थ जि. प. प्राथ. शाळा, मुंडफणे वस्ती, महाळुंग, हनुमान विद्यालय, शिंदेवाडी, सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मेडियम स्कूल, सांगोला, जि. प. प्राथ. शाळा, तुपेवस्ती मेडद. (शहरी गट) प्रथम क्रमांक सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज, द्वितीय लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर, गट क्र. ३ (८ वी ते १० वी, बॉलीवूड डान्स, ग्रामीण गट-अ) प्रथम बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस, द्वितीय कृष्णानंद विद्यामंदिर पाटीलवस्ती, तृतीय (विभागून) श्री हनुमान विद्यालय, लवंग गीताचे बोल,सावतामाळी विद्यालय, माळेवाडी अकलूज, चतुर्थ श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील विद्यालय, कोथरुड, पाचवा श्री गणेश विद्यालय, पिंपळनेर, (ग्रामीण गट ब) प्रथम श्री विजयसिंह मोहिते प्रताप क्रीडा मंडळाच्या समुहनृत्य स्पर्धेत कलाकारांचे दमदार सादरीकरण-पाटील विद्यालय, कोळेगाव, द्वितीय लिटल एंजल्स इंग्लिश मेडीयम स्कूल गारवाडपाटी तृतीय श्री संभाजी बाबा विद्यालय, इस्लामपूर, चतुर्थ श्री शंभू महादेव विद्यालय, उंबरे-दहिगांव, पाचवा श्रीनाथ विद्यालय लोंढे मोहितेवाडी यांनी यश प्राप्त केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सुट्टीच्या दिवशीही झेडपीचे कामकाज सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत नागपूर येथे होत आहे. शनिवार १३ डिसेंबर व रविवार १४ डिसेंबर या शासकीय सुट्टीच्या दिवशीही सभागृहाचे कामकाज सुरू राहणार आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषद व जिल्ह्यातील पंचायती समिती संदर्भात विशेष लक्षवेधी, तारांकित व अतारांकित प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबत आवश्यक दस्ताऐवजासह माहिती उपलब्ध व्हावी यासाठी शनिवार व रविवार या शासकीय सुट्टीच्या दिवशीही जिल्हा परिषदेचे कामकाज सुरू ठेवण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले आहेत.

त्यामुळे रविवारी व शनिवार या शासकीय सुट्टीच्या दिवशी सोलापूर जिल्हा परिषदेसह पंचायत समितीचा कारभार सुरू राहणार आहे. शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व विभागप्रमुखांसह पंचायत समिती पातळीवरील गटविकास अधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या कार्यालयात उपस्थित राहावे. जे कर्मचारी रजेवर गेले आहेत. त्यांच्या रजा रद्द करून त्यांना कार्यावर बोलवून घ्यावे. इतर कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत रजा देऊ नये, दिलेल्या रजा रद्द करण्यात याव्यात, अशा सूचना जंगम यांनी दिल्या आहेत.



## महत्वाचे...

### बार्शीत घरफोडी, तीन तोळे सोन्याचे दागिने लंपास

**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**

येथील पंकजनगरमध्ये घरफोडीची घटना घडली असून, या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी आशादेवी अनिल स्वामी (वय ५४) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्या रोजच्याप्रमाणे सकाळी १०.१५ वाजता घराला कुलूप लावून अंगणवाडी सेवेसाठी गेल्या होत्या. दुपारी २.४५ वाजता घरी परत आल्यावर घराच्या दरवाज्याचे कुलूप तुटलेले व कडी लावलेली स्थितीत दिसून आले. घरात प्रवेश करुन पाहणी केली असता, लोखंडी कपाट उघडे व उचकलेले दिसले. कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरीस गेले असल्याचे त्यांना आढळून आले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये दोन तोळे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण आणि चार ग्रॅम वजनाची बोरमाळ असा सोन्याचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही घटना शुक्रवारी सकाळी १०.१५ ते दुपारी २.४५ या वेळेत घडलेली असल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

---

### ताल-साधना सोलापूरतर्फे २५ डिसेंबरला तबला वादन स्पर्धा

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

ताल साधना सोलापूर आयोजित स्वतंत्र तबला वादन स्पर्धा होणार आहे. ता. २५ डिसेंबर रोजी हा सोहळा आहे. दत्तात्रय कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही स्पर्धा आहे. प्रथम क्रमांक ५ हजार, व्दितीय ३ हजार, तृतीय २ हजार उत्तेजनार्थ दोन विजेते असून प्रत्येकी पंधराशे रूपये पुरस्कार आहे. गट पहिला १५ वर्ष, दुसरा गट त्या पुढील वयोगटासाठी आहे. निवास व्यवस्था संयोजक करणार आहेत. त्यासाठी अगोदर सूचना दिली तर अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संदीप कुलकर्णी (९८९०६१८६८०) व (९९२१०३२३२५- ओंकार कुलकर्णी यांना संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

---

### कमलाभवानी मंदिरासाठी पाच कोटींचा निधी : शिंदे

**करमाळा, दि. १३ डिसेंबर-**

जिल्ह्यात पर्यटनासोबतच आर्थिक विकासाला देण्यासाठी चालना सरकारकडून २८२.७५ कोटींच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यास २०२४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मंजुरी मिळाली होती. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनासाठी २५ कोटींच्या निधीला मंजुरी मिळालेली होती. त्यातील ५ कोटी तालुक्यातील कमलाभवानी मंदिर परिसरात कामे केली जाणार असल्याची माहिती माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली आहे. शिंदे यांनी सांगितले, पाच कोटी निधीपैकी दोन कोटी २० लाख निधीमधून श्री कमलादेवी मंदिरात सीसीटीव्ही, ऑन ग्रिड सोलर रूफटॉप सिस्टम, स्ट्रीट लाइट आणि हायमास्ट, गार्डन लाइट, विद्युतीकरणाचे काम आणि संगीतमय कारंजांचे कामे केली जाणार आहेत. तर २ कोटी ८० लाख निधीमधून मंदिर सुधारण्याची कामे केली जाणार आहेत.

---

### पद्मशाली सखी संघमतर्फे स्त्रियांसाठी आज आरोग्य उपक्रम

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलापुरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित, 'पद्मशाली आहार व जीवनशैली यावर् प्रतिबंधात्मक उपाय' याचे आयोजन रविवारी सायंकाळी साडेचार वाजता केल्याची माहिती सखी संघम'च्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, सचिवा रुचिरा मासम आणि कार्याध्यक्षा सविता येदूर यांनी दिली आहे. आजच्या घडीला स्त्रिया घरातील सर्व कामे करुन, या धावपळीत नोकरीही करत असतात. यामध्ये विशेषतः पूर्व भागातील काही महिला विड्या वळण्याचे काम करीत असतात. यामुळे स्वतः च्या आरोग्याकडे लक्ष देता येत नसल्याने स्त्रियांमधील आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या समस्यांवर निदान होण्यासाठी डॉ. नम्रता गुल्लापल्ली (बिंगी) या विनामूल्य तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. रविवारी सायंकाळी ४.३० ते ५.३० या वेळेत पूर्व भागातील दत्तनगर ते पोलीस मुख्यालय या मार्गावरील मध्यभागी असलेल्या श्री समर्थ क्लिनिक' येथे हे शिबिर होणार आहे, या शिबिरात जास्तीत जास्त संख्येने स्त्रियांनी सहभागी होऊन लाभ घ्यावे, असे आवाहन सखी संघम' च्या सहसचिव वनिता सुरम, अंजली वलसा, श्रावणी कनकट्टी, गीता भूदत्त, हेमा मैलारी यांनी केले आहे.

# ऊसाची सोन्याची कांडी भंगारात नका विकू : शेट्टी

## वाखरीतील शेतकऱ्यांचे उपोषण अखेर मागे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ डिसेंबर -**

तुमच्या शेतामध्ये जी ऊसाची कांडी आहे ती सोन्याची कांडी आहे. तिला भंगाराच्या किंमतीमध्ये विकू नका. कोणत्याही परिस्थितीत कारखानदारांच्या दबावाला बळी पडू नका असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजु शेट्टी यांनी केले.

वाखरी पालखी तळावर उसदरवाढीसाठी सर्व शेतकरी संघटना एकत्रितपणे आंदोलन करीत आहेत. त्या ठिकाणी समाधान फाटे आणि इतर तीन ते चार जणांनी बेमुदत उपोषण सुरु केलेले आहे. त्या उपोषणकर्त्यांची भेट घेण्यासाठी शनिवारी (ता.१३) राजु शेट्टी आले होते. त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी शेतकरी नेते रविकांत तुपकर, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, दीपक भोसले, सचिन पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मागील पाच ते सहा दिवसांपासून बेमुदत उपोषणास बसलेले समाधान फाटे, गणेश लामकाने, बाळासाहेब जगदाळे, राहुल पवार यांनी राजु शेट्टी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शनिवारी उपोषण मागे घेतले. यावेळी मार्गदर्शन करताना राजु शेट्टी म्हणाले, आपल्या हक्काची लढाई आपणालाच लढावी लागणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी संघटित होवून पुढे आले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कारखान्याकडे गाळपास ऊस पाठविताना तो खासगी काट्यावर वजन करुन आवश्य पाहिला पाहिजे असे देखील त्यांनी शेतकऱ्यांना ठणकावून सांगितले.

महाराष्ट्रामध्ये आज अशी एक सामाजिक स्थिती निर्माण झाली आहे की इथल्या सगळ्या चळवळी संपलेल्या आहेत. कुठतरी थोडीफार धग राहिली आहे ती शेतकरी चळवळी मध्येच आहे. त्यामुळे आपण देखील चळवळीतील कार्यकर्त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले पाहिजे असे सांगून त्यांनी उपोषणकर्त्यांना तब्बेत खालावत असल्याने उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले.

यावेळी मनसेचे दिलीप धोत्रे, रविकांत तुपकर तसेच उपोषणकर्ते समाधान फाटे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.



### उपोषणाला चांगला प्रतिसाद

उसाला टना मागे ३ हजार ५०० रुपये दर मिळावा यासाठी शेतकरी संघटनेचे समाधान फाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मागील पाच ते सहा दिवसांपासून जे उपोषण सुरु केले होते त्याला चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. पंधरा ते वीस कारखान्यांनी या उस आंदोलनाची दखल घेत दर जाहीर केला. उर्वरित कारखानदार देखील लवकरच दर जाहीर करतील अशी देखील शेट्टी यांनी अपेक्षा व्यक्त केली. साधारण या आंदोलना मुळे ३०० रुपये अधिक मिळविले आहेत. त्यामुळे तीन कोटींचा जरी ऊस पकडला तर येथील शेतकऱ्यांना ९०० कोटीं रुपये मिळवुन दिल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

### मेहनत करे मुर्गी, अंडा खाये फकीर

दोन तासा मध्ये एक टन ऊस तोडणारा मजुर ४३९ रुपये मिळवायला लागला आहे. कारखानदाराला एका टना पाठीमागे अकराशे रुपये मिळतात.प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कर लावणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारला बाराशे रुपये टनाला मिळतात. दुसरीकडे मात्र बारा, चौदा,सतरा महिने उस सांभाळणाऱ्या शेतकऱ्यास उस शेतीचा हिशोब केला तर एका टना पाठीमागे केवळ पंचाव्वन साठ रुपयांच्या वर काही रहात नाही. त्यामुळे मेहनत करे मुर्गी अंडा खाये फकीर अशी सध्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था होवून बसल्याचेही शेट्टी यांनी सांगितले.

### कारखानदारांना माज आला आहे : शेट्टी

सध्याच्या कारखानदारांना खूप माज आलेला आहे. आपण पाहिले तर या अगोदरची कारखानदारांची पिढी त्यातल्या त्यात बरी होती. त्याच्या अगोदरची पिढी एकदम चांगली होती. आता येणारी पुढची पिढी ही याच्या पेक्षा बाद असणार आहे. एकवेळ चोर,दरोडेखोर परवडले यांच्यापेक्षा खूप भयानक निघणार असल्याचे सुतोवाच खासदार शेट्टी यांनी यावेळी बोलताना केले.

## भैय्या चौकातील ऐतिहासिक पूल



शहरातील भैय्या चौक ते मरिआई चौक रेल्वे पुलाच्या पाडकामासाठी क्रेन मागवण्यात आले आहेत.

# 'टेट'च्या २,२०७ विद्यार्थ्यांचा निकाल रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शासनाकडून शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा २७ मे २०२५ ते ३० मे २०२५ व २ जून २०२५ ते ०५ जून २०२५ या कालावधीत राज्यातील २६ जिल्हयांमध्ये ६० परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने आठ दिवसामध्ये तीन सत्रात करण्यात आले होते. परीक्षेस २ लाख २८ हजार ८०८ परीक्षार्थी उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परीक्षेस २ लाख ११ हजार १०८ परीक्षार्थी प्रविष्ठ झाले होते.

१८ ऑगस्ट रोजी परीक्षेचा निकाल प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानंतर बी.एड. परीक्षेचे व डी.एल.एड. परीक्षेचे म्हणून ज्या उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. त्यघना व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून एक महिना कालावधीत सादर करणे अनिवार्य होते.

ज्या उमेदवारांनी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले नाही अशा २ हजार ५३७ उमेदवारांना २० सप्टेंबर रोजी एसएमएसद्वारे २५ सप्टेंबर पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती. दोन हजार ५३७ उमेदवारांपैकी २ हजार २०७ विद्यार्थी, उमेदवारांनी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र सादर न केल्याने दोन हजार २०७ विद्यार्थी उमेदवारांचा निकाल रद्द करण्यात येत आहे. या उमेदवारांची यादी परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

# राज्यातील शाळांची होणार उद्या पडताळणी

## बोगस विद्यार्थीसंख्या असल्यास कारवाई अटळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ डिसेंबर..**

शिक्षण विभागाने राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येची आणि उपस्थितीची सखोल पडताळणी करण्यासाठी नवीन आदेश काढले आहेत. या आदेशानुसार मुख्याध्यापकांनी यू-डायस प्लस पोर्टलवर नोंदवलेली विद्यार्थी संख्या आणि प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी यांची पडताळणी केली जाणार आहे. बनावट विद्यार्थी संख्या दाखवणाऱ्या शाळांवर कारवाई होणार असून, चुकीच्या नोंदी आढळल्यास संबंधित अधिकारी आणि मुख्याध्यापकांवर कारवाई केली जाणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

गटशिक्षणाधिकारी स्तरावर १५ डिसेंबरपर्यंत पडताळणी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्याध्यापक आणि वर्गशिक्षकांनी पोर्टलवरील माहितीची अचूकता तपासावे. तसेच अनुपस्थित किंवा शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांची नोंद अद्ययावत करण्यास सांगण्यात आले आहे.

सोमवारी १५ डिसेंबर रोजी गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख आणि विस्ताराधिकारी शाळांना भेट देऊन प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची उपस्थिती व पोर्टलवरील डेटाची पडताळणी करणार आहेत. त्यानंतर त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर विशेष पथके अचानक शाळांना भेट देऊन प्रत्यक्ष उपस्थिती आणि पोर्टलवरील माहितीची पडताळणी करणार आहे. यावेळी चुकीची माहिती भरल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, गटशिक्षण अधिकारी आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. दाखल नसलेल्या विद्यार्थ्यांची नावे पोर्टलवर दिसल्यास गंभीर कृत्य मानले जाईल आणि त्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'सहकार महर्षी' ची पहिली उचल तीन हजार पाच रुपये

## शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचा परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ डिसेंबर-**

सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या मेन गेटवर शेतकरी संघटनेने आज ऊस दरासाठी आंदोलन केले शेतकरी संघटनेच्या ऊस दर मागणीला योग्य प्रतिसाद देऊन सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमनसाहेब व व्यवस्थापन यांनी प्रती मे. टन. ऊस दर ३००५/- इतका जाहीर केले बाबत संघटनेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

त्यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकराव माने-देशमुख, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील संचालक मंडळातील सदस्य रामचंद्र ठवरे, गोविंद पवार, विराज निंबाळकर, विजय पवार, पांडुरंग एकतपुरे, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, शेती अधिकारी चव्हाण यावेळी उपस्थित होते. यावेळी कारखान्याचे संचालक प्रकाश राव पाटील यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी घालून दिलेल्या तत्त्वानुसार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना आजपर्यंत व्यवस्थित चालू आहे. वेळोवेळी त्यांनी उसास योग्यच भाव दिला आहे. शेतकरी संघटनेच्या मागणीस प्रतिसाद देत आम्ही पहिली उचल ३००५/-तीन हजार पाच रुपये जाहीर करत आहोत, असे आशयाचे पत्र संघटनेच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांना देण्यात आले.यावेळी शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कारखान्याचे आभार मानले. कारखान्याने आज अखेर तीन लाख ७० हजार टन ऊस गाळप केला आहे ३१ ११ पर्यंत गाळपत आलेल्या उसास २८५०/ हप्ता बँकेत जमा झाला असून तोडणी वाहतुकीची बिलेही जमा झाले आहेत यापूर्वी गाळप झालेल्या व यापुढे येणाऱ्या प्रत्येक टनास तीन हजार पाच रुपये असा दर देण्यात येणार आहे.



# कांद्याचे दर तेजीकडे; दर पोहचले तीन हजारांवर

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ डिसेंबर**

निर्यातबंदी आणि मुबलक प्रमाणात कांदा उपलब्ध असल्याने कांद्याचे भाव कोसळले होते. मात्र, बांग्लादेशात कांद्याची टंचाई भासत असल्यामुळे तेथील सरकारने - भारतातून कांदा आयात करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे भारतातील कांदा बांग्लादेशात जात असल्यामुळे कांद्याच्या दरात थोडी वाढ झाली आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी (दि. ११) २०९ ट्रक कांद्यांची आवक झाली आहे. काही क्विंटलला सर्वाधिक दर ३१०० तर सरासरी दर १३०० रुपयांचा मिळाला होता. त्या घरामध्ये किंचित वाढ होत आहेत. शुक्रवारी आणि शनिवारी देखील सर्वाधिक दर तीन हजारावर गेला. सरासरी दर हा तेराशे ते चौदाशे रुपये पर्यंत स्थिर होता. गेल्या काही दिवसात कांद्याची मागणी वाढल्याने दरात थोडी सुधारणा झाली आहे.

दरम्यान, अतिवृष्टी, पुरामुळे यंदाच्यावर्षी कांद्याची लागवड कमी प्रमाणात झाली आहे. तसेच कांदा चाळीतील कांदा संपत असल्यामुळे येत्या काळात कांद्याचे भाव आणखी कडाडणार आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात कांदा सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यात पाणी आणेल, असा अंदाज कांदा तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. गेल्या आठवड्यात कांद्याला सर्वाधिक दर दोन हजार ५०० रुपये तर सरासरी दर एक हजार १०० रुपये मिळत होता.

परंतु मागणी वाढल्याने सर्वाधिक दर हा तीन हजार १०० रुपये प्रतिक्विंटल तर सरासरी दर एक हजार ३०० रुपये मिळत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील शेतकरी श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी आणत आहेत.

### आकडेवारीत गत तीन दिवसाचा कांदा बाजार

| गुरुवार दि.११ डिसेंबर | शुक्रवार दि.१२ डिसेंबर | शनिवार दि.१३ डिसेंबर |
|---|---|---|
| आवक २०९ ट्रक | आवक १८९ ट्रक | आवक २२० ट्रक |
| सर्वाधिक दर : ३१०० | सर्वाधिक दर ३२०० | सर्वाधिक दर ३२०० |
| सरासरी दर : १३०० | सरासरी दर १३५० | सरासरी दर १३०० |
| कमी दर १०० | सर्वात कमी दर १०० | सर्वात कमी दर १०० |

# रामलाल चौकातील एल.व्ही. कॉम्प्लेक्ससमोरील फुटपाथची दुरावस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शहरातील रामलाल चौकातील एल. व्ही. कॉम्प्लेक्ससमोरील नुकताच बांधण्यात आलेला फुटपाथ अवघ्या काही दिवसांतच उखडल्याने त्याची दुरावस्था झाली आहे. या फुटपाथवरील पेवर ब्लॉक्स अनेक ठिकाणी तुटलेले व विस्कटलेले दिसून येत आहेत. नव्यानेच करण्यात आलेल्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

फुटपाथ उखडल्यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले असून महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी खड्डे पडल्याने दुखापत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रहदारीच्या वर्दळीच्या ठिकाणी अशी अवस्था झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. लाखो रुपयांचा खर्च करून केलेले काम इतक्या लवकर खराब कसे झाले, असा सवाल उपस्थित होत आहे.



फुटपाथ दुरुस्तीसाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दुरुस्ती न झाल्यास समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. महापालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२९६

**मिठेंविण काय करावें मिष्टान्न ।**
**शव जीवें विण श्रृंगारिलें ।।**

आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येणार? असा प्रश्न उपस्थित केला म्हणजे जवळ काहीही नसतांनाही केवळ बडबडत आहे, असा अर्थ काढला जातो. असे काही जवळ नसणारे पण म ठेवणा सांगणारे किंवा कोरड्या गप्पा मारणारे भरपूर लोक समाजात आहेत. खरे म्हणजे आपली पात्रता नसतांनाही ती योग्यता, क्षमता आपल्यात आहेच असे भासवून बोलणे किंवा दिखावा करणे म्हणजे केवळ वेडेपणा होय.अंतरंगातच नाही तर बाह्य देखाव्यात अर्थ उरत नाही. तरीपण अनेक लोक वाट्टेल तेवढे वाट्टेल तसे भासवून आपली पोळी भाजून घेत असतात.



आम्ही देवाचे भक्त आहोत. रात्रंदिन त्याची सेवा करतो आहोत. आमचे जिवन पूर्णत: त्याच्या चरणी वाहिलेले आहे. उठता-बसता,चालता-बोलता देवाशिवाय आम्हाला विचार नाही, असे काहीजण म्हणतात. असो आमच्या शब्दाला किंमत आली किंवा आमच्या वर्तनाचा इतरांवर इष्ट परिणाम झाला नाही तर वाचाळता आणि आमच्यात काहीच फरक उरणार नाही. व्यर्थ बडबड करणाऱ्याची जशी समाजात विटंबना होते. तशी आपलीही विटंबना झाल्याशिवाय राहाणार नाही. मिष्टान्न तयार केले पण त्यात जर मिठाचा लवलेशही नसेल तर मिष्टान्नाचे सेवन करावे असे कोणालाही वाटणार नाही. त्याचबरोबर प्रेत खूप सुंदर पध्दतीने सजविले किंवा त्यावर अलंकार चढविले तरीही त्याला काही अर्थ उरत नाही. त्याप्रमाणे आमची अवस्था होउ देउ नकोस, अशी आर्त हाक विठ्ठलाला देताना तुकाराम महाराज म्हणतात, मिठेंविण काय करावे मिष्टान्न । शव जीवें विण श्रृंगारिले ।।

आपली ज्यावर श्रध्दा आहे किंवा आपण ज्याच्यावतीने काम करतो त्याची आपल्यावर योग्य ती कृपा असायला हवी. त्याची कृपा आपल्यावर नसेल किंवा कसलाच अधिकार आपणाला प्राप्त नसेल तर कालांतराने का होईना पण लोकांचा आपल्याकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो. लोकांचे तर सोडाच पण स्वत:चा स्वत:कडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो. हे सत्य असले तरीही समाजात अनेक लोक अकारण काही मोठ्या लोकांच्या नावावर आपले जिवन जगत असतात. त्या व्यक्तीला आपली जाणीव असो किंवा नसो, त्याच्या नावाचा उदो उदो करुन जमेल तेवढा स्वार्थ साधणारे काही कमी नसतात. संत, महात्म्यांच्या बाबतीत बोलायचे झाले तर ते भगवंताचा उदो उदो करीत असले तरीही त्यांचा त्यात कसलाही स्वार्थ नसतो. ज्याच्यावर त्यांची श्रध्दा आहे ती श्रध्दा जनहितार्थ कशी वापरता येईल याचा ते विचार करतात. म्हणूनच समाजात त्यांनी समता, नि:स्वार्थ, प्रेम, कर्तव्य आदि भरभराटीस आणण्याचा प्रयास केल्याचे दिसून येते. दुसऱ्याला देण्यासाठी स्वत:कडे असावे लागते. म्हणजेच स्वत:कडे अनुभव, पात्रता असावी लागते. हे संत, महात्म्यांप्रमाणे आपणही लक्षात घ्यावे. आपल्याजवळ नसतांना इतरांना खोटारडे दाखविणे म्हणजे ही केवळ समोरच्याची फसवणूक नव्हे तर ती आपली स्वत:चीही फसवणूक असते. इतरांना देता येण्यासाठी इतरांकडून घेताही आले पाहिजे. जय जय राम कृष्ण हरी.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार
दि. १४ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशीर्ष कृ. दशमी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- हस्त (०८.१७)
योग - सौभाग्य (११.४४)
करण - बव (अहोरात्र)
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००

दिनविशेष - ※ गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी
१८९६ : ग्लासगो भूमिगत रेल्वे सुरू झाली.
१९१८ : 'प्रसाद सावकार' - गायक व नट यांचा जन्म.
१९३४ : 'श्याम बेनेगल' - चित्रपट दिग्दर्शक व पटकथालेखक यांचा जन्म.
२०१३: भारतीय चित्रकार सी एन करुणाकरन यांचे निधन.



## डीपीबी दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपदक

### जिल्हास्तरीय युवा महोत्सव; गोल्डन गर्ल ॲलिस मंदापुरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय महोत्सवमध्ये डी.पी.बी.दयानंद शिक्षणशास्त्र म हाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपदक पटकवीला. तर ॲलिस मंदापुरे ही गोल्डन गर्ल पुरस्काराची मानकरी ठरली. डॉ. भाग्यश्री राठोड यांना उत्कृष्ट संघ व्यवस्थापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे डी.पी.बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय वरकड, तालुका क्रीडा अधिकारी तुळजापूर श्री, गणेश पवार, निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी व परीक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

**युवा महोत्सवातील स्पर्धकाचे नाव प्रकार**
**काव्य लेखन प्रथम** : ॲलिस मंदापुरे
**कथा लेखन प्रथम** : ॲलिस मंदापुरे
**कथा लेखन तृतीय** : सायली ताले
**वक्तृत्व द्वितीय** : प्रेरणा झळ्ी
**वक्तृत्व तृतीय** : शहानवाज सय्यद
**लोकगीत तृतीय** : डी.पी. बी. विद्यालय शिक्षण शास्त्र महाविद्यालय.
**लोकनृत्य प्रथम** : डी.पी.बी.विद्यालय शिक्षण शास्त्र महाविद्यालय.



# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक तयारीला वेग

## आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मतदान यंत्रे, मत मोजणी ठिकाणांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून तयारीला वेग आला असून आज आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील महत्त्वाच्या मतमोजणी ठिकाणांची पाहणी केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, ओमप्रकाश वाघमारे, प्रदीप निकते, संदीप भोसले, गणेश कोळी आदी अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी १ ते ८ कार्यालयांची पाहणी, निवडणूक प्रक्रियेचा मुख्य आधार असलेल्या निर्णय अधिकारी कार्यालयांसाठी योग्य जागेची निवड, विजेची सोय, बैठकीची जागा, दस्तऐवज ठेवण्यासाठी सुरक्षित कक्ष, आयटी सुविधा, सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेचा डॉ. ओम्बासे यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.

निर्णय अधिकाऱ्यांना अडचणीविना काम करता यावे यासाठी तत्काळ सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



### कोणतीही गैरसोय होऊ नये याकडे लक्ष देण्याच्या सूचना

मतमोजणीदरम्यान कोणताही गोंधळ होऊ नये यासाठी योजनेला अधिक काटेकोर करावं, असे त्यांनी सुचवले. नॉर्थकोट प्रशाला, नूमवि प्रशाला, रामवाडी गोदाम आणि सिंहगड कॉलेज येथे पाहणी केली. या ठिकाणी मतदान यंत्रे , मत मोजणी आणि मतदान कर्मचारी कक्ष, मार्गदर्शक फलक,पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, प्रकाशव्यवस्था, जनरेटर, इंटरनेट सुविधा या सर्वांचा बारकाईने आढावा घेतला. प्रत्येक निवडणूक दिनी नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये याकडे लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### ईव्हीएम संचयनाची कडक सुरक्षा व्यवस्था तपासली

मतदान यंत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक स्ट्राँग रूमची क्षमता, सीसीटीव्ही कव्हरेज, डबल लॉकिंग सिस्टम, पोलिस बंदोबस्त, नियंत्रण कक्ष, प्रवेश-निर्गम मार्ग, अग्निशमन उपकरणे, २४७ सुरक्षा या सर्व गोष्टींची आयुक्तांनी सखोल तपासणी करून आवश्यक निर्देश दिले. सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मतमोजणी केंद्रांची तयारी मतमोजणी दिवशी मोठी व्यवस्था उभारावी लागणार असल्याने मतमोजणी केंद्रांतील टेबल मांडणी, उमेदवार प्रतिनिधींसाठी स्वतंत्र जागा, मीडिया गॅलरी, आयटी कक्ष, प्रिंटर, वाय-फाय, पोलिस बंदोबस्त, आपत्कालीन व्यवस्था, पार्किंग यांचेही नियोजन आयुक्तांनी पाहून घेतले. डॉ. सचिन ओम्बासे यांनी सर्व विभागांनी समन्वय ठेवून निवडणूक तयारी अधिक सक्षम करण्याचे निर्देश दिले. नागरिकांनी मतदान करून लोकशाहीला बळकट करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



## सफाई कामगारांना शिक्षण, कार्यानुसार पदोन्नती देणार : पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ डिसेंबर-**

सफाई कर्मचाऱ्यांना आजारपणापासून बचाव होण्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी महापालिकेच्या वतीने सुरक्षा उपकरणे देण्यात आली आहेत. ज्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण चांगले झाले आहे व ज्यांच्याकडे गुणवत्ता व पात्रता आहे, अशा सेवकांना त्यांच्या शिक्षणानुसार व कार्यानुसार पदोन्नती दिली जाणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी सांगितले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत घनकचरा अधिकारी व सेवकांसाठी आयोजित क्षमता बांधणी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी शहर समन्वयक तेजस शहा, मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विभागीय कार्यालय क्रमांक पाचमध्ये उत्तम कार्य करणाऱ्या विठाबाई सुधाकर कांबळे, सुमन सुभाष सावळे, कृष्णा वेंकटेश बोणसे, राजू बीसना सांगे, अविनाश सुभाष सरवदे आणि नामदेव निवृत्ती वाघमारे या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# अखेर ५४ मीटर रस्ता वाहतुकीसाठी केला खुला

### महापालिका यंत्रणेने केली युद्ध पातळीवर कार्यवाही



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

शहरातील दमाणी नगर परिसरातील जुना रेल्वे ब्रीज (पूल) पाडकामाची प्रक्रिया रेल्वे विभागाकडून सुरू झाल्यानंतर वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग सज्ज करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून युद्ध पातळीवर ५४ मीटर रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. यामुळे सर्व सुविधांसह शुक्रवारी सकाळी हा पर्यायी ५४ मीटरचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी वेळेत करून दाखवले.

रेल्वे प्रशासनाकडून रविवार दि. १४ डिसेंबर रोजी १०३ वर्षे जुना रेल्वे पुल पाडकामाची प्रक्रिया सुरू झाली आहे. या ठिकाणाहून होणारी वाहतूक बंद करण्यात आल्याने यासाठी महापालिकेकडून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अनुषंगाने गेली अनेक वर्षे रखडलेले ५४ मीटर रस्त्याचे काम देखील युद्ध पातळीवर पूर्ण करण्यात आले. वाहनधारकांसाठी रस्ता डांबरीकरण, दिवाबत्तीची सोय आणि सुरक्षित वाहतुकीसाठी सर्व त्या उपाययोजना पूर्ण करून रस्ता शुक्रवारी सकाळपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दरम्यान, यानंतर आता या मार्गावरून वाहतूक सुरू झाली असून सायंकाळपासून वर्दळही वाढली आहे. या मार्गावरील आणखी विविध कामे पूर्ण करण्यासाठी अद्यापही महापालिकेची नगर अभियंता, झोन कार्यालय आणि विद्युत विभागाची टीम कार्यरत आहे. शिवाय अतिक्रमण विभागाकडून शिल्लक राहिलेले अतिक्रमण काढण्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावरील अजोरा आणि पडलेले कचऱ्याचे ढीग पाठविण्याचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे. रस्ता सर्वांसाठी खुला झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस या मार्गावरून वाहतूक सुरू झाल्याने शहर वाहतूक पोलिसांकडून वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी पथकेही तैनात करण्यात आली आहे.

### रेल्वे ब्रिज पाडण्यापूर्वीच रस्त्याचे काम फत्ते

रेल्वे ब्रिज पाडण्यापूर्वीच हा रस्ता वाहतुकीसाठी सुरु करावा. कामात कोणताही विलंब होऊ नये, गुणवत्ता आणि सुरक्षा निकष पाळून कामे तातडीने पूर्ण करावीत, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कंत्राटदारास दिले होते. अखेर महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार रेल्वे ब्रिज पाडण्यापूर्वीच हे काम फत्ते झाले. अखेर अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा ५४ मीटरचा रस्ता सर्वांसाठी खुला करण्यात आला.



## संत केतया मूर्तीची बुरुड समाज युवक संघातर्फे प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मानवतेचे उपासक संत बुरुड केतया यांच्या मूर्तीची पार्क चौकात बुरुड समाज युवक संघाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सुपेकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांच्या हस्ते जयंतीनिमि त्त प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी जिल्ह्यातील समाज बांधवांना संत केतया यांच्या साडेतीन फूट पूर्णाकृती मूर्तीचे वाटप करण्यात आले. यावेळी बुरुड समाजाचे शहराध्यक्ष सूर्यकांत शेंद्रे, विठ्ठल साळुंखे, ज्ञानदेव सुपेकर, नवनाथ सुरवसे शिवाजी जतकर संदीप सुरवसे, सचिन वडतीले, विजय जतकर, विष्णू साळुंखे, कृष्णकुमार कुकडे, सोनवा जतकर, गोपी जतकर, ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले, राजू साळुंखे, प्रशांत रोहिटे, युवराज सुरवसे उपस्थित होते. सायंकाळची महापूजा समाजातील जेष्ठ महिला भगिनींच्या हस्ते करण्यात आली. यावेळी लक्ष्मी साळुंखे, अंजना सुरवसे, वैशाली जतकर, वैशाली सुरवसे, माधुरी सुरवसे, संगीता वडतीले, शिलार रोहिटे, रूपाली शेंद्रे उपस्थित होत्या.

## कार्यरत, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ

### महापालिका मुख्य लेखाअधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महापालिका कर्मचारी अधिकारी, सेवानिवृत्त सेवक व माध्यमिक प्रशालेकडील सेवानिवृत्त सेवकांच्या महागाई भत्यात ४ टक्के वाढ करण्यात आली आहे. कार्यरत रोजंदारी सेवकांच्या दैनंदिन दरामध्ये ५० रुपये इतकी वाढ करण्यात आली तर बालवाडी शिक्षिका व सेविका यांच्या दरमहा मानधनामध्ये ५०० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. अर्जित रजेचे सर्वांचे सात कोटी रुपये मंजूर केले आहे.याबाबतचे परिपत्रक महापालिका मुख्य लेखाअधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी काढले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मान्यतेने हा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर म हानगरपालिका कर्मचारी अधिकारी, सेवानिवृत्त सेवक व माध्यमिक प्रशालेकडील सेवानिवृत्त सेवकांना म हागाई भत्याचा दर ४० टक्के वरून ४४ टक्के इतका करण्यात आला असून एकुण ४ टक्के वाढ करण्यात आली आहे.सध्या सोलापूर महानगरपालिकेत कार्यरत रोजंदारी सेवकांचे दैनंदिन दरामध्ये ५० रुपये इतकी वाढ करण्यात येत आहे. सध्या सोलापूर महानगरपालिकेत कार्यरत बालवाडी शिक्षिका व सेविका यांना अदा करण्यात येणाऱ्या दरमहाचे मानधनामध्ये ५०० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. या प्रमाणे सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी माहे डिसेंबर-२०२५ पेड इन जानेवारी-२०२६ ची वेतन /निवृत्ती वेतन/कुटुंब वेतन/माध्यमिक प्रशालेकडील सेवानिवृत्त सेवकांचे बिले तयार करून अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडून तपासणी करून रक्कम अदायगी साठी सादर करावीत. अंतर्गत लेखापरिक्षक यांनी या बिलांची तपासणी करताना व्यवसाय कराची खात्री करण्यात यावी, असे महापालिका मुख्य लेखाअधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी परिपत्रकात स्पष्ट केले आहे.

### महापालिका शिक्षकांच्या सातवा वेतन आयोगाचा दुसरा हप्ता मंजूर



महापालिकेतील फेब्रुवारी २०२५ पर्यंतच्या सर्वांचे अर्जित रजेचे सात कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. म हापालिका शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता ५० लाख रुपयेही मंजूर केले आहेत, असे मुख्य लेखाअधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी सांगितले.

## न्यायालयाने दिले स्त्री सक्षमीकरणाला आणखी बळ

### विवाहातील भेटींवर राहणार आता महिलांचा हक्क

स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने भारतातील न्यायालयांनी गेल्या काही वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दिले आहेत. त्यात अलीकडेच दिलेला एक निर्णय विशेषत: उल्लेखनीय ठरतो. विवाहाच्या कालावधीत महिलेला मिळालेल्या भेटवस्तू, दागदागिने, मालमत्ता किंवा इतर मौल्यवान वस्तूंवर तिचाच संपूर्ण हक्क आहे आणि विवाह संपुष्टात आल्यास ती त्या वस्तू परत मागू शकते, असा न्यायालयाचा ठाम संदेश आहे.

भारतीय समाजात विवाहसोहळा हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानला जातो. या सोहळ्यात मुलीला विविध प्रकारच्या भेटी दिल्या जातात. सोन्याचे दागिने, साड्या, घरातील साहित्य, रोखरक्कम, कधी कधी लहान-मोठ्या मालमत्ताही. परंतु विवाह संपल्यावर या वस्तू कोणाच्या ताब्यात राहतील, यावर अनेकदा वाद निर्माण होतो. अनेक महिलांना त्यांच्या वस्तू परत मागण्यासाठी घरगुती, सामाजिक वा आर्थिक दबावांचा सामना करावा लागतो. अनेक प्रकरणांत त्या वस्तूंवर त्यांचा हक्क सिध्द करणेही कठीण ठरते. याच वास्तवाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने दिलेला हा निर्णय म हिलांसाठी मोठा दिलासा आहे. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, विवाहातील भेटवस्तू या 'गिफ्ट' म्हणून पाहिल्या जात असल्या तरी त्या प्रत्यक्षात महिलेला दिलेली आर्थिक आणि वैयक्तिक मालमत्ता आहेत. त्या वस्तूंवर तिचा हक्क अबाधित राहतो. विवाह टिकला किंवा तुटल्यावर त्या मालमत्तेच्या अधिकारावर काहीही परिणाम होत नाही. भारतामध्ये महिलांच्या हक्कांबाबतची जाणीव वाढत असताना, न्यायालयीन स्तरावरही महिला सक्षमीकरणाला बळ देणारे अनेक महत्त्वाचे निर्णय दिले जात आहेत. त्यापैकीच एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने दिला असून, विवाहाच्या काळात मिळालेल्या भेटवस्तू आणि मालमत्ता या महिलेला परत मागण्याचा स्पष्ट हक्क आहे, दि. २ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, विवाह हा केवळ सामाजिक बंध नसून, त्या नात्यामध्ये महिलेला मिळणारे आर्थिक व मालमत्तेचे अधिकार अत्यंत महत्त्वाचे आहेत. विवाहकाळात पती किंवा पतीच्या कुटुंबाकडून दिल्या गेलेल्या भेटी, सोन्याच्या वस्तू, रोख रक्कम किंवा इतर मौल्यवान वस्तू या केवळ 'गिफ्ट' म्हणून न पाहता त्या महिलेला मिळालेली कायदेशीर मालमत्ता मानावी, असेही न्यायालयाने नमूद केले.

**महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी संरक्षण :** विवाह तुटल्यानंतर अनेक महिलांवर मुलांची व स्वत:ची जबाबदारी येते. अशा वेळी भेटवस्तू व दागिने हे तिचे आर्थिक आधार बनू शकतात.

**स्वाभिमान टिकवणारा अधिकार :** विवाहानंतर आपली स्वत:ची वस्तू मागण्यास महिलांना अपमानास्पद वाटते. न्यायालयाने स्पष्ट केले की, स्वत:ची मालमत्ता मागणे हा अपमान नाही, तर हक्कांचा वापर आहे.





**कौटुंबिक दडपशाहीवर मर्यादा :** अनेकदा महिलांना घरातील मोठ्यांकडून किंवा पतीकडून वस्तू न देण्याचा दबाव येतो. आता न्यायालयाचे मार्गदर्शन स्पष्ट असल्याने महिलांना मागणी करण्याचा आत्मविश्वास मिळेल.

**कायद्याच्या दृष्टिकोनात मोठा बदल :** विवाह हा केवळ सामाजिक करार नसून आर्थिक नातेसंबंधही तयार करतो. न्यायालयाच्या या निर्णयाने या आर्थिक नात्याची स्पष्ट व्याख्या झाली आहे. हा निर्णय केवळ एक कागदी निकाल नाही, तो महिलांच्या आयुष्यावर थेट परिणाम करणारा आहे. समाजात महिलांची आर्थिक ओळख अधिक सक्षम करण्यासाठी अशी पावले अत्यंत महत्त्वाची ठरतात. विवाहानंतरच्या नातेसंबंधात एकतर्फी सत्ता न राहता, दोन्ही बाजूंना समान अधिकार मिळावेत. हा विचार या निर्णयातून अधिक प्रबळ होतो. आज महिला शिक्षण, नोकरी, उद्योजकता या सर्व क्षेत्रांत पुढे जात आहेत. अशा काळात त्यांची आर्थिक स्वायत्ता टिकवण्यासाठी न्यायालयाने केलेली स्पष्ट मांडणी ही महिलांसाठी मोठी जिंकणारी बाब आहे. विवाहातील भेटी या केवळ आठवणी नाहीत; त्या महिलेला मि ळालेला हक्क आहेत-हा संदेश कायद्याने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

**महिला जगत**
**आरती कुसेकर**
**मो.9763751000**



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### जयभवानी प्रशाले लगतच्या आरक्षित जागेवर पार्किंगची सोय करा

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

पार्किंगची सुविधा नसल्याने शहराच्या मध्यवर्ती भागातील चाटी गल्ली, भुसार गल्ली, सराफ बाजार, व मधला मारुती परिसरातील ट्रॅफीकची मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण झाली आहे.ही समस्या सोडवण्यासाठी भवानी पेठ येथील जय भवानी प्रशालेलगत पार्किंगसाठी आरक्षित असलेल्या जागेवर पार्किंगची सोय करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक चारतर्फे करण्यात आली आहे. या संदर्भात या प्रभागाचे माजी नगरसेवक अनंत जाधव, विनायक विटकर, माजी नगरसेविका वंदना गायकवाड आदींनी महापालिका आयुक्त यांना निवेदन दिली आहे. याच परिसराला लागून जयभवानी प्रशालेलगत महापलिकेचे आरक्षण असलेल्या २० हजार स्केअर फूट जागेवर पे अणि पार्किंग महापालिकेच्या वतीने सुरु करावी. ही सोय झाल्यास व्यापारपेठांच्या परिसरातील पार्किंगची दूर होईल, असे या निवेदनात नमूद आहे. निवेदनावर गिरीश देवरमनी, लक्ष्मण भाईकट्टी, देविदास चेळेकर, सचिन कुलकर्णी, शिवानंद सावळगी आदींच्या सह्या आहेत.



### रमाई आवास योजनेत सात-बारा अट रद्द करावी : चंदनशिवे

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महानगरपालिका आयुक्त यांच्या समवेत राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या उपस्थितीमध्ये सोलापूर महानगरपालिका आयुक्त कार्यालयमध्ये रमाई घरकुल आवास योजना अंतर्गत वंचित लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी बैठक झाली. चंदनशिवे यांनी या योजनेतील जाचक अटी निदर्शनास आणून दिल्या. ७/१२ अट रद्द करावी. खासगी जागा व घोषित झोपडपट्ट्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी केली. सोलापूर महानगरपालिके अंतर्गत राबवण्यात येणारी रमाई घरकुल आवास योजना ही मागासवर्गीय बांधवांसाठी अत्यंत महत्त्वाची घरकुल योजना परंतु प्रत्यक्षात योजना लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचण्याऐवजी सार्थक परतीच्या अडथळ्यात अडकून पडली होती. बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे, समाज कल्याण विभाग सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, उपायुक्त अशिष लोकरे, नगर अभियंता सारिका अकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यकटेश चौबे, सुप्रिया ऐदाळे, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल क्षीरसागर, चंद्रकांत सोनवणे उपस्थित होते.



### डॉ. सुरेश शेळके यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. १३ डिसेंबर-**

आनंदी युनिवर्स फाऊंडेशनच्यावतीने देण्यात येणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ एस. एस. ग्रो एजन्सीची यशस्वी वाटचाल यासाठी एस. एस. ग्रोचे संस्थापक डॉ. सुरेश शेळके यांना सिने कलाकार प्रसाद शिखरे, आनंदी युनिवर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश विटकर यांच्या हस्ते पुणे येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला. एस.एस. ग्रो एजन्सीच्या माध्यमातून गावपातळीवर शेतकऱ्यांचे नेटवर्क तयार करुन त्यांना शेतीत उत्पादन कोणते घ्यावे, माती परीक्षण आणि पिकांवर तंत्रज्ञांनाचा वापर करुन औषधाची फावरणी कशी करावी याचे सातत्याने प्रशिक्षण शेतीच्या बांधावर जाऊन देणे. या सगळ्या कामाची दखल घेत हा पुरस्कार एस.एस. ग्रोच्या यशाचे शिलेदार दिनेश सुपेकर, संजय, संकेत यांच्यावतीने मी स्वीकारला. या पुरस्कार कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलेले ज्येष्ठ रंगकर्मी उल्हास वेदपाठक, समाज कार्य शिक्षणतज्ञ डॉ. युसुफ बेन्नुर उपस्थित होते.

### टीईटीबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी

**सोलापूर,दि.१३ डिसेंबर-**

टीईटी संबंधित काही मुद्द्यांबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी अन्यथा मनसे शिक्षक सेनेतर्फे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांना घेरण्यात येईल, असा इशारा मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के यांनी पत्रकार परिषदेत दिला. उच्च न्यायालयाच्या दि.१ सप्टेंबर २०२५ रोजीच्या निर्णयाद्वारे पाच वर्षे सेवा राहिलेल्या शिक्षकांव्यतरिक्त सर्व शिक्षकांना त्यांच्या सेवेमध्ये दोन वर्षात टीईटी उत्तीर्ण अनिवार्य करण्यात आले आहे. ही परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवेतून कमी अथवा स्वेच्छा निवृत्ती घ्यावी, असा निर्णय दिलेला आहे. तथापि ज्या शिक्षकांची सेवा ५ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी काळ शिल्लक आहे, त्यांना या टीईटी अटीतून वगळण्यात आले आहे. मात्र अशा शिक्षकांना जर पदोन्नती हवी असेल तर त्यांनाही टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक असेल. सेवेत टिकून राहण्यासाठी आणि पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. यावर राज्य शासनाने आजपर्यंत कोणतीच भूमिका घेतली नाही. टीईटीसंदर्भात आरटीई कायदा आणि महाराष्ट्र शासनाचे सर्व शासन निर्णय लागू असताना १ सप्टेंबर २०२५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर राज्य शासनाने अद्यापपर्यंत कोणतीच भूमिका स्पष्ट न केल्याने राज्यातील लाखो शिक्षकांवर संकट निर्माण झाले आहे. म्हणून शासनाने आपली भूमिका वेळेत स्पष्टपणे जाहीर करावी अन्यथा मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना मनसे शिक्षक सेना घेरणार आहे, असे हक्के यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस संघटनेचे शहराध्यक्ष वीरसंगप्पा भोज, शशिकांत तोळनुरे आदी उपस्थित होते.

# लेक झाली ‘दगड’: प्रेमात आंधळी की निष्ठुर?

## काळजाचा हंबरडा अन् मूक आक्रोश

## आईने मारलेली मिठीही लेकीला पाझरली नाही

## प्रेमविवाहानंतर वैराग पोलिस ठाण्यातील हृदयद्रावक प्रसंग

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि.१३ डिसेंबर-**

आई-वडिलांनी २० वर्षे ज्या फुलाला उन्हातान्हात कष्ट करून जोपासले, तेच फूल परक्याच्या ओंजळीत जाताना देठाला (आई-वडिलांना) विसरले. अशीच एक हृदयद्रावक घटना वैराग पोलीस ठाण्यात घडली. प्रेमासाठी पळून गेलेली मुलगी जेव्हा तिच्या प्रियकरासोबत पोलीस ठाण्यात हजर झाली, तेव्हा आई बेशुद्ध पडली, बाप कोपऱ्यात जाऊन मुकाट्याने रडू लागला, पण ज्या मुलीसाठी हे सर्व घडले, तिच्या डोळ्यांत मात्र ना पाझर होता, ना पश्चात्ताप!

**शिक्षण आणि प्रेमाची कहाणी**

ही कथा केवळ पलायनाची नसून, पालकांच्या विधासपाताची (विश्वासाघाताची) आहे. मुलीला चांगले शिक्षण आणि उत्तम भविष्य मिळावे म्हणून तिच्या आई-वडिलांनी तिला वैराग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात तिच्या नातलगांकडे (मामाकडे) शिक्षणासाठी ठेवले होते.

आई-वडील शेतात राबून, पै-पै जोडून मुलीच्या शिक्षणासाठी पैसे पाठवत होते. 'आमची



पोरगी शिकतेय, साहेबासारखी मोठी होणार,' हे स्वप्न बापाने उराशी बाळगले होते. मात्र, इकडे मुलीचे गावातीलच एका तरुणाशी सूत जुळले आणि पालकांच्या या २० वर्षांच्या निस्वार्थ तपश्चर्येवर तिने पाणी फेरले.

**तपास आणि सत्य**

दोन महिन्यांपूर्वी मुलगी अचानक गायब झाली. हे कळताच आई-वडिलांच्या पायाखालची वाळू सरकली. मुलीच्या सुरक्षिततेच्या विचाराने आईने अन्न-पाणी सोडले. नातेवाईकांनी वैराग पोलिसांत धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजित जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली तपासाची पथके फिरली. अखेर दोन महिन्यांनी या पळून गेलेल्या जोडप्याचा शोध लागला. तोपर्यंत त्यांनी विवाह केला होता.

कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासाठी पोलिसांनी नवविवाहित दांपत्याला आणि मुलीच्या आई-वडिलांना पोलीस ठाण्यात बोलावले.

**काळजाला पीळ पाडणारा क्षण**

दोन महिने ज्या क्षणाची वाट पाहत होते, तो क्षण समोर आला. आपल्या काळजाच्या तुकड्याला सुखरूप पाहून आईचा बांध फुटला. ती पोलीस ठाण्यातच धाय मोकलून रडू लागली. वडिलांचेही डोळे पाणावले.

पोलिसांनी माणुसकीच्या नात्याने मुलीला समजावण्याचा प्रयत्न केला, बाळा, एकदा आईकडे बघ, वडिलांकडे बघ, असे सांगत होते. आई पदर पसरून विनवणी करत होती. मी मर्जीने लग्न केलंय... - निष्ठुर लेकीचं उत्तर, आई जमिनीवर! आईच्या रडण्याने दगडालाही पाझर फुटला असता, पण या मुलीवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तिने अत्यंत तुसडेपणाने आणि कोरडेपणाने पोलिसांसमोर आणि पालकांसमोर सांगितले:

'मी माझ्या मर्जीने लग्न केले आहे. हा माझा निर्णय आहे. तुम्ही आता आम्हाला वेगळे करण्याचा किंवा त्रास देण्याचा प्रयत्न करू नका.'

हे वाक्य बापाच्या काळजात कटारीसारखे घुसले. आपलीच मुलगी आपल्याला इतक्या निष्ठुरपणे कशी वागवू शकते, या विचाराने हतबल झालेले वडील पोलीस ठाण्याच्या एका कोपऱ्यात जाऊन पाठ फिरवून मुकाट्याने रडू लागले त्यांचा स्वाभिमान आणि प्रेम दोन्हीही पायाखाली तुडवले गेले होते.पोलीस ठाण्यात बघ्यांची गर्दी जमली होती, वातावरण तणावपूर्ण झाले होते. मात्र,साह्हयक पोलीस निरीक्षक विश्वजित जगदाळे आणि हवालदार फुलचंद जाधवर यांनी परिस्थिती अत्यंत कौशल्याने हाताळली. पालकांचे सांत्वन केले आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गर्दी पांगवली. समाजाला प्रश्न आणि उपदेश या घटनेनंतर समाजात एकच प्रश्न उपस्थित होत आहे: प्रेम करणे गुन्हा नाही, पण प्रेमासाठी आई-वडिलांचा बळी देणे कितपत योग्य आहे? ज्या आईने तुम्हाला ९ महिने पोटात वाढवले, प्रसूतीच्या कळा सोसून तुम्हाला जग दाखवले आणि ज्या बापाने स्वतःचे जुने कपडे शिवून तुम्हाला नवीन फ्रॉक आणला, त्या आई-वडिलांपेक्षा जगात कुणीही मोठे नसते.

**लाडक्या लेकींना एक गोष्ट लक्षात ठेवण्याचा सल्ला**

- ✻ दोन महिन्यांच्या किंवा दोन वर्षांच्या प्रेमासाठी, ज्यांनी तुमच्यावर २०-२२ वर्षे निस्वार्थ प्रेम केले, त्यांना असे उघड्यावर सोडू नका.
- ✻ तुमचा जोडीदार नक्की निवडा, पण जोडीदाराचा हात धरताना, ज्या हातांनी तुम्हाला बोट धरून चालायला शिकवले, त्या हातांना झिडकारू नका.
- ✻ नवऱ्याच्या प्रेमात कदाचित चढ-उतार येतील, पण आई-बापाच्या डोळ्यांतून पडणाऱ्या त्या आसवांचा हिशोब नियती नक्कीच मागते.
- ✻ आई-बापाचा शाप कधीच लागत नाही, पण त्यांचे 'सुस्कारे' आयुष्याची राखरांगोळी करायला पुरेसे असतात.
- ✻ निर्णय घेताना भावनांच्या आहारी न जाता, कर्तव्याचे भान ठेवा.



## जवाहर नवोदय प्रवेश परिक्षासाठी १ हजार ७३ विदयार्थी

**माळशिरस, दि. १३ डिसेंबर-**

जवाहर नवोदय प्रवेश परिक्षासाठी माळशिरस तालुक्यातील माळशिरस, नातेपुते, अकलूज या तीन केंद्रातील ५वी च्या १ हजार७३ विदयार्थ्यांनी परिक्षा दिली असल्याची माहिती माळशिरस केंद्रातील केंद्र निरीक्षक निलेश आदमाने यांनी दिली. या वेळी गोपाळराव देव प्रशालेचे मुख्याध्यापक धनंजय केसकर, केंद्र संचालक सूर्यकांत जानकर उपस्थित होते.

नवोदय २०२६ च्या प्रवेशासाठी आज तालुक्यातील माळशिरस केंद्रातून ३५३, नातेपुते ३६०, अकलूज केंद्रातून ३६०, विद्यार्थांनी परिक्षा दिली, सदरची परिक्षा एबीसीडी कोड मधून घेण्यात आली. या परिक्षेसाठी सकाळ साडे नऊ पासुनच पालक विद्यार्थी शिक्षकांनी गर्दी केली होती परिक्षा केंद्रामध्ये व बाहेर विद्यार्थी परिक्षेच्या बैठकीची माहिती फलकावर लावण्यात आली होती. त्यावेळी विद्यार्थी व पालकांना सुलभ झाले. कोणताही अनुसुचित प्रकार घडू नये म्हणून पोहॅकॉ एम. पी. थोरात व त्यांचे हजर होते. तसेच विद्यार्थ्यांसाठी आरोग्य पथक उपस्थित होते.

## अक्कलकोटच्या सहाय्यक बीडीओपदी अमोल मुंडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ डिसेंबर-**

येथील पंचायत समिती सहायक बिडीओपदी कागल पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पदावरून पदोनती मिळालेली अमोल मुंडे रुजू झाले आहेत. गेल्या अनेक महिन्यापासून अक्कलकोट पंचायत समिती सहायक बिडीओपद रिक्त होते. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरीं आणि कागल पंचायत समिती येथे अमोल मुंडे हे गेल्या दहा वर्षापासून विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. येथून सात नोव्हेंबर रोजी पदोनती मिळाल्याने विस्तार अधिकारी पदावरून थेट अक्कलकोटला सहाय्यक बिडीओ म्हणून १४ नोव्हेंबर रोजी हजर झाले आहेत.



## वांगरवाडी येथे मारहाणप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१३ डिसेंबर-**

तालुक्यातील मौजे वांगरवाडी येथे हलगी वाजवण्याच्या दरम्यान मजूर बाळू शिंदे यांना जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केल्याची गंभीर घटना घडली असून याप्रकरणी बार्शी तालुका पोलिसांत चारजणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना ८ डिसेंबर रोजी घडली.




फिर्यादी बाळू आप्पा शिंदे, (वय ६०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांना गावातील मनोज दिनकर काळे यांनी हलगी वाजवण्याची सुपारी दिल्याने ते व त्यांचा सहकारी रामहरी लोखंडे हे सायंकाळी ७ वाजता ग्रामपंचायत कार्यालयाजवळ जमले होते. ग्रामदैवत श्री वेताळसाहेब यांच्या दर्शनासाठी गावातील कार्यकर्त्यांसोबत हलगी वाजवत पायी जात असताना रात्री ९.३० वाजता पाण्याच्या टाकीजवळ ही घटना घडली. त्यांच्या तक्रारीनुसार त्या ठिकाणी उपस्थित असलेले कमलेश तानाजी तुपे, अनिल बाळासाहेब तुपे, समाधान महादेव नलवडे, रामदास संपत तुपे, (सर्व रा. वांगरवाडी) फिर्यादी हे मातंग समाजातील असल्याचे माहित असूनही त्यांना जातीवाचक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यातील अनिल तुपे याने हातातील लाकडी काठीने त्यांच्या डाव्या हातावर मारहाण केली तर इतरांनी हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केले. घटनास्थळी उपस्थित रविकांत साळुंके, गणेश काळे, मनोज काळे, भालचंद्र घोलप यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. आरोपी मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करत पळून गेले. उपचार घेतल्यानंतर तब्येत सुधारल्याने त्यांनी दि. ११ डिसेंबर रोजी तक्रार नोंदविली आहे. या संदर्भात बार्शी तालुका पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी, मारहाण व दुखापत केल्याप्रकरणी संबंधित चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष सुशील बंदपटे यांनी दिला पदाचा राजीनामा

**भाजपाकडून उमेदवारी अर्ज घेतला**

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर :**

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी शहरअध्यक्ष चेतन नरोटे यांच्याकडे पदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर त्यांनी भाजपाकडे नगरसेवकसाठी इच्छुक म्हणून नगरसेवक पदासाठी अर्ज घेतला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून बंदपट्टे यांची ओळख निर्माण झाली होती. काँग्रेसने त्यांची कार्याध्यक्षपदी निवड केली होती. मनपा निवडणुकीपूर्वी त्यांनी पदाचा राजीनामा दिल्याने काँग्रेसमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहेत. बंदपट्टे यांनी शहर भाजप कार्यालयात जाऊन प्रभाग ४ मधून निवडणूक लढविण्यासाठी अर्ज घेतला. बंदपट्टे यांच्या राजीनाम्याची चर्चा शहरात खूपच रंगली आहे.

## परमार्थ हा आपल्या वृत्तीवर अवलंबून असतो : हभप जयवंत महाराज बोधले

**सांगोला,दि.१३ डिसेंबर-**

परमार्थ हा कृतीवर आधारित नसतो तर तो आपल्या वृत्तीवर अवलंबून असतो. त्यामुळे आपण आपली वृत्ती सुधारली पाहीजे. त्यासाठी साधकांनी विहीत कम द्दिारे पुण्याचा संचय केला पाहिजे असे उदगार हभप.डॉ.जयवंत महाराज बोधले यांनी काढले. ते सांगोला येथील ध्यान मंदीरात श्री समर्थ सदगुरु गोंदवलेकर महाराज यांच्या ११२ व्या पुण्यतिथी निमित आयोजित प्रवचनात बोलत होते. या उत्सवाच्या निमित्ताने ध्यान मंदीर येथे मंगळवार दि.९ ते गुरुवार दि.११ डिसेंबर २०२५ या दिवशी दररोज संध्या.६ ते ८ वाजेपर्यंत हभप.डॉ.जयवंत महाराज बोधले यांचे नामस्मरण व अभ्यास या विषयावर प्रवचन संपन्न होत आहेत. गेले तीन चालू असलेल्या सुश्राव्य अशा प्रवचनांमुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले. हभप.डॉ.जयवंत महाराज बोधले यांनी यावेळी बोलताना अनेक उदाहरणातून पाप पुण्याबाबत विचार मांडताना संत तुकाराम महाराजांनी पाप आणि पुण्याची सर्वात सोपी पद्धत करून सांगितली असून ती आपण समजून घेतली पाहीजे असेही ते म्हणाले.




## ब्रिजवर कंटेनरची कारला धडक; चावी घेऊन चालक पसार

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

बाळे ब्रिज परिसरात कंटेनर चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत कारला धडक दिल्याची घटना गुरुवार ११ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी राजकुमार किसनराव गायकवाड रा. आदित्य नगर, सोलापूर हे एमआयटी कॉलेज येथून सहकाऱ्यांसोबत कार (एमएच १३ सीएस ६४५८) मधून तामलवाडीच्या दिशेने जात असताना बाळे ब्रिजवर मागून येणाऱ्या कंटेनरने (एनएल०१ एन ८६६२) ओव्हरटेक करताना त्यांच्या कारच्या उजव्या बाजूला घासत जोराची धडक दिली. अपघातानंतर संबंधित कंटेनर चालकाने कंटेनरची चावी घेऊन पलायन केले. कारचे अंदाजे १.५ लाखांचे नुकसान झाले आहे. अज्ञात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस नामदार कामुर्ती करीत आहेत.

# बार्शी-वैराग मार्गावर वाढत्या अपघातांचे तांडव; तरुण पिढी ठरतेय बळी

## प्रशासनाने त्वरित उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

**वैराग, दि.१३ डिसेंबर-**

बार्शी तालुका आणि वैराग भागामध्ये अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस भयंकर वाढले असून, या जीवघेण्या घटनांमध्ये विशेषतः तरुण पिढीचा नाहक बळी जात आहे. या वर्षात अपघातांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून येत असून, सामान्य नागरिकांमध्ये यामुळे तीव्र संतापाचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. रस्ते अपघातांमुळे होणारी जीवितहानी थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**ब्लॅक स्पॉट' अन् गतिरोधकांची गरज**

बार्शी शहरातून वैराग-पानगाव कडे जाणाऱ्या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण खूप जास्त आहे. वारंवार अपघात होणाऱ्या 'ब्लॅक स्पॉट' निश्चित करून त्या ठिकाणी तातडीने सुरक्षित आणि योग्य मापाचे गतिरोधक बसवणे अत्यावश्यक आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, ज्या ठिकाणी गतिरोधकांची नितांत गरज आहे, तिथे प्रशासनाकडून हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात आहे, ज्यामुळे निष्पाप लोकांचा जीव जात आहे. अपघातांची आकडेवारी वाढल्यानंतरही निष्क्रिय राहणे, हे प्रशासनाच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष करणारे आहे, अशी टीका होत आहे.

**सामान्य नागरिकांकडून प्रशासनाला आवाहन** - या संपूर्ण गंभीर परिस्थितीवर प्रशासनाने तात्काळ आणि गांभीर्याने दखल घ्यावी, अशी सामान्य नागरिक आणि जनतेतून तीव्र मागणी होत आहे. विनाकारण होणारे मृत्यू थांबवण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करणे गरजेचे आहे.



**युवा पिढीचे नुकसान**

सध्याच्या काळात होत असलेल्या अपघातांमध्ये युवा आणि तरुण पिढीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. भविष्याचा आधार असलेली ही पिढी अकाली मृत्यूमुखी पडल्याने कुटुंबावर आणि समाजावर गंभीर परिणाम होत आहेत.

**नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी**

अपघातांना केवळ खराब रस्ते किंवा गतिरोधकांचा अभाव कारणीभूत नसून, वाहन चालवताना नियमांचे उल्लंघन करणे हे देखील महत्त्वाचे कारण आहे. वाहन चालवताना सर्रासपणे मोबाईल फोनचा वापर करणे. मद्यपान करून वाहन चालवणे, रस्त्यावर वेगमर्यादेचे उल्लंघन करणे या पार्श्वभूमीवर, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक आणि सक्तीची कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. विशेषतः 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' करणाऱ्यांवर कठोर शिक्षेची अंमलबजावणी झाल्यास, अपघातांना आळा बसू शकेल.

**यासाठी खालील उपाय त्वरित अंमलात आणावेत**

- ✻ अपघातप्रवण क्षेत्रांचे सर्वेक्षण व गतिरोधक बसवणे,
- ✻ वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कठोर कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करणे.
- ✻ रस्त्यांवरील दिशादर्शक फलक आणि परावर्तक पट्ट्यांची व्यवस्था करणे.
- ✻ वाहतूक सुरक्षा आणि नियमांविषयी नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवणे.
- ✻ जर प्रशासनाने आताच योग्य ती उपाययोजना केली नाही, तर हे अपघात सत्र असेच सुरू राहील आणि अनेक निष्पाप नागरिकांचा बळी जाईल, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.
- ✻ प्रशासनाने केवळ आश्वासने न देता, प्रत्यक्षात कृती करावी, अशी जनतेची मागणी आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अकलुजसह परीसरात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१२ डिसेंबर -**

लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अकलुज , माळीनगर सह तालुक्यातील विविध ठिकाणी त्यांना वंजारी समाजासह सर्व धर्मीय समाज बांधवांच्या अभिवादन करण्यात आले.



येथील गोपीनाथ मुंडे साहेब युवा प्रतिष्ठान तसेच दि सासवड माळी साखर कारखाना माळीनगर येथे नगरी कॅम्प मध्ये त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी बाळासाहेब पानसरे, बाळासाहेब खाडे, किशोर नाना घोलप, धनाजी भाऊ भोसले, विकी घोलप, सोमनाथ बगाडे, शंकर चुनाडे, अभिषेक खाडे, प्रतीक नागरगोजे, शुभम खाडे, अनिल खाडे, गणेश साबळे चेतन पवार, फारूक शेख, शिवाजी भाऊ, दोरकर सुनील आप्पा भिंगारदिवे, सुरज कुरुंद, दत्तात्रय साबळे, रंजीत इंगळे, राजू साळुंखे, राजू साळुंखे, ओंकार बगाडे, अक्षय बेंद्रे, अभिषेक देवळकर यांचेसह गोपीनाथ मुंडे साहेब युवा प्रतिष्ठान अकलूज संघटनेचे पदाधिकारी तर दि सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर येथे नगरी कॅम्प मध्ये दत्ता सांगळे, संजय सांगळे, गिनयानदेव खाडे, छगन खाडे मामा, आजिनाथ खटके, पप्पू खाडे व इतर मुंडे भक्त उपस्थित होते.



### महत्त्वाचे




## उपसरपंच पाटोळे व सदस्या शेख यांचे सदस्यत्व अबाधित

**सांगोला, दि. १३ डिसेंबर-**

होटगी स्टेशनचे माजी सरपंच जगनाथ गायकवाड यांनी उपसरपंच सुभाष पाटोळे व ग्रामपंचायत सदस्या मोहबतबी शेख यांचे सदस्यत्व रद्द करण्याची तक्रार जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फेटाळल्याने उपसरपंच पाटोळे व सदस्या शेख यांचे सदस्यत्व अबाधित राहीले आहे. सुभाष पाटोळे यांनी ग्रामपंचायत निवडणूकीत विहीत नमुन्यात खर्चाचे तपशील व शपथपत्र न दिल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची तक्रार गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. जिल्हाधिकारी यांच्या तपासणीत विहीत नमुन्यात खर्च तपशील आढळून आल्याने त्यांचे सदस्यत्व अबाधित राहीले आहे. शिवाय ग्रामपंचायत सदस्या मोहबतबी शेख या २२ सप्टेंबर ते २३ फेब्रुवारी या कालावधीत मासिक बैठकीला गैरहजर असल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी गायकवाड यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे तक्रार केली होती. सीईओंनी या तक्रारीची चौकशी करून शेख यांचे सदस्यत्व अबाधित ठेऊन माजी सरपंच गायकवाड यांची तक्रार फेटाळली आहे.

## सुळेवाडी-गारवाड रस्त्याच्या निकृष्ठ कामाची चौकशी करा; विक्रम सुळे यांची मागणी

**पिलीव, दि. १३ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी गारवाड (दंडाचीवाडी) ह्या रस्त्याचे काम दोन महिन्यापूर्वीच झालेले आहे. सदरचे काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे झाले असून अवघ्या दोनच महीन्यात सदरचा रस्ता उखडला आहे. ह्या रस्त्याचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे झालेले नाही. अवघ्या दोनच महीन्यात रस्ता उघडून यावर जागोजागी मोठ-मोठे खड्डे पडू लागले आहेत. आपण सदरच्या रस्त्याची साईटवर येऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याशिवाय संबंधित ठेकेदाराला बिल अदा करु नये अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे विक्रम सुळे यांनी सोलापूर जिल्ह्य परिषदेचे बांधकाम अभियंता तसेच माळशिरस पंचायत समितीचे अभियंता यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## सांगोल्यात माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे उद्योग प्रशिक्षण

**सांगोला, दि. १३ डिसेंबर-**

स्थानिक महिलांना स्वावलंबन आणि उद्योजकतेकडे मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला तर्फे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात रॅम्प प्रोग्रामच्या माध्यमातून महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन देण्यात येणार आहे. यामध्ये छोट्या उद्योगांची सुरुवात कशी करावी, बाजारपेठ आणि विक्रीचे मार्गदर्शन, बँक व शासन योजनांद्वारे मिळणारी आर्थिक मदत, नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांचा वापर, उत्पादनाची गुणवत्ता व ब्रँडिंग कौशल्य याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच उद्यम आधार असलेल्या महिलांना विशेष सहाय्यही उपलब्ध करून दिले जाणार आहे. तरी इच्छुक प्रशिक्षणार्थिंनी नीता लाटणे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी दु.१२ ते ४ या वेळेत उत्कर्ष कौशल्य विकासन केंद्र, शनि गल्ली, सांगोला येथे आयोजित करण्यात आले आहे.



## स्वर्गीय शिवराज पाटील यांना सोलापूर जिल्हा काँग्रेसतर्फे अभिवादन

**सांगोला, दि. १३ डिसेंबर-**

माजी लोकसभेचे सभापती माजी राज्यपाल माजी संरक्षण मंत्री स्वर्गीय शिवराज जी पाटील चाकूरकर यांच्या अंत्यविधीत लातूर येथे जाऊन जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी माजी आमदार विश्वनाथ चाकोते, सिद्धेश्वर नगरे, राष्ट्रवादीचे शंकर पाटील, शंकर गायकवाड, उत्तम वाघमारे, जहांगीर शेख, बाळ दळवी व काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री सातलिंग शट गार यांनी स्वर्गीय शिवराजजी पाटील यांचे सुपुत्र शैलेश पाटील यांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी माजी मंत्री बसवराज पाटीलसह देशातून आलेले सर्व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीपूर येथील आंदोलनाने फोडली ऊस दराची कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १३ डिसेंबर-**

सध्या शेतकरी संघटनेच्या वतीने संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात ऊसाला ३ हजार ५०० रुपयांचा दर मिळावा या मागणीसाठी आंदोलन चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यावर शुक्रवार दि. १२ डिसेंबर रोजी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी दिपक भोसले, तानाजी बागल, सचिन पाटील, अॅड. दिपकराव पवार, राहूल बिडवे, अमरसिंह माने-देशमुख, गोपाळ घाडगे, माऊली जवळेकर, बाहुबली तावळे, श्रीनिवास नागणे यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात कारखान्याचे गाळप बंद पडले. सुमारे आठ तास झालेल्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर पहिली उचल तीन हजार देण्यावर व्यवस्थापनाने मान्यता दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र शेतकरी संघटनेच्या या तीव्र आंदोलनाने अनेक कारखान्यांनी आपली पहिली उचल तीन हजाराचे वर देण्याचे जाहीर केल्याने ऊस दराची कोंडी फुटली आहे.

श्रीपूर येथील कर्मयोगी कारखान्याच्या काटागेट वरून आंदोलक आत शिरले व ऊसाला ३५०० रु भाव जाहीर करा अशा घोषणा देत गव्हाणीमध्ये उड्या टाकत आंदोलन चालू केले. अचानक झालेल्या या घटनेमुळे सर्वत्र काय होते आहे हे कळेना परंतू व्यवस्थापनाचे लक्षात ही घटना येताच कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधीत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आंदोलन थांबविणेची विनंती केली. परंतू ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यामुळे त्यांनी चेअरमन प्रशांतराव परिचारक यांना या घटनेची कल्पना दिली. त्यानंतर कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे, जेष्ठ संचालक दिनकरभाऊ मोरे, संचालक तानाजी वाघमोडे हे आंदोलन स्थळी आले व त्यांनी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी यांना नेहमीच पांडुरंग कारखाना शेतकरी हीत जपत आलेला असून यावेळीही समाधानकारक दर देणार असल्याचे सांगितले. परंतू शेतकरी संघटना किमान पहिली उचल तीन हजार जाहीर करा या मागणीवर ठाम होती. यावेळी कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी कारखान्याचे ऊस दर, कामगार, व्यापारी देणी, तोडणी खर्च या सर्वांचा विचार करता तसेच केंद्र सरकारने जाहीर केलेल्या एफ.आर.पी पेक्षा कारखाना ऊसास जास्त दर देत असल्याच्या बाबींकडे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. तरीही त्यांचे समाधान झाले नाही.

शेवटी रात्री ८ वा. चेअरमन प्रशांतराव परिचारक यांना सर्व वृत्तान्त सांगताना शेतकरी संघटना आपल्या भूमिकेवर ठाम आहे म्हटल्यावर परिचारक यांनी शेतकरी सभासद हित पाहत तीन हजार रुपयांची पहिली उचल देण्यास संमती दिली. दुपारी १२ वाजले पासून चालू असलेले हे आंदोलन रात्री आठ वाजता संपले. त्यानंतर कारखान्याचे बंद पडलेले गळीत व्यवस्थित चालू झाले. यानंतर आंदोलनकर्त्यांनी कै. सुधाकरपंत परिचारक यांनी ज्याप्रमाणे शेतकरी हित जोपासले तेच काम आज चेअरमन प्रशांत परिचारक तसेच उपस्थित असलेले उपाध्यक्ष कैलास खुळे, जेष्ठ संचालक दिनकरभाऊ मोरे, तानाजी वाघमोडे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व संचालक मंडळाचे हातून होत असल्याचे सांगत आभार मानत आंदोलन मागे घेत असल्याचे सांगितले.



**व्यवस्थापनाच्या संवेदनशिलतेचा प्रत्यय :** कारखान्यावर आंदोलन होत असताना एकीकडे कारखाना दिर्घकाळ बंद ठेवणे म्हणजे आर्थिक नुकसान, उपलब्ध ऊसाचे वेळेत गाळप ह्या जटील समस्या समोर असताना अत्यंत संयमाने चेअरमन प्रशांतराव परिचारक , डॉ . यशवंत कुलकर्णी, उपाध्यक्ष कैलास खुळे, संचालक दिनकरभाऊ मोरे, तानाजी वाघमोडे यांनी परिस्थिती हाताळत आंदोलक व शेतकऱ्यांच्या भावनांना न्याय मिळवून दिल्याने संवेदनशिलतेला प्रत्यय दिसून आला.

# आमदार मोहिते-पाटील यांच्या प्रश्नामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क

### बनावट कफ सिरप प्रकरणी राज्य शासनाची तत्काळ कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि.१३ डिसेंबर-**

बनावट कफ सिरपच्या वापरामुळे लहान मुलांचे बळी जाण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी हा गंभीर विषय महाराष्ट्र विधानमंडळात उपस्थित केला. मध्यप्रदेश व राजस्थानमधील घटनांचा संदर्भ देत, महाराष्ट्रात शासकीय व निमशासकीय रुग्णालयांमध्ये वापरण्यात आलेल्या औषधांची तपासणी झाली का,स्थानिक व परराज्यातून आलेल्या औषधांची गुणवत्ता तपासली का,लहान मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या कफ सिरपवर तातडीची बंदी घालण्यात आली का, तसेच प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई झाली, असे थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

यावर आरोग्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की मध्यप्रदेश मधील लहान मुलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या COLDIRF SYRUP B.N. १३ या कफ सिरपचा राज्यात वापर झाल्याचे निदर्शनास आल्याने अन्न व औषध प्रशासनाने दक्षतेचा इशारा दिला आहे. तपासणीत काही शासकीय आरोग्य संस्थांमध्ये औषध खरेदीत अनियमितता आढळली असून, बनावट व निकृष्ट औषधे पुरवठा करणाऱ्या उत्पादक, वितरक व विक्रेत्यांविरोधात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.तसेच, प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप विक्री करणाऱ्या मेडिकल दुकानदारांवर कारवाई करून काहींचे परवाने निलंबित करण्यात आले असून, ऑनलाइन औषध विक्रीवरही ऋऊ मार्फत तपासणी सुरू असल्याचे शासनाने स्पष्ट केले. मोहिते-पाटील यांच्या सजगतेमुळे औषध निर्मितीपासून वितरणापर्यंतच्या संपूर्ण पुरवठा साखळीतील त्रुटी, निरीक्षणातील कमतरता आणि नियामक समन्वयाचा अभाव अधोरेखित झाला असून, विशेषतः लहान मुलांच्या आरोग्याशी संबंधित औषधांमध्ये अधिक कडक गुणवत्ता नियंत्रण व जबाबदारी निश्चित करण्याची गरज स्पष्ट झाली आहे. संपूर्ण प्रकरणात आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी जनतेच्या जिवाशी संबंधित प्रश्नांवर दाखवलेली ठाम भूमिका विशेष उल्लेखनीय ठरली असून आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी निर्भीडपणे सभागृहात मांडून शासनाला अधिक जबाबदार व सतर्क बनवले आहे.



# कुर्डुवाडीत रेल्वेच्या जागेवर वाणिज्यिक कॉम्प्लेक्स उभारा

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.१३ डिसेंबर-**

कुर्डुवाडी-पंढरपूर मार्गावरील जुना मीटर गेज रेल्वे ट्रॅक सध्या वापरात नसून त्या ठिकाणी रेल्वेची मौल्यवान जमीन रिक्त व अनुपयोगी अवस्थेत पडून आहे. त्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारून विकासात्मक वापर करण्यात यावा, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन केली.

या संदर्भात खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले की, संबंधित जमिनीचा वाणिज्यिक दृष्टीने योग्य वापर केल्यास रेल्वे प्रशासनाला मोठ्या प्रमाणावर महसूलवाढ होऊ शकते. त्याचबरोबर परिसरात रोजगारनिर्मिती होऊन व्यापारवृद्धीस चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. तसेच रेल्वे प्रवाशांसाठी आवश्यक व आधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासही मदत होणार आहे. कुर्डुवाडी-पंढरपूर मीटर गेज मार्गाअंतर्गत उपलब्ध असलेल्या या रिक्त रेल्वे जमिनीचे तातडीने सर्वेक्षण करून त्या ठिकाणी वाणिज्यिक कॉम्प्लेक्स, बिझनेस हब किंवा मल्टी-युटिलिटी सेंटर उभारण्यास मान्यता देण्यात यावी. या मागणीचा विचार करून रेल्वे मंत्रालयाने आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी अपेक्षा खासदार मोहिते-पाटील यांनी व्यक्त केली आहे.





# ऊसाला ३ हजारांचा पहिला हप्ता द्या; अन्यथा सोमवारपासून गव्हाण बंद

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा कारखान्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१३ डिसेंबर-**

तालुक्यातील सर्व साखर कारखान्यांनी चालू गळीत हंगामात पहिला हप्ता प्रति टन ३ हजार रुपये जाहीर करावा, अन्यथा सोमवारपासून सर्व कारखान्यांची ऊस गव्हाण बंद ठेवण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे. शेतकरी संघटनेतर्फे येथील श्री संत दामाजी कारखान्यावर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

पहिला हप्ता ३ हजाराचा जाहीर करावा या प्रमुख मागणीसाठी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी ठामपणे उभे राहिले. शिष्टमंडळाने दामाजीचे चेअरमन शिवानंद पाटील यांना निवेदन दिले. यावर चेअरमन पाटील यांनी रविवारी संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकरी हिताचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा संघटक युवराज घुले यांनी दामाजीसह तालुक्यातील सर्व साखर कारखान्यांनी रविवारपर्यंत ऊस दर जाहीर करावा, अन्यथा सोमवारपासून जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनांचे पदाधिकारी एकत्र येऊन मंगळवेढा तालुक्यातील सर्व कारखान्यांची ऊस गव्हाण बंद ठेवू, असा ठोस इशारा दिला. यावेळी युवराज घुले, श्रीमंत केदार, अनिल बिराजदार, आबा खांडेकर, शंकर संगशेट्टी, पांडुरंग बाबर, रोहित भोसले, हरी खांडेकर, मल्लिकार्जुन देवपुरे, विजयकुमार पाटील, गजानन बंडाई, रणजीत पवार, विनायक कोळी, आप्पासाहेब पाटील, सिद्धराम होटगी, बसवराज नांगरे, नानासो मलगुंडे, शिवराज पाटील, आप्पासो चौगुले, लिंगप्पा सोनगे, अनगोंडा पुजारी, संजय रजपूत, किशोर दत्तू, पप्पू दत्तू, विनायक शेजाळ यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# पिलीव येथे लोकसहभागातून स्मशानभूमी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १३ डिसेंबर-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील स्माशानभूमीच्या दूरवस्थेप्रकरणी 'दै. तरूण भारत'ने वेळोवेळी आवाज उठवत सत्य स्थिती मांडली होती. त्याचा परिणाम होऊन लोकसहभागातून स्मशानभूमीच्या कामास सुरूवात केली आहे. देश स्वतंत्र झाल्यापासून खरेतर हिंदुसाठी स्वतंत्र अशी स्मशानभूमी नव्हती. यामुळे गावातील नागरिकांना शेवटचा निरोप सुद्धा सन्मानाने देता येत नव्हता एवढी विदारक परिस्थिती पिलीव येथे पाहावयास मिळत होती. गेल्या अनेक वर्षांपासून आठ मोरीजवळील ओढयालगतच अंत्यसंस्कार करावे लागत होते. त्यातच पावसाळ्यात ओढयाला पाणी आल्यावर अंत्यसंस्कार करणे खुपच अडचणीचे ठरत आहे.

खरेतर हिंदु धर्मात सोळा संस्कार आहेत त्यापैकी शेवटचा संस्कार म्हणजेच अंत्यसंस्कार पण पिलीव येथेही तोही सन्मानाने करता येत नव्हता.याबाबत पिलीव परीसरात नेहमीच चर्चा असत पण यासाठी पुढाकार कोण घेत नव्हते. सध्या ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार केले जात होते. त्याठिकाणी मोठ मोठी चिलारीची झाडे वाढली होती . त्याठिकाणी अंत्यसंस्कार करण्यासाठी गेलेल्या लोकांना बसता येत नव्हते. एवढी विदारक परिस्थिती त्याठिकाणी आहे. अखेर ही परिस्थिती पाहून शिवराज पुकळे व त्यांचे सहकारी सेवानिवृत्त मेजर गलांडे, व त्यांचे सहकारी यांनी याठिकाणी लोकसहभागातून तात्पुरती पण चांगली स्मशानभूमी बनविण्याचा मानस केला असुन याठिकाणी प्रत्यक्ष याठिकाणची स्वच्छता करण्याचे काम सुरू केले आहे. चिलारीची झाडे काढुन याठिकाणी शेडवर पत्रा टाकुन शेडमध्ये चांगला कोबा किंवा पेव्हर ब्लॉक टाकणे.






तसेच या स्मशानभूमीच्या शेजारी बसण्याची चांगली सोय अशा पद्धतीने पत्र्याची का असेना पण एक चांगली स्मशानभूमी याठिकाणी लोकसहभागातून बनविण्यात येणार आहे. जेणेकरून या ठिकाणी चांगल्या पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात येतील. काही असो पण अनेक वर्षांपासूनचा स्मशानभूमीचा हा प्रश्न मार्गी लागत आहे. पिलीव परीसरातील नागरिकांनी या कामासाठी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लवंग शाळेचा 'रोबो एल १' राज्यस्तरीय रोबो सॉकर चॅम्पियन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१३ डिसेंबर-**

स्टेट लेवल रोबो सॉकर चॅम्पियनशिप २०२५ चे राज्यस्तरीय अजिंक्यपद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लवंग (ता. माळशिरस) च्या रोबो एल १ टीमने पटकावून स्पर्धेचे पहिले चॅम्पियन होण्याचा बहूमान मिळवला.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृह (कॉनव्होकेशन हॉल) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे गुरुवार (ता. ११) रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद आणि महानगरपालिका शाळा यांच्यातील २२ संघाने सहभाग नोंदवला होता.




रोबोस्टॉर्म टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर यांच्या विद्यमाने महाराष्ट्रातील सर्वात मोठी रोबोट स्पर्धा घेण्यात आली. सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा स्तरावरून जिल्हा परिषद तसेच महानगरपालिका शाळा निवडण्यात आल्या होत्या. त्या शाळांना रोबोटिक्स संदर्भातील इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी), रोबोटिक्स एज्युकेशनल किट्स पुरवण्यात आले होते.

त्यासंदर्भात जिल्हानिहाय जिल्हास्तरावर कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये राज्यस्तरीय रोबोसॉकर चॅम्पियनशिप २०२५ ची घोषणा करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये जि.प.प्रा.शाळा लवंग, केंद्र महाळुंग या शाळेने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रत्येक लेवल वरती चुरशीचे सामने झाले. कष्ट, सराव, योग्य मार्गदर्शन यामुळे लवंगच्या 'रोबो एल १' संघाने फायनल मध्ये सिंधुदुर्ग संघावरती मात केली आणि पहिल्या राज्यस्तरीय रोबोसॉकर स्पर्धेचे पहिले विजेते होण्याचा बहुमान मिळवला.

लवंग टीम मध्ये शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक जावीद मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झालेल्या टीम मध्ये शाळेतील इयत्ता ७ वी मधील विद्यार्थी संस्कार नितीन वाघ (कॅप्टन), प्रतीक भारत चव्हाण (पोझिशन डायरेक्टर) आणि श्रेयस भिमराव निंबाळकर( रोबो मेकर) यांनी कार्य केले. शाळेचे मुख्याध्यापक अशोक पवार, सहकारी शिक्षक शुभांगी हिरवे, संगीता भोंग, करीम कोरबू यांचे सहकार्य लाभले.

शाळेच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहिल्या जाणाऱ्या या दैदीप्यमान यशाबद्दल लवंग गावचे सरपंच प्रशांतभैया पाटील, उपसरपंच सज्जन दुरापे, शा.व्य.स.अध्यक्षा कल्याणी चव्हाण आणि सर्व सदस्य, तसेच पालक यांनी कौतुक केले. पंचायत समिती माळशिरस गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, अकलूज बीट शिक्षण विस्ताराधिकारी तथा केंद्रप्रमुख महाळुंग भक्ती नाचणे यांनी टीमचे व शाळेचे अभिनंदन केले.